

# श्री साईलीला

शिरडी संस्थानचे अधिकृत त्रैमासिक

या अंकांत—


- बाबांची लीला
- रामलालाची लोकविलक्षण लीला
- रावणाची गोष्ट
- सुश्लोकगीता
- संतांच्या गंमतीच्या गोष्टी
- बाबांची आरती ( हिंदी )
- विनोबांचा वैद्य परमेश्वर
- ज्ञानेश्वर
- करुणा हें भक्तीचें रूप
- भक्तावनंस नाना ( श्रीसाईगाथामृत )
- ऐसा कृपावंत कोण ?
- माझ्या विठाईवांचून

इ. इ.



# श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३४ वें : अंक १ ला

वार्षिक वर्गणी रु. २-४-० ( ट. ख. सह )

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९५७

संपादक—

नागेश आत्माराम सावंत

रामचंद्र महादेव राणे

कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

## श्री साईवाक्सुधा



★

'मज भजती जे अनन्यपणें ।
सेविती नित्याभियुक्तमनें ।
तयांचा योगक्षेम चालविणें ।
ब्रीद हें जाणें मी माझें ' ॥ ३४ ॥
हेंच भगवद्गीतावचन ।
साई म्हणती माना प्रमाण ।
नाहीं अन्नवस्त्राची वाण ।
तदर्थ प्राण वेंचूं नका ॥ ३५ ॥

—श्री साईसच्चरित अ. ६



# प्रिय वाचक—

चालू अंकापासून श्रीसाईलीला त्रैमासिकाचें ३४ वें वर्ष सुरू होत आहे. दर वर्षाप्रमाणेंच चालू वर्षांतहि बाबांच्या कृपेनें साईलीलेंतून वेंचक आणि वेधक साहित्य देऊन वाचक-भक्तांची सेवा आमच्या हातून उत्तम रीतीनें पार पडेल अशी आमची आशा व श्रद्धा आहे.

साईलीलेंत येणाऱ्या मजकुराबद्दल अनेकांच्या अनेक प्रेमळ तक्रारी आमच्या कानीं आल्या आहेत. कांहींचें म्हणणें असें आहे कीं, साईलीलेंत 'भरीव' असा मजकूर कमी येतो! याचा खरा अर्थ असा कीं पांडित्यानें भरलेला आणि विद्वत्ताप्रचुर युक्तिवादांनीं नटलेला क्लिष्ट लेखनप्रपंच साईलीलेंत सहसा आढळून येत नाहीं! आमच्या मतें ही खरोखरी टीका नसून प्रशस्ति आहे. साईलीला हें पंडितांच्या उपयोगासाठीं नसून साध्या भोळ्या, सरळ आणि प्रेमळ भक्त-जनांसाठींच प्रामुख्यानें आहे. श्रीसाईबाबा हे भोळ्या भाविकांचे जिवलग होते. तसेंच हें त्रैमासिक असावें अशी आमची मनीषा आहे.

'बाबांची लीला' या सदरांत अलीकडे पूर्वींहून कमी मजकूर येतो, अशी एक तक्रार आहे. ती तक्रार खरी आहे. पण याचें कारण असें आहे कीं, बाबांच्या कृपेचे जे अनुभव भक्तांना येतात त्यांपैकीं पुष्कळसे अनुभव हे विशेष महत्त्वानें वर्णन करून सांगण्यासारखे नसतात. बाबांची लीला वर्णन करणारे जे अनुभव भक्तांकडून आमच्याकडे प्रसिद्धी-साठीं येतात त्यांतून चिकित्सापूर्वक निवड केल्यानंतर साईलीलेंत देतां येण्यासारखे अनुभव फारच थोडे उरतात. त्यामुळें अर्थातच हें सदर लहान होणें अपरिहार्य ठरतें.

श्रीसाईलीला हें नांवाप्रमाणें फक्त बाबांचें जीवन सांगणारें असावें, त्यांत इतर मजकूर येऊंच नयेत, अशीही मनीषा एका भक्तानें पत्रद्वारें व्यक्त केलीं आहे! पण असें कसें बरें करतां येईल? 'तूं फक्त माझीच भक्ति कर, इतर कोणाचीहि उपासना करूं नकोस' असें बाबांनीं कोणाला कधीं दटावलें नव्हतें. उलट ज्याचें जें इष्ट दैवत असेल त्याची त्या दैवतावरची निष्ठा अधिक उत्कट व्हावी, यासाठीं विशेष अशा प्रकारचे चमत्कार बाबांनीं केले असल्याचे अनेक प्रसंग त्यांच्या चरित्रांत आढळून येतात. सर्वसमावेशकता हा बाबांच्या जीवन चरित्रांत दिसून येणारा मोठा गुण. कोणत्याहि धर्माच्या आणि कोणत्याहि पंथाच्या भक्तांना साईबाबांकडे मज्जाव नाहीं. तीच गोष्ट साईलीलेची असणें हेंच युक्त आहे नव्हे का? माणूस कोणत्याहि धर्माचा वा पंथाचा असो त्याची ईश्वरभक्ति वाढावी, त्याचें अंतःकरण अधिकाधिक प्रेमळ व उदार व्हावें, आचरण अधिकाधिक सहानुभूतीनें भरलेलें असावें, त्याचा स्वार्थ कमी होऊन परार्थ वाढावा, स्वहिताची दृष्टि कमी होऊन त्याला परहित गोड वाटावें आणि अशाप्रकारें

'धर्म' हा त्याच्या जीवनांत प्रत्यक्ष मुरावा, ही स्फूर्ति देणारें विविध प्रकारचें साहित्य साईलीलेंत देण्याची आमची खटपट आहे. त्यासाठीं यापुढें केवळ भारतांतील संतचरित्रें व त्यांचा उपदेश एवढ्यावरच संतुष्ट न राहातां परदेशांतील अनेक अधिकारी संत, योगी आणि महात्मे यांचीं चरित्रें व त्यांची शिकवण यांचाहि परिचय साईलीलेंतून करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. कोणाच्याहि भक्तीला धक्का न लावतां ती अधिक दृढ होईल असें करणें आणि समाजांत ईश्वर–निष्ठेचा, प्रेमाचा आणि परहित विचाराचा प्रसार करणें हीच साईबाबांची खरी सेवा होय असें आमचें नम्र मत आहे.

बाबांची कृपा, वाचकांचें प्रेम आणि आमचे प्रयत्न यांनीं मिळून श्रीसाईलीला चालू वर्षी भक्तजनांच्या आदरास अधिकाधिक पात्र होवो, हीच आमची प्रार्थना...

—संपादक

---

# जो देव दिसत नाहीं त्याला शरण कसें जायचें ?

स्वामी अद्‌भुतानंदांना एका भक्तानें कळवळून विचारलें,

"देवाला पूर्ण शरण जा असें तुम्ही नेहमीं सांगतां. पण हें कसें शक्य आहे? ज्या देवाला मी कधीं स्वप्नांतसुद्धां पाहिलेलें नाहीं, त्याला शरण जाण्याइतकी श्रद्धा माझ्या अंतःकरणांत निर्माण होणार कशी?" स्वामी अद्‌भुतानंद म्हणाले,

'तूं देव पाहिलेला नाहींस. पण त्याचें नांव तर तुला ठाऊक आहे ना! तें नांव घेऊन तूं श्रद्धेनें देवाचा धांवा कर म्हणजे तो पावलाच पाहिजे. असं पाहा! ऑफिसांतून लोक काय करतात? समजा एकाद्या कारकुनाच्या जागेसाठीं एखाद्या गरजू माणसाला अर्ज करायचा आहे. ती जागा देण्याचें ज्याच्या हातीं आहे त्या अधिकाऱ्याला या बेकार गरजूनें पाहिलेलें नसतें किंवा कधीं त्याला त्याचें नांवहि नीट ठाऊक नसतें. तरीहि तो काय करतो? त्या अधिकाऱ्या नांवावर पत्ता लिहून आपला अर्ज त्याला धाडून देतो. तसंच तूं हि कर. देवाकडे आपला अर्ज पाठव. खऱ्या श्रद्धेनें पाठविलेला अर्ज देव नाकारीत नाहीं. तूं देवाकडे मनापासून अर्ज केलास तर त्याची तुझ्यावर कृपा खास होईल."

★

# श्रीसाईलीला त्रैमासिक

## फॉर्म नं. ४ (नियम नं. ८)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्रकाशन स्थळ | — | मुंबई |
| (२) | प्रकाशनाचें स्वरूप | — | त्रैमासिक |
| (३) | मुद्रकाचें नांव | — | कृष्णाजी नारायण सांपळे |
| | राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| | पत्ता | — | रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४. |
| (४) | प्रकाशकाचें नांव | — | (१) नागेश आत्माराम सावंत<br>(२) रामचंद्र महादेव राणे |
| | राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| | पत्ता | — | (१) १४–ए मोईवाडा रोड, परळ, मुंबई १२.<br>(२) ९१–के कोळीवाडा, फणसवाडी, मुंबई २. |
| (५) | संपादकाचें नांव | — | (१) नागेश आत्माराम सावंत<br>(२) रामचंद्र महादेव राणे |
| | राष्ट्रीयत्व<br>पत्ता | — | वर दिल्याप्रमाणें |
| (६) | वृत्तपत्राची मालकी | — | श्रीसाईबाबा संस्थान कमिटी, शिरडी.<br>सध्यांचे ट्रस्टी<br>(१) श्री. पी. के. सावंत<br>(२) श्री. एन्. ए. सावंत<br>(३) श्री. बी. टी. कोते पाटील<br>(४) श्री. डी. डी. रासने<br>(५) श्री. एस्. बी. देव |

आम्ही, नागेश आत्माराम सावंत आणि रामचंद्र महादेव राणे, वरील माहिती आमच्या माहितीप्रमाणें सत्याला स्मरून देत आहोंत.

प्रकाशकाची सही

ता. ३० मार्च १९५७

**नागेश आत्माराम सावंत**
**रामचंद्र महादेव राणे**

# बाबांची लीला



श्रीसाईबाबांचे पुढें एकनिष्ठ भक्त झालेले संतकवि श्रीदासगणू महाराज हे श्रीवामनशास्त्री इस्लामपूरकर यांचे शिष्य होते. 'मी काशीस जाऊन देह ठेवणार आहें' असें श्रीवामनशास्त्री यांनीं दासगणूंना सांगितलें होतें. पुढें ते काशीस जाण्यास निघाले त्यावेळीं 'दौंड येथें मला येऊन भेट' असा त्यांनीं आपल्या शिष्याला निरोप पाठविला. त्याप्रमाणें दासगणू आपल्या गुरूच्या दर्शनास गेले. शास्त्रीबुवांनीं त्यांना दौंडाहून परत जाऊं दिलें नाहीं. ते त्यांना भुसावळपर्यंत बरोबर घेऊन गेले. भुसावळहून पुढें जातांना शास्त्रीबुवांनीं दासगणूंना परत पाठविलें आणि त्यावेळीं दुःखी झालेल्या आपल्या शिष्याचें सांत्वन करीत म्हटलें, "वेड्यासारखें दुःख करूं नकोस. हा मुळीं मृत्युलोकच आहे. त्यांतूनहि मी नित्याचाच दुरावलों आहें अशी समजूत करून घेण्याचें कांहींच कारण नाहीं. दोनतीनदां शिरडीस गेला होतास ना? श्रीसाईबाबा थोर विभूति आहेत. त्यांना माझेंच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोंत. तेच येथून तुला पुढें वेळोवेळीं मार्ग दाखवितील."

त्याप्रमाणें श्रीदासगणू पुढें श्रीसाईबाबा यांना गुरुस्थानीं मानूं लागले. 'भक्तिसारामृत' या आपल्या ग्रंथांतील त्रेपन्नाव्या अध्यायाच्या शेवटीं श्रीसाईबाबांना उद्देशून दासगणू म्हणतात:—

हे श्रीसाई समर्था।
तुझ्या पदीं ठेवून माथा।
करितों विनंती हीच आतां।
ती उदारपणें मान्य करा॥

मी सकल संतांचा चरणरज।
माझी राखा आपण लाज।
तुम्ही भवाब्धीचें जहाज।
हें म्यां पक्कें जाणलें॥

हीच विनंती साईनाथा।
या वामनशास्त्र्यांच्या छात्रा।
नको लोटूं कदा परता।
बाबा दासगणूसी॥

माझे गुरु मरून गेले।
पोरकेंपणा मजला आलें।
म्हणून पाहिजे सांभाळिलें।
या पोरक्या गणूसी॥

तुम्ही एकरूप अवघे संत।
तुम्हांमाजी नसे द्वैत।
तुम्ही वामनशास्त्री साक्षात्।
आहांत बापा मजलागीं॥

पण असें असलें तरी प्रथम प्रथम साईबाबांचा आणि त्यांचा जो परिचय झाला तो कांहीं ते सत्पुरुष आहेत आणि त्यांची कृपा संपादन झाली तर आपलें कल्याण होईल, अशा भावनेनें झाला

नाहीं. श्री नानासाहेब चांदोरकर यांच्या आग्रहामुळें ते प्रथम शिरडीस गेले.

श्री. नानासाहेब कलेक्टर कचेरींत पुढें चिटणीस झाले होते. त्यांना तमाशाचा नाद असे. दासगणूंच्या लावण्या त्यांच्या रसिक मनाला फार आवडत. त्यावरून प्रारंभी त्यांची ओळख झाली. पुढें तर ते परस्परांतील उच्चनीच दर्जाचें अंतर विसरून एकमेकांचे जिवाभावाचे मित्र बनले. नानासाहेब चांदोरकर हे साईबाबांचे एकनिष्ठ भक्त होते. बाबांना ते प्रतिईश्वर मानीत. महिन्यांतून दोनतीनदां तरी शिरडीस बाबांच्या दर्शनास गेल्यावांचून त्यांना चैन पडत नसे. त्यांनींच 'गणपतराव! अरे एकदां तरी शिरडीस चल' असें सारखें पाठीस लागून श्रीदासगणूंना प्रथम शिरडीस नेलें. वरिष्ठ अधिकारावरील माणसाच्या इच्छेला अगदींच नकार देणें इष्ट नाहीं, याच भावनेनें सुमारें १८९६ सालीं प्रथम दासगणू शिरडीस साईबाबांच्या दर्शनाकरतां गेले. आरंभीं श्रीसाईबाबांविषयीं दासगणूंना फारसा आदर वाटला नाहीं. केवळ बाह्यांगावर भुलणें वा लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून गतानुगतिक होणें, हें दासगणूंच्या स्वभावांतच नाहीं. त्यांना स्वतःला एखादी गोष्ट पटेल, अनुभवास येईल तरच ते ती मानीत. त्यांच्या निष्ठावंत श्रद्धेला बुद्धिवादाचें अधिष्ठान आहे. श्रीसाईबाबांशीं त्यांचा परिचय जसजसा वाढत गेला, त्यांच्या त्रिकालज्ञानाचा प्रत्यय आला, तसतशी श्रीसाईबाबा ही अलौकिक विभूति आहे, याची साक्ष पटून बाबांच्या चरणीं दासगणूंची निष्ठा स्थिरावली. या निष्ठेला शेवटीं तर—

**शिरडी माझें पंढरपुर।**
**साईबाबा रमावर।**
**शुद्ध भक्ति चंद्रभागा।**
**भाव पुंडलीक जागा॥**

असें मानण्याइतकें उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें.

श्रीसाईबाबांनीं एक दिवस नानासाहेब चांदोरकरांना म्हटलें, "नाना सगळ्या संतमंडळींना जेवायला बोलीव. सगळी सिद्धता चांगली कर. आणि आपल्या या गणूवर सर्व संतांना बोलावण्याचें काम सोपीव. तो आणील बोलावून सगळ्यांना. एवढं कर बरं का गणू! तुझें लई कल्याण होईल!" याचा अभिप्रेत गूढार्थ असा कीं, संतकवि महीपतीनें आपल्या भक्तलीलामृतादि ओवीबद्ध ग्रंथांतून संतांचीं चरित्रें काव्यमय भाषेंत गायिलीं आहेत, तशीं दासगणूंनीं वर्णावीं. ही आज्ञा दासगणूंनीं मानली. त्यांनीं संत चरित्रें लिहिण्यास प्रारंभ केला.

श्रीसाईबाबांच्या आज्ञेप्रमाणें संतचरित्रें लिहिण्यास प्रारंभ झाल्यानंतर श्रीदासगणू बाबांच्या दर्शनाकरतां बरेच वेळां जात असत. श्रीसाईबाबांविषयीं त्यांच्या मनांत आतां आदरभाव उत्पन्न झाला होता. श्रीसाईबाबांचहि दासगणूंवर फार प्रेम होतें. पुष्कळ लोकांवर बाबा कधीं कधीं फार रागावत, शिव्या देत, मारहाण करीत. दासगणूंवर मात्र ते रागावल्याचें कोणी कधीं पाहिलें नाहीं. बाबांनीं नरसिंहाचा अवतार धारण केला कीं इतरांचा थरकांप होई. मशिदीची पायरी चढण्याचाहि कोणाला धीर होत नसे. दासगणू तशाहि स्थितींत जवळ जाऊन नमस्कार करीत. बाबांनीं यांना पाहिलें

कीं त्यांचा राग नाहींसा होई व ते यांच्याशीं हितगुज करूं लागत. ' नोकरी सोडून दे रे गणू ' असा सारखा आग्रह दासगणूंना करण्यास साई-बाबांनी सुरवात केली होती. दासगणू त्यांच्या दर्शनास आले कीं ते म्हणत, ' गणू, नोकरी सोडून दे. अरे, आपण बूट पुसायला जन्मलों काय ? आपण कोणाचे चाकर होऊं नये. '

दासगणू म्हणत, ' बाबा, मला कुणाचा आधार नाहीं. ही नोकरी आहे म्हणून दोन प्रहरला गोळाभर अन्नतरी खायला मिळतें. मी आतां फौजदारीच्या परीक्षेला बसलों आहे. यश मिळालें तर बढती होईल. तेव्हां ' परीक्षेंत उत्तीर्ण होशील ' असा आशीर्वाद देण्याचें सोडून ' नोकरी सोड ' असा भलताच आग्रह कां बाबा ? '

' तूं कशाचा परीक्षेंत उतरतोस ? माझें ऐक. नोकरी सोड. देवाला तुझी लई काळजी आहे. '

दासगणूंनी हें बोलणें मनावर घेतलें नाहीं. फौजदारीच्या परीक्षेच्या अभ्यासासाठीं असलेल्या पोलीस अॅक्टमधील विषय त्यांनीं कविताबद्ध केला. त्यामुळें पाठ करणें सोपें जाऊन सर्व विद्यार्थ्यांत दासगणूंचा क्रम पुष्कळ वर आला. अर्थातच दासगणू श्री. चांदोरकरांकडे जाऊन म्हणाले,

' अहो नानासाहेब, मी नुसता उत्तीर्ण नव्हे तर पहिल्या वर्गात आलों. बाबा तर म्हणाले होते पडशील म्हणून. '

पुढें बाबांनीं यावर स्पष्टीकरण केलें— ' कागदावर पास होण्यांत काय अर्थ ? फौजदारी मिळवशील तर खरा ! माझं ऐक. नको या मोहांत पडूं. नोकरी सोड गणू ! '

श्री. चांदोरकर म्हणाले, " गणपतराव, बाबांची आज्ञा मोडूं नको. तुझा जेवढा पगार आहे, तितके पैसे मी देईन तुला प्रत्येक महिन्याला. मग तर झालें ? "

तरी दासगणूंनीं तिकडे दुर्लक्ष केलें. इतकेंच नव्हे तर ते शिरडीस जाण्याचेंहि टाळूं लागले. एकदां गुन्ह्याच्या तपासाकरतां जात असतांना शिरडीवरून रस्ता होता. पण तो चुकवून आडरस्त्यानें जात असतांहि


ए. आर. सावंत अॅन्ड ब्रदर्स
३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.

ARSA PRODUCTS

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स
व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी
रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४

बाबांची अकस्मात् भेट झाली. ते म्हणाले, "गणू ! किती तोंड चुकविशील ? बऱ्या बोलानें नोकरी सोडून दे. ऐकलें नाहींस तर मागाहून पस्तावशील बरें !"

बाबांच्या या बोलण्यावर कांहींच उत्तर न देतां त्यांना नमस्कार करून दासगणू पुढें निघून गेले.

या गोष्टीला कांहीं महिने लोटले. बाबांचें बोलणें स्मरणांत राहिलें नाहीं. पण एकदां कठीण प्रसंग ओढवला. श्रीनरसिंगजी महाराजांची चरित्रविषयक माहिती मिळविण्याकरतां दासगणू नेवाशाहून आकोटास गेले होते. अधिकृत रजा अर्थातच नव्हती. नेहमींसारखे फिरतीवर असल्यानें परभारेंच गेले होते.

इकडे त्यांच्या अधिकारक्षेत्रांतील नेवाशाजवळच्या सातेगांव भालगांव येथें मोठा दरोडा पडून त्यांत गांवांतील मारवाडी ठार झाला. सोनें, चांदी, रोख रुपये मिळून सात आठ हजारांचा माल चोरीस गेला. पोलिसांची धांवपळ सुरू झाली. जमादार मात्र ठाण्यावर नाहीं हें पाहून इन्स्पेक्टर वॉर्डनसाहेब रागानें लाल झाला होता. 'जमादार कोठें गेला ? कां गेला ? कोणाच्या परवानगीनें गेला ?' याची चौकशी त्यानें सुरू केली. दासगणूंच्या हाताखालीं एक मुसलमान शिपाई 'अडली' म्हणून होता. त्यानें चहाडी केली कीं 'जमादार बेलापूर स्टेशनवरून गाडींत बसून कोठें तरी गेले. त्यांनीं आपलें घोडें निपाणी वडगांवच्या कुलकर्ण्याकडे ठेवलें आहे.'

कुलकर्ण्याच्या येथें शोध करण्यास पोलीस आले असतांना, त्या चतुर गृहस्थानें दासगणूंची पोलिस डायरी व इतर सरकारी कागद पत्रांचें दप्तर बळदांतील अडगळींत टाकून दिलें व चौकशीस आलेल्या अधिकाऱ्यास सांगितलें कीं, "गणेश दत्तात्रय येथें आला होता. हें घोडें त्याचेंच आहे. पण माझे पैसे त्याच्याकडून येणें असल्यानें मी हें घोडें ठेवून घेतलें. त्याचें बाकीचें सामान त्यानें कोठें ठेवलें तें मला माहीत नाहीं."

चौकशीला आलेले पोलीस यानंतर परत गेले.

अकोटाहून माघारी आल्यावर कुलकर्ण्यानें दासगणूंस दरोड्याची सर्व हकीकत सांगितली. तो म्हणाला, "गणपतराव, आतां कसें होईल ! वॉर्डनसाहेब संतापला आहे. तुमच्याविषयीं त्याला भलताच संशय आलेला दिसतो."

"परमेश्वर करील तें खरें" असें उत्तर देऊन दासगणू घोडें घेऊन बाहेर पडले. आतां कांहीं तरी बनाव केला पाहिजे, या विचारानें ते कापूस वडगांवास जाण्यास निघाले. रस्त्यानें जातांना श्रीसाई बाबांनीं दिलेली ताकीद त्यांना आठवली. बाबांची अवज्ञा केल्यानेंच हें संकट आपणांवर कोसळलें आहे, असें वाटूं लागलें. वाटेंत गोदावरी लागली. तेथें दासगणू येऊन पोंचले. रात्रींचा एकदीड वाजला असेल. नदींत उभे राहून दासगणूंनीं ओंजळींत पाणी घेतलें व शिरडीकडे तोंड करून ते म्हणाले, 'बाबा ! यांतून सुखरूप पार पडलों तर मी नोकरी सोडीन. याला गंगामाईचीच साक्ष.' असें म्हणून त्यांनीं पाणी सोडलें आणि ते पुढें निघून गेले. रात्रीं अंधारांत रस्ता नीट दिसत नव्हता.

घोडें रस्ता चुकलें आणि कापूस वड गांवास न येतां तें भामाठाण बादाठाणास आलें.

हें गांव मोंगलाईंतील असून येथील भिल्लांनींच दरोडा घातला होता. पहांटेच्या सुमारास घोडें गांवाजवळ आलें. दरोडेखोर शेकोटी करून गप्पा मारीत होते. मालाच्या वांटणी संबंधी त्यांचा वाद चालला होता.

'मी मारवाड्यावर घाव घातले म्हणून माझा वांटा मोठा!' 'मी पेट्या पळविल्या म्हणून माझा वांटा मोठा!' असें ते भांडत होते.

जवळ आलेल्या दासगणूंनीं जरा लक्ष देऊन तें ऐकतांच सर्व परिस्थिति त्यांच्या लक्षांत आली. 'या चावडींत उतरूं का?' असें त्या भिल्लांनांच विचारून ते सहज आल्यासारखे शेकोटीजवळ आले. धीर मोठा यांत शंकाच नाहीं. दासगणूंनीं आपण वाटसरू असल्याचें भिल्लांना सांगितलें. 'माझें शिंगरूं हरवलें! आतां काय करावें? कसें सांपडेल कुणास ठाऊक!' असें त्यांनीं म्हटलें तेव्हां त्यांपैकीं एकानें सांगितलें, "इथल्या अमिनाला कळवा." दासगणू म्हणाले, "मी नवखा—मला अमिनाकडे घेऊन चलतोस का? तुला कांहीं देईन."

त्या भिल्लाबरोबर जाऊन दासगणूंनीं अमिनाची गांठ घेतली. सर्व परिस्थिति त्याला सांगितली. गुन्हा पकडण्याचें सर्व श्रेय आपणांसच मिळेल असें त्याला निश्चयानें सांगितलें. त्याप्रमाणें अमीन मदतीस आला व थोड्याच वेळांत बहुतेक सर्व आरोपी मुद्देमालासकट पकडले गेले. इकडे वॉर्डनच्या देखरेखीखालीं गुन्ह्याच्या तपासाची धामधूम चालू होती. दासगणूंनीं अमीनास विनंती केली कीं 'आमचा साहेब येथून जवळच आहे. तरी कृपा करून हे आरोपी व हा मुद्देमाल त्यांस दाखवा. मग सर्वांसह आपण ठाण्यावर जाऊं. पुढें कायदेशीर रीतीनें व्यवस्था होईल.' अमिनानें तें मान्य केलें. वॉर्डन साहेबापुढें येतांच तो प्रथम दासगणूंवर खूप संतापला. पण आरोपी व मुद्देमाल पुढें केल्यानें त्याचा राग जाऊन तो प्रसन्न झाला. दासगणूंच्या नोंदवहीवर त्यानें फार चांगला शेरा दिला. 'आधीं रिकामी होईल ती पहिली वरिष्ठ जागा इतरांच्या आधीं यास द्यावी,' असें त्यानें लिहिलें. याप्रमाणें दासगणू संकटमुक्त झाले.

बढतीची आशा उत्पन्न झाल्यावर नोकरी सोडणें जिवावर येणें स्वाभाविकच होतें. शिरडीस आल्यावर बाबांनीं त्यांना हटकलेंच. 'गणू, गंगेंत शपथ कुणी वाहिली नोकरी सोडीन म्हणून? अजून तरी डोळे उघड' पण दासगणूंनीं तिकडे दुर्लक्ष केलें!

पुढें एका प्रसंगांत दासगणू खरोखरींच कायद्याच्या कचाट्यांत सांपडण्याची वेळ आली. गुन्ह्याच्या तपासासाठीं आरोपीस वागवितांना, मुळांत अनैतिक नव्हे, पण कायद्याच्या कक्षेबाहेरचें वर्तन झालें. हितशत्रूंनीं या संधीचा फायदा घेऊन काहूर उठविलें. शिक्षा होऊन नांवाला बट्टा लागतो कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली. श्रीदासगणू त्वरेनें शिरडीस गेले व बाबांना म्हणाले,

"मागच्या प्रकरणीं माझ्याकडे चूक असूनहि मला वांचविलेंत आणि आतां मी निरपराधी असूनसुद्धां शिक्षा देवविणार काय ? तुमच्या पायाशपथ सांगतों—डाग न लागतां सुटलों तर लगेच नोकरी सोडीन."

बाबांच्या कृपेनें खरोखर तसें घडलें. चौकशींत दासगणू पूर्ण निर्दोष ठरले.

यानंतर मात्र दासगणूंनीं नोकरी सोडण्याचा निश्चय करून राजिनामा पाठविला. राजिनामा दोन तीन महिने संमतच होईना. वरिष्ठ साहेबानें समक्ष बोलावून "वेड्यासारखें करूं नको, अजून राजिनामा परत घे. फकिराच्या नादीं काय लागलास ? आपल्या पुढच्या आयुष्याचा कांहीं विचार करशील कीं नाहीं ?' इत्यादि सांगून समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. स्नेही, सोबत्यांनींहि तीव्र विरोध दर्शविला. पण कशाचाहि उपयोग झाला नाहीं. करारी माणसाचा विचार ठरेपर्यंत अवकाश असतो. एकदां निश्चय झाल्यावर मग त्याला मागें वळविणें हें धबधब्यावरून कोसळणाऱ्या प्रवाहाला मागें फीर म्हणून सांगण्यासारखेंच आहे.

नोकरी सोडून दासगणू शिरडीस आले. नोकरी सोडली. आतां आपलें पुढें काय ? ही विवंचना मागें होतीच. त्यांना काळजी लागलेली पाहून श्रीसाईबाबा म्हणाले, 'गणू, देव पाठीराखा असतांना चिंता कसली करतोस ? नांदेडाकडे जा. तेथें मी तुझी सर्व व्यवस्था केली आहे !'

'बाबा हें नांदेड कोणतें ? पुण्याकडचें का ?'

'छे ! तें नाहीं. व समत नांदेड तिकडे जालन्याच्या खालीं आहे. तिकडे जा.' श्रीसाईबाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून दासगणू महाराज प्रथमच मोंगलाईत आले. त्यांचा 'संतकवि' असा जो लौकिक झाला तो याच प्रांतांत.

(श्री. अ. दा. आठवले यांच्या 'संतकवि श्रीदासगणू महाराज' या चरित्रग्रंथावरून)

———

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**भास्कर लक्ष्मण नार्वेकर**

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या–चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें–चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

# रामलालाची लोकविलक्षण लीला !

श्रीरामकृष्ण परमहंसांच्या खोलीमध्यें प्रभु रामचंद्राची एक बालमूर्ति होती. त्या मूर्तीचें नांव रामलाला. ही मूर्ति त्यांना मिळाली तो प्रकार अत्यंत अपूर्व आणि सामान्य संसारी माणसाचा विश्वास न बसण्यासारखा होता. स्वामी शारदानंदांनीं आपल्या 'श्रीरामकृष्ण लीलाप्रसंग' या चरित्र-ग्रंथांत ही कथा विस्तारानें वर्णन केली आहे...त्या मनोवेधक कथेचा गोषवारा स्वामी शारदानंदांच्याच शब्दांत पुढें दिला आहे......

एके दिवशीं जटाधारी या नांवाचा एक रामायत पंथी साधु दक्षिणेश्वरीं आला. त्याच्याजवळ रामचंद्राची बालमूर्ति होती. त्या मूर्तीची पुष्कळ दिवसपर्यंत अत्यंत उत्कट भक्तीनें पूजा केल्यामुळें त्याचें मन श्रीरामचंद्रचरणीं तन्मय होऊन गेलेलें असे. श्रीरामचंद्राची प्रकाशमय बालमूर्ति आपल्या समोर खरोखरीच आविर्भूत होऊन आपली पूजा ग्रहण करीत आहे असें दर्शन त्याला दक्षिणेश्वरीं येण्याच्या आधींच अनेकवेळां झालेलें होतें. त्याची भक्ति व अभ्यास हीं वाढत गेलीं, तसतशी रामचंद्राची बालमूर्ति आपल्याजवळ सदा सर्वकाळ वागत असते, असें त्याला दिसूं लागलें.

रामलालच्या सेवेमध्यें सदैव गढून गेलेल्या जटाधारीनें आपल्याला रामचंद्राच्या बालमूर्तीचें दर्शन होतें, हें कोणाजवळहि बोलून दाखविलें नव्हतें. तो सदोदित श्रीरामचंद्राच्या मूर्तीचें भजन पूजन करण्यांत तन्मय होऊन गेलेला आहे, एवढें फक्त इतर लोकांना दिसत असे. परंतु श्रीरामकृष्णांनीं मात्र जटाधारीला पाहतांच त्याचें हें रहस्य जाणलें. त्यामुळें त्यांच्या मनांत जटाधारीबद्दल विशेष ओढा उत्पन्न होऊन त्यांनीं त्याला लागणाऱ्या साऱ्या वस्तूंची व्यवस्था केली. दररोज ते त्याच्या जवळ बसत आणि त्याची पूजा लक्षपूर्वक पाहात. रामचंद्राच्या त्या बाल-मूर्तीविषयीं श्रीरामकृष्णांच्या अंतःकरणां-तहि अपूर्व प्रेमाचा जिव्हाळा निर्माण झाला आणि सदैव 'रामलाला'च्या सह-वासांत राहण्यांत त्यांना स्थळकाळाचें भान राहिनासें झालें !

आपली कुलदेवता श्रीरघुवीर हिची यथाविधि पूजाअर्चा आपल्याकडून व्हावी म्हणून श्रीरामकृष्णांनीं लहानपणींच राम-मंत्र घेतला होता. परंतु आतां श्रीराम-चंद्राच्या त्या बालमूर्तीविषयीं त्यांच्या हृदयांत वात्सल्यभाव निर्माण झाल्यामुळें जटाधारीकडून तो मंत्र यथाविधि पुन्हां घेण्याची उत्कट इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. जटाधारीनें आनंदानें या गोष्टीला संमति दिली आणि श्रीरामकृष्ण रामलालाच्या चिंतनांत तद्रूप होऊन गेले.

त्यावेळची हकीकत वर्णन करीत अस-तांना श्री रामकृष्ण सांगत असतः——

"जटाधारी बाबाजी रामलालाचीं अनेक दिवसांपासून सेवा करीत असे. तो जेथें जाई तेथें रामलालाला आपल्याबरोबर नेत असे. जी कांहीं भिक्षा त्याला मिळे तिचा तो प्रथम रामलालास नैवेद्य दाखवी. त्याला प्रत्यक्ष असें दिसे कीं रामलाला आपला नैवेद्य खात आहे अथवा एखादा पदार्थ मागत आहे,

अथवा आपल्याला फिरायला न्या म्हणत आहे, अथवा अशाच एखाद्या गोष्टीचा हट्ट धरून बसला आहे ! या रामलालाच्या सेवेंत जटाधारी निमग्न राहून त्या आनंदांत स्वतःचें देहभानहि विसरून गेलेला असे. रामलाला या सर्व गोष्टी करीत आहे असें मलाहि दिसे, म्हणून मग मीहि रात्रंदिवस बाबाजीजवळ बसून रामलालाच्या लीला बघत असें !

'जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी रामलालाचीहि माझ्यावर प्रीति वाढूं लागली ! जोंपर्यंत मी बाबाजीजवळ बसलेला असें, तोंपर्यंत रामलालाहि तेथें चांगला असे, नीट हौसेनें खेळे, मजा करी. पण मी उठून आपल्या खोलीकडे निघून आलोंरे आलों कीं, रामलालानें माझ्या मागोमाग धांव घेतलीच ! माझ्यामागें येऊं नको, असें त्याला कितीहि परोपरीनें सांगितलें तरी तो ऐकतच नसे. प्रथम प्रथम वाटे कीं हा सारा माझ्या भ्रमिष्ट डोक्याचा खेळ असावा. मला असें दिसे—अगदीं तुम्ही सारेजण मला जितके स्पष्ट आतां दिसत आहांत तितकें स्पष्ट मला असें दिसे कीं, रामलाला कधीं माझ्या पुढें, तर कधीं माझ्या मागें असा नाचत नाचत माझ्याबरोबर येत आहे ! एखादें वेळीं मांडीवर बसण्याचाच तो हट्ट धरी. बरें, एखाद्या वेळीं त्याला चांगला मांडीवर घ्यावा तर मग त्याची सारखी खालीं उतरायची घाई होई ! कांहीं केल्या तो मांडीवर बसत नसे. खालीं उतरला रे उतरला कीं त्यानें उन्हांत धूम ठोकलीच. कांट्याकुट्यांत जाऊन फुलेंच तोड, गंगेंत जाऊन बुड्याच मार, हा असला त्याचा खेळ चालायचा ! त्याला किती सांगावें—'बाळ, उन्हांत फिरूं नये, पायाला फोड येतील; बाळ, इतकें पाण्यांत डुंबूं नये, थंडी होईल !' पण ऐकतो कोण ? जसें कांहीं हें सारें मी दुसऱ्याच कोणाला सांगत आहें अशा रीतीनें दुर्लक्ष करावें, असें होत असे. फार तर उगीच एखाद्या वेळीं त्यानें त्या आपल्या कमलपत्रासारख्या सुंदर नेत्रांनीं माझ्याकडे टक लावून पाहावें आणि खदखदा हंसावें झालें ! त्याचा अवखळपणा आपला चालूच ! मग मात्र मला खराच राग येई आणि मी म्हणें, थांब, आतां तुला धरून असा मार देतों कीं, तुला जन्मभर त्याची चांगली आठवण राहील. असें म्हणून त्याला उन्हांतून नाहींतर पाण्यांतून ओढून खोलींत न्यावें आणि त्याला खोलींतच बसवून ठेवावें. पण तरी काय ? त्याच्या खोड्या आपल्या सुरू असायच्याच ! मग मात्र त्याला एखाद दुसरी चापट मारावी. असा मार बसला कीं लगेच त्याचे डोळे पाण्यानें भरून येत आणि केंविलवाण्या मुद्रेनें तो माझ्याकडे पाही. त्याचें तें केविलवाणें तोंड पाहिलें म्हणजे मात्र मनाला फार दुःख होई आणि त्याला मांडीवर घेऊन त्याची समजूत घालून मी त्याला उगी करीं !

"एक दिवस मी स्नान करायला निघालों. त्यानेंहि हट्ट धरला कीं मी येतों ! मग काय करणार ? त्याला आपल्याबरोबर घेऊन गेलों झालें ! पण नदीवर गेल्याबरोबर त्यानें एकदां नदींत जी उडी टाकली, तो कांहीं केल्या मग बाहेरच यायला तयार होईना ! त्याला किती सांगून पाहिलें पण कांहीं नाहीं. त्याचें आपलें डुंबणें सुरूच. मग राग येऊन मी नदींत उतरलों आणि त्याला पाण्यांत दडपून म्हणालों.

'आतां डुंब कसा डुंबतोस तो ! मघांपासून जसें थैमान मांडलें आहेस ! आणि काय सांगूं—त्याचा प्राण कासावीस होऊन तो एकदम पाण्यांतून ताडकन् उभा राहिला आणि धापा टाकूं लागला. तेव्हां त्याची ती अवस्था

पाहून माझ्या डोळ्यांत पाणी आलें आणि 'अरेरे! मी चांडाळानें हें काय केलें!' असें म्हणत त्याला पोटाशीं धरून मी नदींतून त्याला बाहेर घेऊन आलों.

'आणखी एक दिवस, असेच त्याच्यासाठीं मनाला जे काय कष्ट झाले आणि मी किती वेळ रडलों तें सांगतां सोय नाहीं. त्या दिवशीं त्यानें असाच कांहीं हट्ट घेतला म्हणून त्याची समजूत करण्यासाठीं मी त्याला थोडेसे पोहे न निवडतांच खायला दिले. थोड्या वेळानें पाहतों तों त्या पोह्यांतल्या फोलकटांनीं त्याची ती सुकुमार जीभ चिरली होती! हें बघून मला ब्रह्मांड आठवलें. मी त्याला मांडीवर घेऊन बसलों आणि गळा काढून रडायला सुरुवात केली. हाय हाय! ज्याच्या तोंडाला इजा होऊं नये म्हणून कौसल्या मातेनें नेहमीं काळजी घ्यावी, आणि दूध, लोणी असले मऊ मऊ पदार्थच खाऊं घालावे, त्याच्या तोंडांत त्या दिवशीं तसले ते दरिद्री पोहे भरतांना मला चांडाळाला एवढा संकोच वाटला नाहीं......'

हें बोलतां बोलतां श्रीरामकृष्णांचा तो त्यावेळचा शोक पुन्हां उसळला आणि आमच्यासमोर गळा काढून, ते एवढ्यानें ओक्साबोक्सीं रडूं लागले कीं, त्यांच्या त्या दिव्य प्रेमाचा लवलेशहि आम्हांला समजला नाहीं तरी, आमचे डोळे पाण्यानें भरून आले!

मायाबद्ध आम्ही माणसें, रामलालाच्या या गोष्टी ऐकून स्तंभित आणि हतबुद्ध होऊन गेलों. भीतभीत आम्ही खोलींतल्या रामलालाच्या त्या मूर्तीकडे पाहिलें—म्हटलें आपल्यालाहि श्रीरामकृष्णांसारखें कांहीं दिसतें कीं काय! पण छेः! कुठें कांहीं नाहीं! आणि कांहीं दिसेल तरी कसें? रामलालावरचें श्रीरामकृष्णांचें प्रेम आमच्यापाशीं कुठें होतें? श्रीरामकृष्णांसारखी भावतन्मयता आमच्यामध्यें कुठें आहे कीं जीमुळें आमच्या या चर्मचक्षूंना रामलालाची जिवंत मूर्ति दिसावी? आम्हांला तर त्या मूर्तीवांचून कांहींच दिसत नाहीं आणि त्यामुळें मनांत मात्र असें आलें कीं, रामकृष्ण सांगतात तसें खरोखरीच घडलें असेल काय?

संसारांतील सर्व विषयांत आमची हीच स्थिति होत असते आणि संशय पिशाच्च सदैव आमच्या मानगुटीला बसलेलें असतें. अविश्वास—सागरांत आपण सारे सदैव गटंगळ्या खात असतों. हेंच पहाना—ब्रह्मज्ञ ऋषींनीं सांगितलें—'सर्वं खलु इदं ब्रह्म नेह नानास्ति किंचन—' जगामध्यें एक सच्चिदानंद ब्रह्मावांचून दुसरी कोणतीहि वस्तु नाहीं; जगांत दिसणारे नाना पदार्थ व नाना व्यक्ति यांपैकीं एकहि वास्तविक सत्य नाहीं.' आम्ही मनांत म्हणतों 'असेलहि कदाचित्' मग संसाराकडे आम्ही अगदीं तीक्ष्ण दृष्टीनें पाहूं लागतों! पण काय? एकमेवाद्वितीयम् अशा त्या ब्रह्मवस्तूचा नामगंधहि कुठें आम्हांला आढळून येत नाहीं! आम्हांला दिसतें फक्त लांकूड, माती, घरदार, माणसें, जनावरें, नाना तऱ्हेचे व रंगाचे पदार्थ, हेंच सारें! हें पाहून मग मनांत येते—ऋषी भांगाबिंग तर प्याले नसतील! नाहीं तर असला हा विलक्षण सिद्धान्त त्यांनीं कसा सांगितला असता? पण ऋषि यावर पुन्हा म्हणतात, 'बाबांनो, असें नव्हे. अगोदर तुम्ही कायावाचामनानें संयम आणि पवित्रता यांचा अभ्यास करा. आपलें चित्त स्थिर करा. म्हणजे मग

आम्ही काय म्हणतों हें तुम्हांला नीट समजून येईल...' यावर आम्ही म्हणतों कीं, 'ऋषींनों ! या पोटाच्या विवंचनेपुढें आणि इंद्रियांच्या झगड्यापुढें आम्हांला हें सगळें करायला फुरसत कुठें आहे ? बरें समजा, तुमचें म्हणणें ऐकून आम्ही ब्रह्म-प्राप्तीच्या मागें लागलों आणि त्याची प्राप्ति झालीच नाहीं तर तुमचा तो अनंत आनंद आणि शांति वगैरे नुसत्या कवि कल्पनाच ठरायच्या; मग धड हेंहि नाहीं नि धड तेंहि नाहीं अशी आमची त्रिशंकुसारखी केविलवाणी गत व्हायची ! छे ! ऋषींनो, तुम्हींच आपले त्या अनंत आनंदाचा आस्वाद घेत खुशाल रहा ! आम्हांला हें रूपरसादि विषयांपासून मिळणारें थोडेंबहुत सुख आहे तेंच पुरे ! उगीच भलत्या फंदांत आम्हांला पाडूं नका आणि आमच्या या सुखाची माती करूं नका !'

ही संशयवृत्ति असतांना रामलालाच्या लीलांच्या गोष्टींवर आमचा विश्वास बसावा कसा ? असो !

रामलालाच्या अशा प्रकारच्या अद्‌भुत कथा सांगतां सांगतां श्रीरामकृष्ण म्हणत.

"पुढें पुढें असें होऊं लागलें कीं बाबाजींनीं नैवेद्य तयार करून किती तरी वेळ वाट पहावी, पण रामलालाच्या पत्ताच नाहीं. जटाधारी बाबाजीला यामुळें फार वाईट वाटावें आणि शोध करीत त्यानें माझ्या खोलींत येऊन पहावें तो इथें आपला रामलाला खुशाल आनंदांत खेळत बसला आहे असें त्याला आढळून यावें ! तेव्हां अभिमानानें बाबाजी त्याला खूप बोले. म्हणे 'अरे मी केव्हांचा नैवेद्य करून तुला जेऊं घालण्यासाठीं तुझी वाट पाहात आहें आणि तूं आपला इथें खुशाल खेळत बसला आहेस का ? हीच तुझी रीत आहे ! मनांत येईल तें करावें ! तुला दया-माया कांहीं आहे का ? आईबापांना टाकून वनांत गेलास, बाप बिचारा तुझ्या नांवानें धाय मोकलीत मरण पावला, तरी सुद्धां तूं परत फिरला नाहींस कीं मरणापूर्वीं त्याला दर्शन दिलें नाहींस !' बाबाजी असें पुष्कळ पुष्कळ बोले आणि मग त्याचा हात पकडून त्याला ओढून नेई आणि जेऊं घाली ! हा असा प्रकार खूप दिवस चालला होता. रामलाला मला सोडून जाईना आणि बाबाजीलाहि त्याला इथें टाकून निघून जाववेना !

"पुढें एक दिवस, बाबाजी एकाएकीं माझ्याकडे येऊन डोळ्यांत पाणी आणून मला म्हणाला, 'रामलालानें मला जसें पाहिजे होतें तसें दर्शन दिलें. माझ्या अंतःकरणाची तळमळ त्यानें आज पूर्ण शांत केली. आतां मला कसलेंहि दुःख नाहीं. तुम्हांला सोडून माझ्याबरोबर येण्याची रामलालाची इच्छा नाहीं. तुमच्याजवळ तो आनंदांत आहे व खेळत आहे हें पाहून मला आनंद आहे. कुठें का तो राहीना, आनंदांत असला म्हणजे झालें. म्हणून मी त्याला आतां तुमच्या जवळ ठेवून दुसरीकडे निघून जाणार आहे. तुमच्यापाशीं तो सुखी आहे याचें चिंतन करून मी आनंदांत दिवस घालवीन.' असें म्हणून रामलालास मजकडे देऊन जटाधारी बाबाजी निघून गेला. तेव्हांपासून रामलाला इथेंच आहे."

अशी ही रामलालाच्या लोकविलक्षण लीलेची अद्‌भुत कथा आहे.

---

श्रीरामचंद्राची अखंड विरोधी भक्ति करणाऱ्या रावणाची पूर्वकथा आज सर्वांना ठाऊक असेलच असें नाहीं. ही मनोवेधक कथा अध्यात्मरामायणावरून येथें दिलेली आहे....

# रावणाची गोष्ट

पूर्वी कृतयुगामध्यें पुलस्त्य या नांवाचा एक ऋषि होऊन गेला. तो ऋषि मोठा विद्वान् होता. तो एकदां मेरुपर्वतावर तपश्चर्या करण्यासाठीं गेला आणि तेथें असणाऱ्या तृणबिंदु नांवाच्या एका ऋषीच्या आश्रमांत राहून तपश्चर्या करूं लागला. तृणबिंदूचा तो आश्रम अत्यंत रमणीय असल्यामुळें स्वर्गातील देव, गंधर्व, सिद्ध इत्यादि देवगणांच्या कन्या त्या आश्रमांत खेळायला येत असत. कधीं-कधीं त्यांच्यापैकीं कित्येक कन्या तेथें नृत्यहि करीत असत. त्यांच्या या धांगडधिंग्यामुळें पुलस्त्याच्या तपाला विघ्न येऊं लागलें. एके दिवशीं त्याला त्या कन्यांचा फार राग आला आणि त्यांना तो म्हणाला, 'खबरदार राहा ! यापुढें जी कोणी माझ्या दृष्टीसमोर येईल ती गरोदर राहील !' ऋषीचें वचन ऐकून त्या कन्या घाबरल्या आणि त्यांनीं त्या आश्रमांत जाण्याचें अजिबात सोडून दिलें.

तृणबिंदु हा राजर्षि होता. त्याला एक कन्या होती. पुलस्त्य ऋषीनें दिलेला शाप तिला ठाऊक नव्हता. त्यामुळें एके दिवशीं ती निर्भय मनानें त्याच्या समोर गेली. तिची त्याच्याशीं नुसती नजरानजर झाली मात्र आणि ती कन्या गरोदर राहिली !

तृणबिंदूला सर्व प्रकार समजतांच त्यानें ती कन्या पुलस्त्याला देऊन त्या दोघांचा विवाह करून दिला. नंतर ती आपल्या पतीची पातिव्रत्य धर्मानें सेवा करूं लागली असतां पुलस्त्यानें प्रसन्न होऊन तिला सांगितलें, " तुझ्या उदरांतील गर्भापासून जो पुत्र तुला होईल तो मोठा ज्ञानसंपन्न होईल. "

## कुबेराचा जन्म

नंतर योग्यवेळीं ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव विश्रवा असें ठेवलें. हा विश्रवा मोठा वेदवेत्ता आणि ज्ञानसंपन्न झाला. त्यामुळें लोकांमध्यें त्याची खूप कीर्ति पसरली. त्याची योग्यता पाहून भारद्वाज ऋषींनीं आपली मुलगी त्याला दिली. भारद्वाज ऋषींच्या या

कन्येला एक पुत्र झाला. त्याचें नांव वैश्रवण. कुबेर असेंहि त्याचें दुसरें नांव होतें. कुबेर हाहि आपल्या पित्याप्रमाणें सर्व लोकांना आवडूं लागला. त्रैलोक्यांतील सर्व द्रव्य आपल्यापाशीं असावें अशी महत्त्वाकांक्षा या कुबेराच्या मनांत उत्पन्न झाली. त्यानें त्यासाठीं कडक तपश्चर्या केली. त्याच्या तपश्चर्येनें ब्रह्मदेव संतुष्ट झाला आणि त्यानें कुबेराला हवा असलेला वर दिला. त्या वराच्या योगानें जगांतील सारी संपत्ति कुबेरापाशीं आली. लोक त्याला धनेश म्हणूं लागले. प्रसन्न झालेल्या ब्रह्मदेवानें त्याच वेळीं कुबेराला पुष्पक नांवाचें विमानहि दिलें. त्या विमानांत बसून कुबेर आपल्या पित्याकडे गेला आणि आपल्या वरप्राप्तीची व विमान प्राप्तीची सर्व हकीकत त्यानें त्याला सांगितली. नंतर तो पित्याला म्हणाला, ‘बाबा ! ब्रह्मदेवानें मला प्रसन्न होऊन वर दिला खरा, पण त्यानें मला राहाण्यासाठीं स्वतंत्र स्थान दिलें नाहीं. जेथें मला इतरांपासून उपद्रव होणार नाहीं, असें एखादें निर्वेध स्थान असेल तर मला दाखवा.”

हें ऐकून विश्रवा म्हणाला, ‘तूं म्हणतोस तसें एक स्थान पाहण्यांत आहे. पूर्वी विश्वकर्म्यानें लंका या नांवाची एक नगरी राक्षसांसाठीं निर्माण केली आहे. त्या नगरींत कांहीं कालापूर्वी राक्षस राहात असत. पण ते उन्मत्त झाल्यामुळें विष्णूनें त्यांच्यावर स्वारी करून त्यांना तेथून हांकून लावलें. विष्णूच्या भीतीनें ते सर्व राक्षस लंकेंतून निघून गेले. ते सध्यां पाताळांत राहात असतात. ही लंका नगरी समुद्राच्या मध्यभागीं असल्यामुळें जवळ जवळ शत्रूला ती अजिंक्य आहे. सध्यां ती रिकामी आहे. यासाठीं तूं तेथें जाऊन राहा. तेथें तुला कोणाचा उपद्रव होणार नाहीं.”

कुबेराला ही गोष्ट मानवली आणि तो लागलाच लंकेंत राहावयास गेला.

## सुमाली राक्षसाची योजना

याचवेळीं पाताळांत सुमाली या नांवाचा एक राक्षस राहात होता. तो मांसभक्षक असल्यानें मांसाच्या शोधासाठीं पृथ्वीवर आला होता. त्याच्याबरोबर त्याची कन्याहि होती. तिचें नांव कैकसी. ती कन्या अतिशय सुंदर होती. तो सुमाली राक्षस आकाशमार्गानें लंकेवरून जात असतां कुबेर त्याच्या दृष्टीस पडला. लागलीच त्याच्या मनांत एक कल्पना आली व तो आपल्या मुलीला—कैकसीला—म्हणाला,

‘मुली, तूं आतां चांगली मोठी झाली आहेस. पण मी नकार देईन या भीतीनें तुला मागणी घालण्यासाठीं कोणी येत नाहीं. तेव्हां तूं असें कर. तूं स्वतः विश्रवा ऋषींपाशीं जाऊन त्यांना वर. त्यांच्यापासून तुला जे पुत्र होतील ते या कुबेराप्रमाणें पराक्रमी होतील. तुझ्या या कृतीनें सर्व राक्षसकुलाचें कल्याण होईल.

पित्याची सूचना कैकसीला आवडली ती लागलीच विश्रावा ऋषीपाशीं गेली आणि त्याच्यासमोर लाजेनें मान खालीं घालून उभी राहिली. ऋषींनीं तिला विचारलें, ‘मुली तूं कोण ! इथं कां आली आहेस ?’

कैकसी म्हणाली, ‘तुम्ही सर्वज्ञ आहांत मी उघड सांगितलं पाहिजे असं नाहीं.

माझा हेतु आपण अंतर्ज्ञानानें ओळखलाच असेल.'

विश्रवा ऋषीनें क्षणभर एकाग्र मन केल्याबरोबर तिच्या मनांत काय आहे हें त्याच्या लक्षांत आलें. तो कैकसीला म्हणाला,

तुझी इच्छा काय आहे हें मला समजलें. तुझ्या इच्छेप्रमाणें माझ्यापासून तुला पुत्रप्राप्ति होईल. परंतु तूं भलत्याच वेळीं माझ्याकडे आलीस ही मोठी चूक केलीस. ही संध्याकाळची वेळ असल्यामुळें तुला जे दोन पुत्र होतील ते महाभयंकर होतील."

कैकसी म्हणाली,

"महाराज आपल्यासारख्या मुनि श्रेष्ठापासून होणारे पुत्र हे भयंकर निपजतील हें योग्य होईल काय?"

विश्रवा म्हणाला,

"होय ही वेळ वाईट असल्यामुळें तसें होणारच. पण एक समाधानाची गोष्ट आहे. ती अशी कीं तुला जो तिसरा पुत्र होईल तो जरी जन्मानें राक्षस असला तरी देवांचा द्वेष न करतां तो भगवान् विष्णूची मोठ्या प्रेमानें भक्ति करील व तो रामभक्त होऊन राहील."

## रावणाचा जन्म

विश्रवाऋषीनें कैकसीशीं विवाह केला. पुढें योग्य वेळीं तिला पहिला पुत्र झाला. त्याचें रूप फार भयंकर होतें. त्याला दहा माना, दहा डोकीं आणि वीस हात होते. तो जन्माला आला तेव्हां मोठमोठे भूकंप झाले आणि विनाश सुचविणारे अनेक घोर उत्पात घडून आले. या मुलाचें नांव रावण.

त्यानंतर कैकसीला आणखी एक मुलगा झाला. त्याचें नांव कुंभकर्ण असें ठेवलें. त्याचा देह एखाद्या पर्वताप्रमाणें प्रचंड होता. त्याच्यामागून कैकसीला एक मुलगी झाली. तिचें नांव शूर्पणखा. तीहि आपल्या दोघां वडील भावांप्रमाणें भयंकर आणि दुष्ट होती. तिच्या पाठीवर बिभीषण जन्माला आला. तो मात्र दिसण्यांत सुंदर होता व त्याचा स्वभावहि अगदीं शांत होता.

रावणाचें शरीरसामर्थ्य अचाट होतें. तो लोकांना अतिशय त्रास देई त्यामुळें लोक रावणाला भीत असत. एखाद्या प्राण्याच्या शरीरांत निर्माण झालेला रोग जसा दिवसानुदिवस वाढत असतो, तसा तो दुष्ट रावण समाजामध्यें दिवसानुदिवस प्रबळ होत चालला होता.

## कैकसीला मत्सर

इकडे लंकेत राहिलेल्या कुबेराला कांहीं काळानें आपल्या पित्याच्या दर्शनाला जाण्याची इच्छा झाली. तो आपल्या पुष्पक विमानांत बसून विश्रवा ऋषीच्या आश्रमांत आला. त्याचें तें तेज, सौंदर्य आणि तें पुष्पक विमान कैकसीनें पाहिलें. तिला आपल्या सावत्र मुलाचा उत्कर्ष सहन झाला नाहीं. ती आपल्या मुलाशीं– रावणाशीं–गेली आणि त्याला म्हणाली, बाळ! तो तुझा सावत्र भाऊ पाहिलास ना? तो कसा तेजस्वी आहे! तूं कां नाहीं त्याच्यासारखा होत? तूं प्रयत्न करशील तर त्याच्यासारखाच पराक्रमी होशील."

आपल्या सावत्र भावाची स्तुति ऐकून रावणाला राग आला. तो म्हणाला, "त्या कुबेराची तूं एवढी प्रतिष्ठा कशाला सांगतेस? मी कांहीं कमी नाहीं. मी

त्याच्याहूनहि अधिक सामर्थ्य संपादन करीन. पहा तर खरें! ही माझी प्रतिज्ञाच आहे."

## रावणाची अघोर तपश्चर्या

अशी प्रतिज्ञा केल्यावर रावणानें आपल्या भावांना बरोबर घेतलें आणि ते तिघे तपश्चर्या करण्यासाठीं गोकर्ण क्षेत्रांत गेले. तेथें रावणानें एकनिष्ठेनें दहा हजार वर्षें तपश्चर्या केली. कांहीं न खातां निराहार राहून त्यानें तप केलें. एक हजार वर्षें झालीं कीं आपलें एक मस्तक कापून तो त्याचें अग्नीमध्यें हवन करीत असे! अशा रीतीनें नऊ हजार वर्षें तप करून आपलीं नऊ मस्तकें कापून त्यानें तीं अग्नीमध्ये अर्पण केलीं. पुढें आणखी एक हजार वर्षें पुरीं झाल्यावर जेव्हां तो आपलें दहावें मस्तक कापण्यास सिद्ध झाला झाला तेव्हां प्रसन्न होऊन ब्रह्मदेव वर देण्यास रावणापाशीं आला. त्यावेळीं रावण ब्रह्मदेवास म्हणाला, 'देव, नाग, यक्ष, देवता किंवा राक्षस अशांपैकीं कोणाच्याहि हातून मला मृत्यु येऊं नये. मी मनुष्याची पर्वा करीत नाहीं. यःकश्चित माणसें तीं! त्यांच्या हातून मला मरण येणें शक्य नाहीं.'

ब्रह्मदेवानें 'तथास्तु' म्हणून त्याला वर दिला. नंतर तो रावणाला म्हणाला,

'रावणा, तूं मोठ्या साहसानें जीं आपलीं नऊ मस्तकें अग्नीला अर्पण केलीं आहेस, तीं तुझीं मस्तकें तुला पुन्हां पहिल्या सारखीं प्राप्त होतील. इतकेंच नव्हे तर तीं अक्षय होतील. म्हणजे तीं जरी तुटलीं तरी पुनः नवीं उत्पन्न होतील. तसेंच तुला जें रूप घ्यावेंसें वाटेल तेंहि घेतां येईल.'

बिभीषणानेंहि खूप तपश्चर्या केली होती. त्याला ब्रह्मदेवानें अमरत्व दिलें. कुंभकर्णाची तपश्चर्याहि कडक झालेली होती. त्याला वर मागण्यास ब्रह्मदेवानें सांगितलें. त्यावर तो म्हणाला,

'देवा, जर तूं वर देणार तर मला एवढेंच दे कीं, मला सहा महिनेपर्यंत एकसारखी गाढ झोंप लागावी आणि एक दिवस मला पोटभर खायला मिळावें!'

## रावणानें लंका घेतली

आपल्या नातवाला उत्तम वर मिळाला ही हकीगत सुमाली राक्षसास कळतांच त्याला अतिशय आनंद झाला. आतां आपणांस देवांचें भय उरलें नाहीं अशी त्याची खात्री झाली. आपल्या सगळ्या राक्षसांना बरोबर घेऊन तो पाताळांतून निघाला आणि रावणाकडे येऊन त्याला म्हणाला,

"बाळ, आज तूं माझी फार दिवसांची इच्छा पूर्ण केलीस. ज्या विष्णूच्या भयानें आम्ही आमची लंका टाकून पाताळांत जाऊन दडून बसलों होतों, त्या विष्णूचें भय आतां आम्हांला उरलें नाहीं. तुझा सावत्र भाऊ ज्या लंकेंत दिमाखानें राहात आहे ती लंका आम्हां राक्षसांची आहे व त्यानें ती बळकावली आहे. यासाठीं तीं तूं अगोदर स्वाधीन करून घे. कुबेरानें सामोपचारानें लंका दिली तर ठीकच आहे. नाहीं तर तूं ती जबरीनें जिंकून घे.'

रावण म्हणाला,

"असें कसें आपण सांगतां? कुबेर हा आमचा वडील भाऊ असल्यामुळें तो तर आम्हांला गुरुप्रमाणें पूज्य आहे."

सुमालीबरोबर आलेल्या राक्षसांचा प्रमुख प्रहस्त राक्षस यावर म्हणाला,

"रावणा ! तूं राजधर्म आणि नीतिशास्त्र यांचें अध्ययन केलें नाहींस म्हणून असें बोलत आहेस. जे कोणी खरे शूर असतात, ते नात्यागोत्याच्या भानगडींत मुळींच पडत नाहींत. सावत्र भावांची भाऊबंदकी ही पूर्वापार चालत आलेली आहे. देव आणि राक्षस हे एका कश्यपाचें मुलगे—सावत्र भाऊ. त्यांचें वैर कांहीं आजचें नाहीं. कुबेर स्वत:ला देव म्हणवितो. अर्थात् तो आपला शत्रु आहे."

प्रहस्ताचा उपदेश रावणाला पटला. त्यानें लगेच कुबेरावर स्वारी केली. कुबेर आपल्या पित्याकडे गेला आणि त्यानें सगळें वर्तमान त्याला सांगितलें. विश्रवा कुबेराला म्हणाला, 'रावण हा ब्रह्मदेवाच्या वरानें उन्मत्त झालेला असल्याकारणानें तुझें त्याच्यापुढें कांहीं चालणार नाहीं. यासाठीं तूं मुकाट्यानें लंका सोडून दुसरीकडे जावें हें बरें.'

पित्याच्या सांगण्याप्रमाणें कुबेरानें लंका रावणाच्या स्वाधीन केली आणि तो कैलास पर्वतावर तपश्चर्या करण्यास निघून गेला. तेथें त्यानें शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरानें त्याच्यासाठीं एक उत्तम नगरी तयार करविली. त्या नगरीचें नांव अलका असें ठेवून ती कुबेराला राहायला दिली व त्याला लोकपाल करून उत्तर दिशेचें स्वामित्व त्याच्याकडे दिलें.

## पुष्पक विमान पळविलें

राक्षसांनीं लंकेंत रावणाला राज्याभिषेक केला. तेव्हांपासून तो आपल्या भावांसह लंकेंत राहूं लागला. कश्यपाच्या दिती नांवाच्या पत्नीचा मय नांवाचा एक मुलगा होता. तो शिल्पकर्मांमध्यें अतिशय कुशल होता. त्या मयाला मंदोदरी नांवाची लावण्यवती कन्या होती. ती त्यानें रावणाला दिली आणि आपल्या जावयाला एक अमोघ शक्तीहि आंदण म्हणून दिली.

कांहीं काळानें मंदोदरीला एक मुलगा झाला. तो जन्माला आल्याबरोबर रडूं लागण्याऐवजी त्यानें मेघाप्रमाणें भयंकर गडगडाट केला म्हणून त्याचें नांव मेघनाद असें ठेवलें.

आपल्या वरानुसार कुंभकर्ण सहासहा महिने झोंपलेला असे. पण रावण तिन्ही लोकांत फिरत राहून सर्व प्राणिमात्रांना पीडा देत असे. ज्या कोणापाशीं जी कांहीं चांगली वस्तू असेल ती तो खुशाल बलात्काराने काढून नेत असे. अशा रीतीने जगाला रावण पीडा देत आहे ही गोष्ट कुबेराच्या कानावर गेली. त्यानें आपला एक दूत रावणाकडे पाठवून "असा अधर्मानें वागूं नको" असें त्याला सांगितलें. तें रावणाला आवडले नाहीं, इतकेंच नाहीं, तर आपणाला उपदेश करणाऱ्या कुबेराचा त्याला फार राग आला. त्यानें लागलीच अलकेवर स्वारी करून आपल्या सावत्र भावाला पराभूत केलें व त्याचें पुष्पक विमान हिरावून नेलें !

## रावणाचे पराक्रम

नंतर रावणानें यम आणि वरुण या दोघां लोकपालांसह युद्ध करून त्यांना जिंकलें आणि इंद्राला जिंकण्याच्या इच्छेनें तो स्वर्गांत गेला. सर्व देव इंद्राच्या साहाय्यास आले. स्वर्गांमध्यें रावण

आणि इंद्र यांचें तुंबळ युद्ध सुरू झालें. बराच वेळ युद्ध झाल्यावर इंद्रानें त्याला नामोहरम केलें आणि त्याच्या मुसक्या बांधल्या. हें वृत्त रावणाचा मुलगा मेघनाद याच्या कानावर गेलें तेव्हां तो चवताळून इंद्रावर चालून गेला. पुनः भयंकर युद्ध झालें. या युद्धांत मेघनादानें इंद्राचा पराभव करून त्याच्या मुसक्या बांधल्या आणि आपल्या पित्याला सोडविलें. नंतर इंद्राला व रावणाला बरोबरोबर घेऊन मेघनाद लंकेला परत आला. तेथें इंद्राला कैदेंत ठेवलें. ही हकीकत ऐकून स्वतः ब्रह्मदेव लंकेस आला आणि त्यानें इंद्रासाठीं रदबदली केली. तेव्हां अनेक वर मागून घेऊन मेघनादानें इंद्राला सोडून दिलें.

नंतर रावणानें कैलास पर्वतावर स्वारी केली. त्यानें आपल्या बाहुबलानें सबंध पर्वतच गदगदां हालविला. हें त्याचें कृत्य पाहून नंदीला संताप आला व 'वानर आणि माणसें यांच्या हातून तुझा नाश होईल' असा त्यानें रावणाला शाप दिला. रावणाला त्या शापाचें कांहींच वाटलें नाहीं. पण अधिक पराक्रम दाखविण्याच्या भरीस न पडतां तो लंकेंत परत आला. पुढें त्यानें सहस्रार्जुनाच्या माहिष्मती नांवाच्या नगरावर स्वारी केली. रावणाला वीस हात होते तर सहस्रार्जुनाला हजार होते. त्या दोघांचें युद्ध झालें असतां सहस्रार्जुनानें रावणाचा पराभव करून त्याला बंदींत ठेवलें. त्यावेळीं पुलस्त्यानें मध्यस्थी केल्यामुळें सहस्रार्जुनाच्या बंदींतून रावणाची मुक्तता झाली.

एवढ्यानें रावणाचा गर्व कमी झाला नाहीं. त्यानें पुनः बल प्राप्त करून घेऊन तो वाली वानराला जिंकण्यासाठीं त्याच्या किष्किंधा नगरीवर चाल करून गेला. पण तेथें उलटाच प्रकार झाला. वालीनें त्याला सहज काखेंत दाबून चारी समुद्रांवर गरगर फिरवून आणलें. हा वानर आपल्याहून खूप पराक्रमी आहे अशी खात्री पटल्यावर रावणानें त्याच्याशीं सख्य जोडलें.

## सनत्कुमारांना प्रश्न

ब्रह्मदेवाचा पुत्र सनत्कुमार याला एकदां रावण भेटायला गेला. त्यावेळीं त्यानें सनत्कुमाराला विचारलेल्या प्रश्नांत एक असा होता —

'विष्णूच्या हातून मरण पावलेल्या प्राण्याची मरणानंतर काय गति होते ?'

त्यावर सनत्कुमार म्हणाला होता,

'विष्णूखेरीज इतर देवांच्या हातानें मृत्यु आल्यास मेलेले प्राणी स्वर्गाला जातात. कांहीं काळपर्यंत स्वर्गांतील सुखें भोगून ते पुन्हां पृथ्वीवर जन्म घेतात आणि आपल्या पूर्वजन्मीच्या पापपुण्याप्रमाणें सुखदुःख भोगतात. असा जन्ममरणाचा त्यांचा फेरा सतत चालू राहातो. पण ज्या कोणा भाग्यवंताला प्रत्यक्ष भगवान विष्णूच्या हातानें मरण येतें तो विष्णुरूपच होतो."

हें रहस्य ऐकून रावणाला आनंद झाला. आपण प्रत्यक्ष विष्णूशीं युद्ध करावयाचें असा त्यानें मनाशीं निश्चय केला.

## श्वेतद्वीपांत रावणाची फजिती

एकदां रावण नेहमींप्रमाणें त्रिभुवनांतून हिंडत असतां नारदमुनींची व त्याची

गांठ पडली. नारद नुकताच ब्रह्मलोकांतून आला होता. नारदाला नमस्कार करून रावणानें विचारलें, 'भगवन्! माझ्याशीं युद्ध करूं शकेल असा कोणी योद्धा आपल्या पाहण्यांत आहे काय?'

नारद म्हणाला, 'श्वेतद्वीपामध्यें जे लोक राहातात ते मोठे बलाढ्य आणि पराक्रमी आहेत. तुला आपल्या बाहूंची खुमखुमी जिरवायची असेल तर श्वेतद्वीपांत जा. तेथील लोकांचे देह मोठे असतात आणि त्यांचें बळहि प्रचंड असतें.'

हें नारदाचें उत्तर कानीं पडतांच गर्विष्ठ रावण लगेच पुष्पक विमानांत बसला आणि श्वेतद्वीपांतील लोकांबरोबर युद्ध करण्याच्या ईर्ष्येनें तिकडे गेला. पण श्वेतद्वीपाच्या सीमेवर तें पुष्पक विमान जातांच असा चमत्कार झाला कीं, तेथील लोकांच्या तेजामुळेंच त्या विमानाची गति खुंटली आणि तें जागच्या जागीं उभें राहिलें. रावण खालीं उतरला आणि आपल्या मंत्र्यांसह श्वेतद्वीपांत शिरला. इतक्यांत तेथें असलेल्या अवाढव्य देहाच्या एका स्त्रीची नजर त्याच्याकडे गेली. दहा तोंडांचें तें बाहुलें पाहून तिला मोठी मौज वाटली तिनें त्याला सहज हातानें धरून उचललें व विचारलें,

"अरे तूं कोण! इकडे कुठून आलास! तुला इकडे कुणी पाठविलें! हें सगळें मला सांग पाहूं."

इतक्यांत आणखी एक स्त्री तेथें आली पहिल्या स्त्रीच्या हाती असलेल्या रावणाला पाहून तिलाहि गंमत वाटली तिनें पहिलीच्या हातांतून त्याला ओढून आपल्या हातीं घेतलें. त्याचें तें विचित्र रूप पाहून त्या स्त्रीला हसूं आलें. आणखी कांहीं स्त्रिया तेथें जमल्या आणि त्यांनीं रावणाला हातांत फेंकायचा आणि ओढून घ्यायचा खेळ सुरू केला. रावण मोठ्या मुष्किलीनें त्या स्त्रियांच्या हातांतून निसटला आणि तेथून पळून गेला.

## रावणानें सीताहरण कां केलें?

त्या स्त्रियांनीं आपली अशी दीन परिस्थिति करावी याचें रावणाला नवल वाटलें. पण त्याबरोबरच नारदाचे शब्द त्याला आठवले. विष्णूच्या हातून मरण आल्यामुळें हे लोक एवढे बलाढ्य झाले आहेत, असें नारद म्हणाला होता. त्याचा त्याला रोकडा अनुभव आला. आपणहि विष्णूच्या हातूनच मरण मिळवायचें हा त्याचा दृढ निश्चय झाला. विष्णूच्या हातून मरण यायचें म्हणजे प्रथम त्याला कोप येईल असें कांहीतरी केलें पाहिजे. असें ठरवून त्यानें देवादिकांचा छळ केला. शेवटीं दंडकारण्यांत सीतेचें हरण केलें. राम हा विष्णूचा अवतार आहे, हें त्याला ठाऊक होतें. म्हणूनच त्यानें सीतेचें हरण केलें होतें. रामचंद्रापासून आपला वध व्हावा यासाठींच त्यानें हा खटाटोप केला होता.

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होईं मला नी जगदीश्वरास

× × ×

गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता–प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

**अर्जुन—**

१ संन्यासा स्तविता, देवा, पुन्हां कर्मास वानिता ।
सांगा, दोहोंत जें श्रेष्ठ, निश्चयें तेंचि तत्त्वतां ॥

**श्रीभगवान्—**

२ कर्मयोगें नि संन्यासें, दोन्हीनें मोक्ष वा मिळे ।
संन्यासाहूनि तें कर्म करणें तरि आगळें ॥

३ जाण तो नित्य संन्यासी द्वेष, इच्छा, न वा जया ।
द्वंद्वातीत अनायासें बंध–मुक्त धनंजया ॥

४ म्हणती मूर्ख, न ज्ञानी भिन्न संन्यास–योग हे ।
धरि जो दृढ एकातें तो दोहींच्या फळास घे ॥

५ संन्यासें मोक्ष जो लाभे कर्मयोगेंहि तो मिळे ।
ऐक्य दोहोंत या पाही तत्त्व त्यास खरें कळे ॥

६ संन्यास हा तरी कर्म–योगावीण सुदुर्लभ ।
कर्म–योगी मुनि ब्रह्म मिळे शीघ्र, नरर्षभ ॥

७ इंद्रिया नि मना जिंकी योगी तो शुद्ध अंतरीं ।
भूतमात्रीं स्वयें, ना तो बद्ध, कर्मे जरी करी ॥

८–९ बघतां, खातां, भाषण करितां, जातां, निजतां विसर्जितां ।
श्वासोच्छ्वासा करितां, घेतां, उघडझांप नेत्रीं करितां ॥

तसें स्पर्शता, कांहीं हुंगता, विषयिं इंद्रियें प्रवर्तती ।
कांहिंहि न करीं मी, जाणावें, ऐसें तत्त्वज्ञें चित्तीं ॥
१० कर्में ब्रह्मी समर्पुनी जो आसक्तीविण नित्य करीं ।
लिप्त न पापें, तो तो यानें पद्म—पत्र तें जेंवि सरी ॥
११ मनें, बुद्धिनें, देहें केवळ इंद्रियांनिही, बा करिती ।
कर्में योगी शुद्ध कराया चित्त, न आशा लव धरिती ॥
१२ योग—युक्त तो त्यजुनि कर्म—फल शान्ती मिळवी शेवटली ।
इतर बद्ध ते होति वासना—योगें आशा धरुनि फलीं ॥
१३ मनें सोडुनी सगळीं कर्में नउ दारांच्या या नगरीं ।
सुखें जितेंद्रिय देही राहे कांहीं करवी वा न करी ॥
१४ कर्तृत्व न वा कर्में अथवा कर्म—फलाची ती जोड ।
लोकांची ना निर्मी ईश्वर सकल प्रकृतीचे कोड ॥
१५ परमात्मा तो न घे कुणाचें पाप, पुण्य वा तूं जाण ।
मोह पावती प्राणी, कारण झांकी अज्ञाना ज्ञान ॥
१६ विनष्ट झालें ज्यांचें, ज्ञानें परंतु सारें अज्ञान ।
परमतत्त्व तें स्पष्ट करूनीं दावी रविसें, त्यां ज्ञान ॥
१७ बुद्धि रंगली, रमलें अंतर त्यांतचि, त्याचाच ध्यास ।
ज्ञान अशांचें पाप धुतें, ते न पुन्हां येती जन्मास ॥
१८ विद्या—विनय—विभूषित—विप्र, द्विज, चांडाल, श्वा, दन्ती ।
ज्ञानी—जन या समस्तांकडे समदृष्टीनेंची बघती ॥
१९ साम्यीं स्थिर मन ऐसें, त्यांनीं जन्म जिंकिला येथेंच ।
ब्रह्म सम नि निर्दोष म्हणूनी ब्रह्मीं वसती ते साच ॥
२० प्रिय लाभें ना हरिखे अथवा अप्रिय लाभें न उदास ।
ब्रह्मज्ञ स्थिर—बुद्धि असा तो सुज्ञ ब्रह्मीं करि वास ॥
२१ विषय—भोगिं जे उदास त्यांना सुख लाभे कीं आत्म्यांत ।
ब्रह्मीं वसती ते चित्तानें, अक्षय सुखिं त्या रमतात ॥
२२ संयोगें जे भोग, देति ते पार्था दुःखचि नी शोक ।
आरंभ नि त्या अंत, न रमती त्यांत शहाणे जे लोक ॥

२३ देहांत असे तोंवर हल्ले हे कामाचे नि क्रोधाचे ।
सोसूं शकतो तो योगी कीं त्यातें लाभे सुख साचें ॥

२४ तेजोमयचि स्वयें अंतरीं भोगी सुख नी आराम ।
ब्रह्मभूत तो योगी पावे ब्रह्म–मुक्तिचें कीं धाम ॥

२५ द्वैत गळूनी सकल–भूत हित कारितां मुनिवर ते रमती ।
आत्मसंयमी ते निष्पापी ब्रह्म–मोक्ष–गिरिवर चढती ॥

२६ आत्मज्ञानी नियत–चित्त जे काम–क्रोधातीत यती ।
ब्रह्म–मोक्ष त्यां सहजचि लाभे बसल्याठायीं सभोंवतीं ॥

२७–२८ स्पर्श बाह्य बाहेराचि ठेवी भ्रू–मध्यें स्थिर दृष्टि करी ।
नासिकांतुनी संचरणारे प्राणापान समान करी ॥
बुद्धि, इंद्रियें मन या जिंकी सुटले इच्छा क्रोध भय ।
मोक्षाचा ज्या ध्यास सदा तो मुक्तचि पार्था मुनि होय ॥

२९ भोक्ता यज्ञ–तपाचा, सकलहि लोकांचा मी थोर धनी ।
सखा तसा सर्वहि जीवांचा शांति मिळे हें ओळखुनी ॥

---



## संत सेना न्हावी यांचें मागणें

सांडोनी कीर्तन । न करीं आणिक साधन ॥
पुरवा आवडीचें आर्त । तुम्हां आलों शरणागत ॥
मुखीं नाम वाहिन टाळी । नाचेन निर्लज्ज राउळीं ॥
सेना म्हणे नुपेक्षावें । हेंचि मागे जीवेंभावें ॥

# संतांच्या गंमतीच्या गोष्टी

## साईबाबांनीं दान दिलें पण नशीब आडवें आलें

केव्हां केव्हां कांहीं विचित्र गोष्टींनीं साईबाबा भक्तांच्या श्रद्धेची कसोटी पाहात असत. १९१२ सालची गोष्ट. बरीच भक्तमंडळी जमलेली होती. द्वारकामाईत प्रसादाची हंडी तयार होत होती. हंडींत टाकण्यासाठीं आणलेलें मांस बारीक करण्याचें काम चाललें होतें. कधीं-कधीं अशी मांसाची हंडी होत असे. त्या दिवशीं शिरडीशेजारच्या एका खेड्यांतला एक ब्राह्मण बाबांच्या दर्शनासाठीं आला. दर्शन घेऊन तो परत जाऊं लागला. त्यावेळीं बाबा द्वारकामाईतून सभामंडपांत आले व मटन बारीक करणाऱ्यास म्हणाले, 'अरे यांतलें थोडें या ब्राह्मणाला द्या! त्याचीं मुलेंबाळें खातील!'

१९१२ सालीं भक्ष्याभक्ष्याचा विधि-निषेध केवढा! सोवळ्या ओंवळ्याचें बंड किती! त्यांतून तो खेडेगांवचा कर्मठ भिक्षुक. उभ्या आयुष्यांत त्यानें कधीं मांस डोळ्यानें पाहिलेलें नाहीं. स्वाभाविकच बाबांचे ते शब्द ऐकून त्याची भयानें बोबडी वळली. श्री. बाळाजी जगताप वगैरे कांहीं मंडळी मटन नीट बारीक करण्यासाठीं बसलेली होती. त्यांनाहि मोठा पेंच पडला. त्यावेळीं अशीहि भावना असे कीं ज्या दिवशीं मांसाहार केलेला असेल त्या दिवशीं ब्राह्मणास स्पर्शहि करूं नये. अशा परिस्थितींत त्या ब्राह्मणाला कचें मांस द्यायचें! आपण मांस द्यायचें कसें आणि हा ब्राह्मण तें नेणार कसें? उलटपक्षीं न द्यावें अथवा कांहीं उलट सांगावें तर बाबांच्या क्रोधाचें भय. ती मंडळी गोंधळून मोठ्या संकटांत पडली. इतक्यांत बाबा रागावून म्हणाले, 'अरे काय सांगतों मीं? त्याच्या पदरांत द्या थोडें मांस बांधून.'

मग घाबरून घाईघाईनें एकानें मुकाट्यानें मांसाचे चारपांच तुकडे त्या ब्राह्मणाच्या उपरण्याच्या पदरांत बांधून दिले आणि मनांतून मोठा कष्टी होऊन ब्राह्मण तेथून निघाला.

शिरडीपासून सुमारें दीड मैल आल्यावर एक पाण्याचा पाट लागला. पाणी पाहिल्यावर त्या ब्राह्मणाच्या मनांत आलें कीं मटन इथें टाकून द्यावें व उपरणें स्वच्छ करावें. तो रस्त्यालगतच्या शेतांत गेला नि तेथें उपरणें सोडून गांठींत बांधलेल्या मांसाकडे न पाहातांच त्यानें तें झटकून टाकलें आणि उपरणें धुण्यासाठीं तो पाटाकडे परत आला.

उपरणें धूत असतांना हाताला कांहींतरी कठीण लागलें. त्याला वाटलें मांसातलें हाड चिकटून राहिलें असावें. म्हणून पाहतो तों चांगली तोळा पाऊण तोळा वजनाची सोन्याची कांडी चकाकतांना त्याला आढळली! ती बघून तो ब्राह्मण अगदीं स्तिमित होऊन गेला! बाबांची अगम्य लीला आणि स्वतःचा करंटेपणा या दोहोंची त्याला एकाचवेळीं प्रचीति आली.

लगेच पळत पळत जिथें त्यानें मांस टाकून दिलें होतें त्या जागेकडे आला पण त्याला मांसाचा मागमूसहि लागला नाहीं. तो आशेनें परत द्वारकामाईत आला. त्यानें घडलेली हकीगत सर्वांना सांगितली. त्यांना ती सोन्याची कांडी दाखविली. हा प्रकार चालला होता, इतक्यांत बाबा तेथें आले आणि खूप क्रोधाचा अवतार धारण करून हातांत सटका घेऊन त्या ब्राह्मणावर धांवले. ब्राह्मण बिचारा घाबरून पळाला. बाबा नंतर म्हणाले, 'ब्राह्मण दुर्भागी! त्याच्या मुलांच्या नशिबांत तें होतें. पण याचें नशीब आडवें आलें.'

× × ×

## जग हालवून सोडणारें भाषण!

१८९७ सालची गोष्ट.

रामकृष्ण मिशनचा मठ स्थापन केल्यानंतर स्वामी विवेकानंदांनीं जन-हिताचीं अनेक कार्यें चालू केलीं होतीं. त्यासाठीं आपल्या गुरुभाईंना विविध प्रकारचें शिक्षण ते देत असत. त्यावेळीं मठ आलमबझार येथें होता. आपल्या गुरुबंधूंना सार्वजनिक सभांतून भाषणें करतां येणें आवश्यक आहे असें ठरवून, स्वामी विवेकानंदांनी आपल्या मठापुरती 'वक्तृत्वोत्तेजक सभा' चालू केली होती. प्रत्येक आठवड्याला एका ठराविक दिवशीं मठांतील संन्याशापैकीं कोणा तरी एकाला एखाद्या विषयावर तयारी करून भाषण करावें लागत असे.

स्वामी सुबोधानंदांची एका आठवड्याला बोलण्याची पाळी होती. सुबोधानंदांना जाहीर भाषणाचा कंटाळा. त्यांनीं आपल्यावरचा हा प्रसंग टाळण्याचा खूप प्रयत्न केला, पण विवेकानंदांनीं त्यांची ही लटपट चालूं दिली नाहीं. ठरल्या दिवशीं सभा भरली. सगळे मठवासी सभेला गोळा झाले आणि सुबोधानंदांची कशी काय गंमत होते हें पाहण्यासाठीं त्यांच्या भाषणाची उत्कंठेनें प्रतीक्षा करीत बसले.

व्याख्यान सुरू होण्याची वेळ झाली स्वामी सुबोधानंद व्यासपीठावर येऊन उभे राहिले. व्याख्यानाला त्यांनीं प्रारंभ केला आणि जेमतेम दोन चार शब्द ते बोलले न बोलले इतक्यांत—

इतक्यांत जमीन थरारली, इमारती हादरल्या, झाडें उन्मळून पडलीं आणि जिकडे तिकडे मोठा हाहाकार उडाला! कारण सुबोधानंदांचें भाषण सुरू होण्याच्या क्षणालाच १८९७ सालचा तो प्रचंड भूकंप झाला होता. अर्थात् मग कुठलें भाषण नि कुठलें काय!

भूकंपाच्या प्रचंड आपत्तीमुळें स्वाभाविकच सुबोधानंदांवरची भाषणाची आपत्ति टळली. पण तेव्हांपासून त्यांच्या वक्तृत्वाची प्रशंसा मात्र सतत होऊं लागली! स्वामी विवेकानंद म्हणत, 'जगांत अक्षरशः जग हालवून सोडणारें भाषण जर कोणी केलें असेल तर तें आमच्या खोका महाराजांनीं!'

सुबोधानंदांना 'खोका महाराज' असेंहि म्हणत असत. 'खोका' या बंगाली शब्दाचा अर्थ 'लहान' असा आहे. सुबोधानंद हे वयानें आपल्या गुरुबंधूमध्यें सर्वांहून लहान होते. म्हणून त्यांना हें नांव पडलें होतें.

## चहाचें माहात्म्य

स्वामी सुबोधानंदांना चहा अतिशय प्रिय असे. ते श्रीरामकृष्ण परमहंसांकडे येऊं लागले तेव्हां अगदींच पोरवयाचे होते. त्यावेळींहि चहावर त्यांची भक्ति खूप! रामकृष्णांच्या घशाला विकार झाला तेव्हां त्यांना त्यापासून अतिशय त्रास होई. औषधपाणी चालू होतें. एकदां लहानगा सुबोध त्यांच्या बरोबर बोलत असतांना त्यांना म्हणाला, 'आपण चहा घेऊन बघा ना! चहानें तुमच्या घशाला आराम पडेल अशी माझी पक्की खात्री आहे!'

रामकृष्णांची वृत्ति एखाद्या बालकासारखी! आपला निर्व्याज अंतकरणाचा सुबोध एवढ्या निश्चितीनें चहाची शिफारस करतो आहे, तेव्हां असेलहि चहामध्यें एवढा गुण! अशा विचारानें रामकृष्ण चहा प्यायला लगेच तयार झाले. पण डॉक्टरनीं हा दोघांचा विचार मोडून काढला आणि चहाचा उपाय तसाच राहिला.

पुढें मठामध्यें एकदां कोणत्या तरी विशेष कार्यामुळें स्वामी विवेकानंद स्वामी सुबोधानंदावर प्रसन्न झाले. ते सुबोधानंदांना एखाद्या देवतेचा आव आणून म्हणाले "वत्सा! मी तुझ्यावर आज प्रसन्न झालों आहे. तुला कोणता वर मागायचा असेल तर आत्तां मागून घे. तूं मागशील तो वर मी तुला देईन."

स्वामी सुबोधानंदांनीं गंभीरपणें स्वतःशीं खूप विचार केला. काय वर मागावा? पण त्यांना कांहीं सुचेना. कामिनीकांचनाची सारी आसक्ति ज्याच्या अंतःकरणांतून पार गेलेली आहे, संसाराचा ज्यानें निःशेष त्याग केला आहे आणि केवळ ईश्वर–सेवेला ज्यांनें आपलें सबंध जीवन वाहिलें आहे, त्याचें मन सदैव सुखरूप असल्यामुळें त्यानें मागावें तरी काय? सुबोधानंद बराच विचार करून म्हणाले,

"नाहीं बुवा! आपल्याला कांहीं मागायचं सुचत नाहीं."

विवेकानंद आग्रहानें म्हणाले, 'छे छे! तसं चालायचं नाहीं. मी एवढा प्रसन्न झालों आहें तर तूं एखादा वर मागून घेतलाच पाहिजे!'

त्यावर सुबोधानंदांना एकदम एक विचार सुचून ते म्हणाले,

'ठीक आहे! तर मग मला असा वर द्या कीं माझा सकाळचा चहाचा कप कधींहि चुकणार नाहीं!'

विवेकानंद हंसून म्हणाले, 'तथास्तु!'

सुबोधानंदांनीं कोणता प्रचंड वर मागून घेतला हें मठांतल्या लोकांना समजल्यावर खूप हंशा पिकला.

इथें एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. सुबोधानंदांचा सकाळचा चहाचा कप खरोखरीच त्यानंतर कधींहि चुकला नाहीं. अखेरच्या महासमाधीच्या दिवशींहि त्यांचा सकाळचा चहा झाला होता!

* * *

## एका पेयाची नवलकथा

स्वामी विज्ञानानंद हे पूर्वाश्रमीं इंजिनियर होते. बेलूर मठाच्या इमारती बांधण्याचें काम स्वाभाविकच त्यांच्या हातीं सोपविण्यांत आलें होतें. बेलूर मठासमोर गंगेला घाट बांधण्याचें काम त्यांच्याच

देखरेखीखालीं झालें. एकदां भर दुपारीं उन्हाचे ते गंगाकांठावर काम करीत होते. स्वामी विवेकानंदांनीं त्यांना उघड्या डोक्यानें उन्हांत खपतांना पाहिलें. ते आपल्या एक शिष्याला हांक मारून म्हणाले, 'अरे, विज्ञानानंद भर उन्हांत काम करतो आहे. त्याला थोडें थंडगार पेय नेऊन दे बरं.'

शिष्य त्याप्रमाणें पेयाचा ग्लास घेऊन निघणार इतक्यांत विवेकानंदांनीं त्यांतलें चार थेंबभर पेय एका ग्लासांत ओतलें आणि तें विज्ञानानंदांना नेऊन द्यायला सांगितलें. या थट्टेनें विज्ञानानंदांची कशी गंमत होते हें पाह्यला सारेजण जमले! विज्ञानानंदांनीं तें पाठविलेलें ग्लास घेतलें. आंत कांहीं थेंबभरच पेय आहे हें त्यांनीं पाहिलें. पण कांहीं न बोलतां मोठ्या गंभीरपणें त्यांनीं तें पिऊन टाकलें.

थोड्या वेळानें विज्ञानानंद मठांत आल्यावर विवेकानंदांनीं त्यांना विचारलें, 'पेय कसं काय होतं?'

विज्ञानानंद म्हणाले, 'छान होतं!'

दोघेहि यावर हंसले. पण लगेच गंभीर होऊन विज्ञानानंद पुढें म्हणाले,

'पण एक आश्चर्य सांगतों स्वामीजी! ते चार थेंबच खरे! पण ते मी प्याल्याबरोबर खरोखरीच माझी सारी तहान क्षणार्धांत पार नाहींशी झाली!'

× × ×

## ध्यानाचें गोड फळ!

स्वामी ब्रह्मानंद हे रामकृष्ण मिशनचे अध्यक्ष. त्यांच्या वागण्या-बोलण्यांत एक तऱ्हेचा राजासारखा रुबाब होता. त्यांना त्यांचे गुरुबंधु प्रेमानें राजाच म्हणत असत. सौजन्य, सहृदयता आणि सहानुभूति यांचा मूर्तिमंत अवतार असें त्यांचें वर्णन यथार्थपणें केलें जातें. विमल ज्ञान आणि परमार्थ भक्ति यांचा मनोहर संगम त्यांच्या ठिकाणीं झालेला होता.

पण ब्रह्मानंदांच्या ठिकाणीं खेळकरपणा आणि थट्टेखोरपणाहि भरपूर होता! लहान मुलांशीं ते खेळत असले म्हणजे त्या मुलांइतकेच ते जणूं लहान होऊन त्यांच्याशीं समरस होऊन जात.

आपल्या गुरुबंधूंची आणि शिष्यांचीहि ते कधीं कधीं प्रेमानें थट्टा करीत आणि आश्रमांत हास्याचा पूर लोटे.

एकदां एक शिष्य डोळे मिटून ध्यानाला बसला होता. ब्रह्मानंदांनीं एक फळ हळूच त्या शिष्याच्या पुढ्यांत आणून ठेवलें. कांहीं वेळानें तो शिष्य ध्यानांतून पूर्वावस्थेवर येऊन त्यानें डोळे उघडले. त्याबरोबर ब्रह्मानंद त्याच्या पुढ्यांतल्या फळाकडे बोट दाखवून म्हणाले, "अरे वा! हें बघ तुझ्या ध्यानाचें फळ! ध्यानाचें फळ गोड असतें यांत आतां कांहीं शंका आहे काय?"

## मेण्यांतला प्रवास

एकदां ब्रह्मानंदांचा एक गुरुबंधु कांहीं अगत्याच्या कार्यासाठीं रात्रीं गांवाला जायला निघाला. आणखी एक दिवस रहा असा ब्रह्मानंदांचा आग्रह होता. पण काम मठाचें आणि तें निकडीचें असल्यामुळें त्यानें ऐकलें नाहीं. अखेर मोठ्या अनिच्छेनें ब्रह्मानंदांनीं त्याला जाण्याची परवानगी दिली.

त्या गुरुबंधूला रात्रौ स्टेशनवर नेण्यासाठीं मेणा यायचा होता. तो आला. मेणा निघण्यापूर्वी ब्रह्मानंदांनीं मेण्याच्या भोयांना बोलावून हळूच कांहीं तरी त्यांच्या कानांत सांगितलें. नंतर तो गुरुबंधु मेण्यांत बसला. मेणा निघाला. 'हूं : हूं :' या तालावर भोई मेणा खांद्यावर घेऊन चालूं लागले. रात्रीची वेळ असल्यामुळें त्या मेण्यांतील संन्याशाचा डोळा लागला. रात्रभर मेणा चालत होता. उजाडायच्या वेळीं भोयांनीं मेणा जमिनीवर ठेवला. डोळे उघडून मेण्यांतला संन्याशी पाहातो तों आपण मठाच्या दाराशीं आहोंत असें त्याला आढळलें! आंतून स्वामी ब्रह्मानंद मोठा गंभीर चेहेरा करून पुढें आले आणि त्यांनीं आपल्या गुरुभाईचें स्वागत केलें! त्याला आपण हंसावें कीं रागवावें हें समजेना! रात्रभर मेण्यांत बसून प्रवास करून तो परत मठांतच आला होता!

———


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, (अध्याय ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | ,, | ,, | १–०–० |
| (७) | श्री साई–लीलामृत | ,, | ,, | २–०–० |
| (८) | श्री साई–सुमनांजली | ,, | ,, | ०–१–० |
| (९) | कीर्तन–पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | ,, | ,, | १–८–० |
| (१०) | शीलधी (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | ,, | ,, | २–०–० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | ,, | ,, | ०–२–० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | ,, | ,, | ४–८–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.
(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. १

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# आरती

आरती सद्गुरु साई की । कहूँ महिमा अपार जिनकी ॥
कृपा कर अब तो कृपानिधान, सुबुद्धि ऐसी करो प्रदान ।
लगे मम श्री चरणन में ध्यान, हो जिससे भक्तों का कल्याण ।
मिटे पीडा सब भक्तन की । कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥१॥

सुनी भक्तों की सदा पुकार, कर दिये भवसागर से पार ।
तुम्हारी माया अपरमपार, शरण में अब तो लो कर्तार ।
रहे छाया श्री चरणन की, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥२॥

भावना रही जिसकी जैसी, लखी प्रभु मूरति तिन तैसी ।
तुम्हारी माया की शैली, है चातक स्वाति बिंदु जैसी ।
मिटो दो तृष्णा दर्शन की कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥३॥

सदा भक्तों के रखवारे, मिटाते उनके दुख सारे ।
हजारों ही तुमने तारे, जीवन तुम पर ही वारे ।
हो मुक्ति जिससे जीवन की, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥४॥

तुम हो पूर्ण ब्रह्म भगवान, मैं हूँ खल मूरख अज्ञान ।
तुम्हारा ही करते गुणगान, निकले इस तनसे जब प्राण ।
भावना पूर्ण होय मनकी, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥५॥

नहीं कुछ संपत्ति मेरे पास, केवल श्री चरणन की आस ।
लगी है "देव" हृदय में ताप, मिटे जिससे मनका संताप ।
पूर्ण इच्छा हो जीवन की, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥६॥

**श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय**

मकर संक्रान्ति महू १३-१-५७

रचियता—श्री. देवकरन

‘ ट्रीटमेंट ’ द्यायला आलेले डॉक्टर स्वतःच ट्रीटमेंट घेऊन परत गेले ! कारण—

# विनोबांचा वैद्य परमेश्वर

आचार्य विनोबा भावे यांना सर्वजण बाबा म्हणतात. बाबांच्या भूदानकार्याची माहिती भारताच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोंचलेली आहे. बाबांचें भूदानकार्य हें राजकारण म्हणून चाललेलें नसून ईश्वरसेवा म्हणून चाललेलें आहे. विनोबांनीं आपल्या भक्तीच्या बळानें देहावर कसा विजय मिळविला आहे याची एक मनोवेधक आठवण श्री. दामोदरदास मुंदडा यांनीं ‘ भूदान–यज्ञ ’ साप्ताहिकाच्या एका अलिकडच्या अंकांत दिली आहे. ती अशीः—

त्या दिवशीं बाबांचा मुक्काम एका खिश्चन शाळेंत होता. मुक्कामावर परत येतांच “ गीता–प्रवचना ” वर स्वाक्षरी देण्यास त्यांनीं सुरुवात केली होती. पण तेवढ्यांतच त्यांना कांहींशी अस्वस्थता वाटूं लागली. वरचेवर ते पोटावरून हात फिरवूं लागले. लेखणीला डेस्कचा आधार देऊन स्वाक्षरी देण्याचें काम चालूच ठेवलें. जवळच मीराबहेन उभी होती, तिला कळेनाच कीं हजारों “ गीता प्रवचनां ”वर स्वाक्षरी देणारे हात आज असे संकोच कां करीत आहेत ? त्यांना कांहींशी अस्वस्थता वाटूं लागली असल्याचा संशय तर आलाच होता. शेवटीं हात थांबला आणि कित्येक लोकांना निराश व्हावें लागलें. घरीं परतण्याऐवजीं ते रस्त्यावरच थांबून राहिले.

बाबांच्या पोटांत दुखूं लागलें होतें. सर्वांचे डोळे या महामानवावर खिळले होते. एका क्षणांत वातावरण गंभीर चिंतेनें भरून गेलें. वाऱ्यासारखी बातमी सर्वत्र पसरली आणि सारा गांव तेथें गोळा झाला.

बाबांना फारच अशक्तता वाटूं लागली. डॉक्टरांच्या सांगण्यावरून त्यांनीं एनिमा घेतला, परंतु फरक वाटला नाहीं. वेदना तीव्र होत राहिल्या. बाबांच्या तोंडून ‘ आई–आई ’ असा व कण्हण्याचा आवाज निघूं लागला. डॉक्टरांनीं कांहीं गोळ्या खाण्याबद्दल त्यांना पुनः पुनः प्रार्थना केली. अशा वेदनांवर अल्युमिनियमच्या गोळया त्यांनीं सुचविल्या. बाबांनीं ध्यान देऊन सर्व ऐकलें. नंतर नम्रतापूर्वक म्हणाले. “ मी आतांपर्यंत यावर कसलेंहि औषध घेतलेलें नाहीं. ”—परंतु एवढें बोलतांनाहि त्यांना फार कष्ट होत होते. आतांपर्यंत केवळ वेदनाच होत होत्या, आतां जीव घाबरा व्हायला लागला, श्वास घ्यायला कष्ट पडूं लागले. सर्वांची मनःस्थिति चिंताव्याकुळ होणें स्वाभाविकच

होतें. मूक प्रार्थनेशिवाय कोणीच कांहीं करूं शकत नव्हता. वेदना आणखीच तीव्र होऊं लागल्या. गेल्या पांच-सात वर्षांत असा त्रास त्यांना झाल्याचें आम्ही पाहिलें नव्हतें.

खिडकीबाहेर दृष्टि जातांच, शेकडों लोकांच्या चिंतायुक्त मुद्रा पाहून ते म्हणाले,—"एका माणसाकरितां किती लोकांना चिंता!" या सर्वांची चिंता हरणाऱ्या सर्वशक्तिमान् प्रभूलाच जणूं कांहीं त्यांनीं हृदयपूर्वक आवाहन केलें. इकडे जवळ जे कोणी होते, त्या सर्वांच्या हृदयांत द्रौपदीच्या आणि गजेंद्राच्या आर्ततेचा प्रतिध्वनि उमटत असला तर आश्चर्य नाहीं.

बाबांच्या पचनक्रियेवर परिमाण झालेला होता हें त्यांना झालेल्या उलटीवरून लक्षांत आलें. आदल्या रात्रीं त्यांना नीट झोंप लागली नव्हती, कारण जेथें मुक्काम होता, त्याच्याच शेजारीं लग्नानिमित्त जोराची धामधूम सुरू होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुक्कामावर पोहोंचेपर्यंत ऊनहि खूप कडक पडलें होतें आणि दुपारींहि वानरसेनेमुळें त्यांना विश्रांति मिळाली नव्हती. या सर्वांचा परिणाम पचनक्रियेवर झाला होता.

थंडी तर बाबांना सुरुवातीपासूनच वाजत होती. त्यांनीं थोडासा शेकहि घेतला. उलटीनंतर थंडी जास्त वाजूं लागली. अंगांत तापहि भरला; परंतु संकट टळल्यासारखें सर्वांनाच वाटलें. खाटेवर निजवून बाबांना मग बाहेर हॉलमधें आणलें. त्यांना स्वतःलाहि थोडी शांति वाटत होती. खाट बाहेर आणतांना ते म्हणाले, 'चार लोक आहेत ना?'—असा कठोर विनोद तेच करूं शकत होते, परंतु त्यांना प्रसन्न वाटावें म्हणून उत्तर दिलें गेलें, 'नाहीं, त्रयाणां धूर्तानाम् आहेत.'

उद्यांपासून दुसरा जिल्हा सुरू होणार होता. जिल्ह्यांतील सेवक उपस्थित होते. पुढील कार्यक्रम स्थगित करण्याची सूचना तारेनें देण्यांत आली होती आणि कांहीं दिवस येथेंच विश्रांति घेण्याची व्यवस्था करण्यांत आली. कदाचित् अंतःप्रेरणेनें या सर्व गोष्टींचें भान बाबांना झालें असावें. ते ताईना म्हणाले, 'महादेवी! बाबा आतां पांच मैल चालत जाऊं शकतो.' चतुर ताईनें ताबडतोब त्यांना म्हटलें, 'तुम्हांला आतां विश्रांति घ्यावयाची आहे!' परंतु त्या थंडी-तापांतहि बाबांनीं बोलणें चालूच ठेवलें.

'किती मैल आहे आजचा मुक्काम?'

'नऊ मैल, दोन फर्लांग.'

'डॉक्टरांना यायचें असेल तर आत्तां ते येऊं शकतात. यात्रा साडेचार वाजतां सुरू होईल.' आतां ताईच्यानें राहावेना, दुःख आणि चीड दोन्ही उफाळून आलीं. "तुम्ही कोणाचें ऐकतच नाहीं, मग सर्वांनाच काळजी वाटते! आज यात्रा होणार नाहीं. डाक बंगला चांगला आहे आणि तुमचा जाण्याचाच हट्ट असेल, तर मोटारींतून जावें लागेल. मोटार तयार आहे.'

'हें पहा महादेवी, हा कांहीं चर्चेचा विषय नव्हे, मी आणि ईश्वर यांच्या मधली ही गोष्ट आहे. जोंपर्यंत शरीर यात्रा करूं शकतें तोंपर्यंत तें करणारच. ज्या दिवशीं पाय थकतील आणि ईश्वराची इच्छा असणार नाहीं त्या वेळीं तो मोटा-

रीत बसवील. यात्रा पायींच होणार, तुम्ही मोटार घेऊन मागें मागें येऊं शकतां.'

दर दोन मैलांवर ताई मोटारींतून उतरत असे आणि बाबांना मोटारींत बसण्याचा आग्रह करीत असे, पण बाबा कांहीं ना कांहीं तरी निमित्त करून टाळत असत. शेवटीं जेव्हां ताई ऐकेचनात तेव्हां ते म्हणाले, 'जा, सातव्या मैलावर व्यवस्था करा.' आणि जेव्हां सातवा मैल आला तेव्हां ते हंसून म्हणाले, 'अरे, आतां तर आलों. जा, पुढच्या मुक्कामावर जाऊन व्यवस्था करा. आम्ही आलोंच.' —ताईनीं पाहिलें कीं अखेर बाबांनीं आपल्याला फसविलें आहे. त्या गुपचूप निघून गेल्या. आर्यनायकम्‌जी म्हणाले, 'बाबा, आज तुम्ही डॉक्टरांचे सर्व कायदे झुगारून दिले. डॉक्टरांनीं आम्हांला स्पष्ट सांगितलें होतें कीं कोणत्याहि परिस्थितींत पेशंटनें चालतां कामा नये.'

'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्, ।' बाबा उत्तर देऊं लागले, "परमानंद माधवाच्या कृपेनें काय होऊं शकणार नाहीं?" मग त्यांनीं रामदासांचा श्लोक म्हटला, 'ईश्वर नित्य माझ्या जवळच आहे. माझा लहानसा प्रयत्नहि तो कृपा दृष्टीनें पाहत असतो. कैवल्यदानी, सुखानंद आनंदराम आपल्या भक्तांचा अभिमानी आहे, तो त्यांची कधींच उपेक्षा करीत नाहीं. त्याला आपल्या दासांचा अभिमान आहे, पण आपण खरेखुरे दास बनतोंच कुठें?"

डॉक्टर दिवसभर बरोबर राहिले होते. दोन वेळां बाबांना त्यांनीं तपासलें. त्यांच्या जुन्या अल्सरबरोबरच त्यांना 'गॉल ब्लॅडर'ची भीति उत्पन्न झाल्याचें आढळलें. ब्लडप्रेशरहि फारच कमी होतें. ताप नव्हता, पण अशक्तपणा होता. पण तरी सुद्धां नऊ मैल चालून ते आले होते. सायंकाळच्या प्रार्थनेंत ते बोललेहि. दुपारीं कार्यकर्त्यांचें संमेलनहि झालें. डॉक्टर तर त्यांची दिनचर्या पाहून स्तंभितच झाले.

सातत्ययोगाचा महिमा आज पुनः एकदां त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानेंच सिद्ध केला होता.

डॉक्टर निरोप घ्यायला आले. 'गीता-प्रवचना'वर स्वाक्षरी घेतली. भक्तिभावानें साष्टांग प्रणिपात केला, सद्‌गदित होऊन परतले. रस्त्यामध्यें ते मला म्हणाले, "मी आलों होतों त्यांना ट्रीटमेंट द्यायला पण मी स्वतःच ट्रीटमेंट घेऊन जात आहें! या निमित्तानें त्यांचा सत्संग लाभला हें माझें भाग्य होय. त्यांचा वैद्य तर परमेश्वरच आहे, त्यांना माझ्यासारख्या वैद्याची काय गरज?"

# ज्ञानेश्वर

श्री ज्ञानेश्वर महाराज व त्यांची अमर वाङ्मयमूर्ति ज्ञानेश्वरी यांविषयीं जनतेच्या अंतःकरणांत नेहमींच आदर, प्रेम व जिव्हाळा आहे. व जसजशी वर्षें जातात, तसतशी त्यांत भरच पडत आहे. ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी याविषयीं कोणी बोलूं लागला कीं, श्रोते ऐकण्यास उत्सुक असतात. आज मी आपणापुढें ज्ञानेश्वरी ग्रंथांतून ज्ञानेश्वर महाराजाविषयीं काय माहिती मिळते याविषयीं कांहीं विचार मांडणार आहें. 'ज्ञानेश्वरींतील ज्ञानेश्वर,' हा विषय तसा कुतूहल निर्माण करणारा आहे. पण ज्ञानेश्वरीद्वारां ज्ञानेश्वर महाराजांविषयीं माहिती चटकन् मिळविणें कठीण काम आहे. कारण ज्ञानदेव हे 'माझें असतेपण लोपो, नामरूप हारपो,' अशा अदानित्व वृत्तीचे असल्यामुळें त्यांनीं आपल्या लौकिक चरित्रा विषयीं जवळजवळ मौनच पाळलें आहे. तुकाराम महाराज अथवा एकनाथ महाराज यांच्या ग्रंथाची गोष्ट या दृष्टीनें निराळी आहे. तुकाराम महाराजांनीं आपल्या ग्रंथांत आपलें लौकिक चरित्र, साधनमार्ग, त्यांना आलेले पारमार्थिक उच्च अनुभव लिहून ठेवले आहेत. नाथांच्या ग्रंथांत संसारांतील गृहस्थाश्रमाचें तपशील-वार वर्णन आललें आहे. तसें ज्ञानदेवाच्या ग्रंथांत आपणांस आढळत नाहीं. फार तर 'वधूवराचिये मिळणी । जैसी वऱ्हा-डियांहि लुगडीं लेणीं ।' असा दृष्टांत सांपडतो. 'जन्मनेनि प्रसंगे । स्त्री देह शिवणें अंगे । तेथेनी जन्म अवघे । सोवळी कीजे ।' असे ज्ञानदेव होते. ते संसाराला शिवलेच नाहींत, ते संसाराचें यापेक्षां जास्त काय वर्णन करतील ?

ज्ञानेश्वरींत ज्ञानदेवांचे आई, वडील अथवा कूळ याविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. त्यांचे गुरु श्रीनिवृत्तिनाथ यांचें जें वर्णन आलें आहे, तेंहि लौकिक स्थितीचें नसून, त्यांच्या उच्च अध्यात्मिक स्थितीचें आहे. नाहीं म्हणावयास १८ व्या अध्यायांत निवृत्तिनाथांचा महिमा वर्णन करतांना ज्ञानदेवांनीं दोन ओव्या स्वतःबद्दल लिहिल्या आहेत. परंतु त्या ओव्या स्वतःचें वर्णन करण्याकरितां नसून, ज्या गुरुकृपेमुळें ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्माण झाला, ती गुरूकृपा आपणांस कशी प्राप्त झाली हें सांगण्याकरितां लिहिलेल्या आहेत. या ओव्या अशा आहेत.

माझिया सत्यवादाचें तप ।
वाचा केलें बहुत कल्प ।
म्हणोनि फळाशि हे महाद्विप ।
पातली प्रभो ।
पुण्यें पोशिलीं असाधारणें ।
तियें तुझे गुण वानणे ।
देऊनि मज उत्तीर्णें । झाली अजी ॥

ज्ञानदेव म्हणतात, माझ्या वाणीनें मागील असंख्य जन्मांत केवळ सत्य बोलण्याचेंच तप केलें, त्याचें फल म्हणून माझ्या वाणीतून ही गीतेवरील टीका बाहेर पडत आहे. ' माझा मऱ्हाठाचि बोलु कौतुकें । अमृतातेंही पैजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ।' किंवा ' मऱ्हाठेचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी । घेणें देणें सुखचि वरी । हो देईं ज्या जगा ।' अशा योग्यतेचा ज्ञानेश्वरी हा परिपूर्ण ग्रंथ आहे. याचें कारण तो ज्या वाणींतून निघाला, ती वाणी सत्यवादित्वाच्या तपश्चर्येनें पुनीत झालेली आहे.

ज्ञानेश्वरींत ज्ञानदेवांच्या विद्यावंशाची नाथ परंपरेची माहिती मिळते. ' महेशान्वय संभूते । श्री निवृत्तिनाथ सुतें । केलें ज्ञानदेवें गीतें । दोहीकार लोपे ।' या ओवींत हा विद्यावंश स्पष्टपणें दिसून येतो. परंतु या ओवीवरून एका संशोधकानें निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवाच्या वडिलांचें नांव व महेस ( रेडे ) हे त्यांचें आडनांव होतें असा अजब शोध लावला आहे! या संशोधकानें ज्ञानेश्वरी ग्रंथ एकदां जरी समग्र वाचला असता तरी त्यास कळून आलें असतें कीं, महेश म्हणजे श्री शंकर असून त्या अर्थानें अनेक ठिकाणीं ज्ञानेश्वरींत महेश शब्द आला आहे.

' क्षीर सिंधु परिसरी । शक्तिच्या कर्ण कुहरीं । नेणो कै त्रिपुरारी । सांगितलें जें ।' यांत पुन्हां शंकराचा स्पष्ट उल्लेख आहे. शंकर, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ व निवृत्तिनाथ अशी नाथपरंपरा ज्ञानदेवांनीं दिलेली आहे. शिष्य हा गुरुपुत्र असतो म्हणून 'निवृत्तिनाथसुतें' असें ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे. ज्ञानेश्वरीवरून आपणांस निश्चित दिसून येतें कीं, ज्ञानदेवांनीं आपली टीका पूर्णावस्थेंत लिहिली आहे. हें सांगावयाचें कारण म्हणजे कांहीं लेखकांनीं असें म्हटलें आहे कीं, ज्ञानेश्वरी हा स्वतंत्र प्रज्ञेचा ग्रंथ नसून तो अपूर्णावस्थेचा आहे. यानंतर लिहिलेला ' अमृतानुभव ' हा परिपक्व स्थितींतला ग्रंथ आहे. लेखकांचें अमृतानुभवावरील प्रेम यांत दिसून येत असलें तरी आपण ज्ञानदेवांचेवर काय अन्याय करीत आहों, याची त्यांस कल्पना दिसत नाहीं. कारण ज्ञानेश्वरीच्या सुरवातीसच ' कां चिंतामणि झालिया हातीं । सदा विजय वृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ति । ज्ञानदेवो म्हणे ।' अथवा, ' तुझिया प्रणति । मी पूर्ण झालों श्रीनिवृत्ति ।' असें ज्ञानदेव स्वतःच सांगतात. सहाव्या अध्यायांत ' दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बालपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥' ' तीथे सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनाचि सारस्वतें दुभे । मग सकळ शास्त्र स्वयंभे । निघतीं मुखें ॥' या योगी पुरुषांचे वर्णनांत त्यांचा स्वानुभवच दिसून येतो.

ज्ञानदेवाच्या ठिकाणीं उत्कृष्ट कर्म, उत्कृष्ट ज्ञान, उत्कृष्ट योग व उत्कृष्ट भक्ति यांचा सुंदर संगम आढळतो. सोन्याच्या कलशांत गंगेचें उदक असावें, त्याप्रमाणें बाह्य शुद्ध कर्माचरण व आंत विमल आत्मज्ञान असा त्यांचा आदर्श पुरुष आहे. ऐहिक धडा पक्का करून नंतरच परत्राच्या गोष्टी बोलाव्यात. घरच्या माणसांशीं ज्याला नीट वागतां येत नाहीं, त्यांनीं बाहेर लोकोद्धाराच्या गोष्टी सांगण्याचा मूर्खपणा करूं नये असें त्यांचें मत आहे.

सारांश, अज्ञ समाजासाठीं तळमळणारे, ज्ञानी व योगी, पूर्ण–काम, सगुण रूपाची आवड असणारे, श्रेष्ठ गुरुभक्त व अंगीं थोरपणा व व्युत्पत्ति असूनहि ती विसरणारे, दुसऱ्याचा उपहास न करतां त्याला सन्मार्गाला लावणारे, जगाचें कल्याण साधणारे, एक ना अनेक ज्ञानदेवांच्या गुणांचें ज्ञानेश्वरींत दर्शन घडतें. त्यांच्याबद्दल यथार्थ तें बोलणें अशक्य आहे. 'नेणों युक्तिचिया खोली' म्हणून जेथें तुकोबारायें स्वस्थ बसले, तेथें माझ्यासारख्या पामराचा काय पाड? माझ्यासारख्यानें त्यांचे चरणीं मस्तक ठेवून निवांत रहावें, हेंच उचित होय.

[आकाशवाणीच्या सौजन्यानें]

---

# करुणा हें भक्तीचें रूप

भक्ति जेव्हां करुणेच्या रूपांत प्रकट होईल तेव्हांच ती वास्तविक भक्ति होईल. मी असे कांहीं मूर्तिपूजक पाहिलेले आहेत कीं, जे कठोर हृदयाचे आहेत. रोज पूजा–अर्चा करतात; परंतु जीवनांत तेवढेच कंजूष आणि निर्दय असतात. शास्त्रांत असे लिहिलें आहे कीं, आपण जसें ध्यान करतों तसेंच रूप आपणांस मिळतें. कधीं कधीं तर मला असें वाटतें कीं, दगडाच्या मूर्तीचें ध्यान करणारे दगडाचें ध्यान करतां करतांच दगडाप्रमाणेंच कठोर बनत असतात. आणि याचा परिणाम म्हणून लोक नास्तिक बनतात. जे दगडाची पूजा करतात आणि स्वतःच दगड बनतात. त्यांनाच मी दोष देतों. मूर्तीची पूजा करणें चुकीचें आहे असें मी म्हणत नाहीं, तोहि ईश्वरभक्तीचाच एक प्रकार आहे; परंतु खऱ्या उपासनेचें स्वरूप हेंच आहे कीं, हृदयांत करुणा भरलेली असणें आणि सर्व ईश्वरस्वरूप आहे याची जाणीव होणें. परमेश्वर म्हणजे प्रेम. जो मंदिरांत जाईल तोच भक्त म्हणून ओळखला जाईल असें कांहीं नाहीं. उलट या मंदिरांत जी भक्ति होते तिला मी प्रयोगशाळेंतील प्रयोगाप्रमाणें एक प्रयोग म्हणून समजतों. हा प्रयोग जर तेथें सफल झाला तर तो सर्व समाजाला लागू केला पाहिजे. मला जर कोणी म्हटलें कीं, समाधि, भक्ति आणि अहिंसा या गोष्टी सर्वांसाठीं नाहींत, त्या एखाद्या मनुष्यासाठीं असूं शकतात, तर मी म्हणेन कीं या गोष्टी मग आमच्या कामाच्याच नाहींत! हवा, पाणी आणि सूर्याचा प्रकाश जर सर्वांच्यासाठीं आहे तर समाधि, अहिंसा आणि भक्ति या गोष्टी समाजासाठीं कां नाहींत? समाजाला त्यांची आवश्यकता आहेच आणि या गोष्टी प्रत्येकासाठीं आहेत, म्हणूनच त्यांची एवढी किंमत आहे.

—विनोबा

# भक्तावतंस नाना

ना. वा. गुणाजी

## नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर
## ( १८६०–१९२१ )

**" जयां परमार्थी खरी गोडी । तयाची साईस मोठी आवडी ॥**
**वारूनि सर्व तयांचीं सांकडीं। स्वानंद जोडी दे तयां ॥ "**

—श्रीसाईसच्चरित ४१–७४

**" नाना परम भाग्यशाली । साईची अनन्य सेवा फळली ॥**

—श्रीसाईसच्चरित. ७–११२

मागील प्रकरणांत श्रीसाईबाबांचे विरागी भगद्रत्न म्हाळसापति यांची कथा सांगितली. आतां 'भक्तावतंस नाना' यांची गोड आणि स्फूर्तिदायक कथा ऐका.

**नानांची कामगिरी**—नानासाहेब चांदोरकर हे इ. स १८९२ सालापासून श्रीसाईबाबांकडे जाऊं लागले आणि श्रीबाबांच्या समाधीपर्यंत ( १९१८ सालपर्यंत ) त्यांचें शिरडीस येणें जाणें होतें आणि श्रीबाबांशीं त्यांचा संबंध अति जिव्हाळ्याचा होता. ह्या सर्व अवधींत म्हणजे सुमारें २५।२६ वर्षें बाबांचें निरुपमेय प्रेम नानासाहेबांवर होतें आणि नानासाहेबांची अनन्य श्रद्धा बाबांवर होती आणि त्यांनीं बाबांची निष्काम सेवा अति उत्तम तऱ्हेनें केली. विशेषतः दोन गोष्टीमुळें नानासाहेब बाबांच्या भक्तांना चिरस्मरणीय राहतील यांत शंका नाहीं. पहिली गोष्ट ही कीं, बाबांचें वसतिस्थान म्हणजे एक पडकी मोडकी तुडकी मशीद होती. तिचा त्यांनीं जीर्णोद्धार केला, म्हणजे ती मोडून फिरून बांधली व मोठी केली. या जीर्णोद्धाराचें काम त्यांनीं नानासाहेब निमोणकरांच्या देखरेखी· खालीं, कोंडाजी गबाजी आणि तुकाराम या तिघां सुतार बंधूकडून करवून घेतलें. त्यांची दुसरी कामगिरी म्हणजे त्यांनीं बाबांच्या कीर्तीचा प्रसार स्वतः आणि श्रीदासगणू महाराज यांचेद्वारा करून मुंबईच्या आजुबाजूच्या लोकांना बाबांच्या सहवासाचा आणि आशीर्वादाचा लाभ करून दिला.

**मशीद उर्फ द्वारकामाई**—बाबा प्रथम शिरडीस आले तेव्हांपासून या मशीदींत राहूं लागले. ही मशीद म्हणजे

एक लहानसा ओटा अथवा व्हरांडा व त्यापलीकडे एक लहान खोली आहे. बाबा येथें बसत असत आणि त्यांचे समोर एक धुनी अहोरात्र पेटत ठेविलेली असे आणि हल्लींहि ती तशीच पेटत ठेविलेली असते. या खोलीचे मध्यभागीं कोपरा किंवा कमान (निंबर) असून तेथें बाबांच्या वेळीं फुलांच्या माळा लाविलेल्या असत आणि बाबा तेथें बसून दुपारच्या आरतीनंतर नैवेद्याचा काला करून सर्वांना वांटीत असत आणि धुनींतील रक्षा-उदी सर्व भक्तांना मशीदीच्या दारांत उभे राहून लावीत असत, आणि त्यांना निरोप देत असत. बाबा या मशिदीला नेहमीं द्वारकामाई म्हणत असत.

" हीच आपुली द्वारकामाता ।
मशीदीचे या अंकीं बैसतां ॥
लेंकुरा देई ती निर्भयता ।
चिंतेची वार्ता नुरेची ॥
एकदां हिचे अंकीं जो बैसला ।
बेडा तयाचा पार पडला ॥
सावलींत हिचे जो पहुडला ।
तो आरूढला सुखासनीं ॥

—श्रीसाईसच्चरित. २२-४८ व ५०

**श्रीबाबांचा यशोदुंदुभि**—नानासाहेबांनीं बाबांच्या कीर्तीचा जो प्रसार केला त्याविषयीं थोडेसें वर्णन करणें योग्य होईल. इष्टमित्रांच्या भेटी झाल्या म्हणजे प्रसंगानुसार योग्य संधि साधून नानासाहेब बाबांचे गुणानुवादन करीत असत आणि श्रोत्यांचे ठायीं बाबांचें दर्शन घ्यावें अशी उत्कट इच्छा उत्पन्न करीत असत; अशापैकीं कांहीं निवडक वेंचीव उदाहरणें येथें देत आहें.

**१ श्रीसाई लॉज**—नानासाहेबांच्या प्रेरणेनें गुरुवार ता. २८ एप्रिल १९१० रोजीं ज्या मुंबईच्या नवभक्तांना बाबांचें दर्शन झालें त्यांनीं मुंबईत जुन्या हनुमान-गल्लींत रा. ब. मोरेश्वर वि. प्रधान यांच्या घरीं श्रीसाई लॉज स्थापन केला त्याची हकीगत श्रीसाईलीला वर्ष १३, अंक ४,५,६ पान १३–१४ येथें दिलेली आहे. त्यांत या नवभक्तांचीं नांवें असून नानासाहेबांनीं त्यांना साईदर्शनाबाबत दिलेली एक सूचना आहे, ती अशीः—पहिल्यानें साठे-नवलकर वाड्यांतील श्रीनिंबाचे वृक्षाखालील बाबांच्या गुरूच्या समाधीचें दर्शन घेऊन त्यास प्रदक्षिणा घालून नंतर श्री बाबांच्या दर्शनास जावें, हल्लींहि दर्शनास जाणाऱ्या मंडळींनीं, प्रथम निंब वृक्षाखालील समाधीचें दर्शन घेऊन नंतर मशीदींत बाबांच्या छबीचें (म्हणजे प्रत्यक्ष बाबांचें) दर्शन आणि त्यानंतर वाड्यांतील समाधीचें दर्शन घेण्याची प्रथा ठेविल्यास योग्य होईल.

**(२) श्री काकासाहेब दीक्षित**—कै. हरि सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित हे नानासाहेबांचे कॉलेजमधील सहाध्यायी व जुने स्नेही होते. नानांची व त्यांची भेट इ. स. १९०८।०९ चे सुमारास लोणावळ्यास झाली. तेव्हां आपण विलायतेंत असतांना आपला पाय दुखावला, पुष्कळ इलाज करून पाहिले तरी तो बरा होत नाहीं इ. हकीकत काकांनीं नानांना सांगितली तेव्हां —

" तो पायाचा लंगडेपणा ।
निःशेष जावा येतें का मना ? ॥
चला माझे गुरूचे दर्शना ।
ऐसें तंव नाना वदले तयां ॥ "

श्रीसाईसच्चरित. ५१–२६

त्यानंतर काकांनीं शिरडी कोठें आहे वगैरे माहिती घेऊन दर्शनास जाण्याचें कबूल केलें आणि पुढें दर्शनहि घेतलें. याविषयीं काकांची विस्तृत चरित्रासह हकीगत पुढें योग्य प्रसंगीं देण्यांत येईल.

(३) **बाबांचें बाळ** (श्री. बा. वि. देव सेवानिवृत्त मामलेदार—ठाणें) नानासाहेबांची व यांची १९१० सालीं गांठ पडली. यांना नानासाहेबांनीं प्रत्यक्ष अनुभवाच्या अति गोड, सुरस व बोधप्रद अशा बाबांच्या कथा व लीला सांगितल्या. त्यानंतर श्री. देव शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेऊन कृतार्थ झाले इत्यादि सविस्तर हकीगत त्यांनीं साईलीला वर्ष ३, अंक ६ यांत दिलेली आहे. आणि नानासाहेबांनीं त्यांना सांगितलेले अनुभव अनेक अंकांत प्रसिद्ध केलेले आहेत. वर्ष १६ अंक १,२,३ यांत त्यांनीं नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र दिलेलें आहे. या सर्व अंकांचा हा लेख लिहिण्याचें कामीं बराच उपयोग झाला आहे आणि त्याबद्दल मी श्री. देव मामलेदार यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

(४) श्री. तात्यासाहेब नूलकर—हे १९०९ सालीं पंढरपुरास मुनसफ होते. आणि नाना तेथेंच मामलेदार होते. दोघांच्या वरचेवर गांठी पडत असत आणि संभाषण होत असे. तात्यासाहेबांचा संतावर विश्वास नसे, तर नानासाहेब पक्के संतप्रेमी. नानासाहेब त्यांना नेहमीं बाबाच्या गोष्टी—लीला सांगत व शिरडीस केव्हां निघतां असें टुमणें त्यांच्यामागें लावीत असत. शेवटीं तात्यासाहेब शिरडीस जाण्यास कबूल झाले, पण तें दोन अटींवर. (१) त्यांना ब्राह्मण स्वयंपाकी हवा होता आणि (२) उत्तम नागपुरी संत्रीं बरोबर न्यावयास हवीं होती. या दोन्ही अटी अकल्पित रीतीनें पूर्ण झाल्या. एक ब्राह्मण नोकरीसाठीं नानासाहेबाकडे आला, तो त्यांनीं तात्यासाहेबांकडे पाठविला. तसेंच पंढरपुरांत उत्तम संत्रीं मिळत नव्हतीं. पण दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यांचें एक मोठें पार्सल आलेलें मिळालें. तें उघडून पहातात तों, त्यांत उत्तम शंभर संत्रीं! अशा रीतीनें अटी पुऱ्या झाल्यावर ते नानासाहेबांबरोबर शिरडीस गेले. आणि बाबाचें दर्शन घेते झाले. बाबा प्रथम त्यांचेवर रागावले, पण लगेच त्यांनीं त्यांचेवर कृपा करून त्यांना असे उत्तम

---


## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

अनुभव प्राप्त करून दिले कीं, बाबा हे देवाधिदेव आहेत अशी त्यांची खात्री झाली. शेवटीं ते तेथेंच रमले व त्यांनीं आपला देह शिरडींसच ठेविला. अंतकालीं त्यांना बाबांचें चरणतीर्थ मध्यरात्रींस मिळून त्यांना उत्तम गति प्राप्त झाली. त्यांच्या निधनाची वार्ता कळतांच बाबा तेथें गेले आणि म्हणाले कीं— 'अरे, तात्यांनीं आघाडी मारली. त्यानें आपल्या जन्माचें सार्थक केलें.'

**५ हेमाडपंत** (श्री. अण्णासाहेब दाभोळकर) नानासाहेबांनीं यांना शिरडीस बाबांच्या दर्शनांस जाण्यास कसें प्रवृत्त केलें या विषयीं श्रीसाईलीला मासिक आणि श्रीसाईसच्चरित्तांत वर्णन आलेलें आहे याविषयीं श्रीसाईलीला, वर्ष १३, अंक ४, ५, ६ यांत पान १६ वर 'नाना' या शब्दावर श्री सुमनसुंदर यांनीं मार्मिक व सुंदर विवेचन केलें आहे. तें असें:— नाना हा नाहीं नाहीं म्हणजे 'नेति नेति' याचा अपभ्रंशहि होऊं शकेल व **विवेक** हेंच कार्य करतो; सत् असत् यांतील भेद विशद करून विवेक 'सत' चें अद्वैत पटवितो. 'भासतें तसें नसतें' हें त्याचें संकलित कार्य होय. मायेचा फोलपणा दाखवून तो परमात्म्याची खरी जाणीव करून देतो. नानाची भूमिका अशीच आहे.

'केव्हां निघणार साई दर्शना।
किमर्थ आळस शिरडी–गमना॥
दीर्घसूत्रता कां प्रस्थाना।
निश्चिंती मना कां नाहीं?'॥

—श्री साईसच्चरित २'११९

हें (नानाचें वचन) त्याचेंच द्योतक आहे. विवेक मनाला अशीच टोंचणी देऊन मोक्षाकडे खेंचतो:—साई परमात्म्याच्या दर्शनास केव्हां निघणार? शिरडी परब्रह्म गमनास—आत्मज्ञानरूप मोक्ष मिळवण्यास आळस व मनाची चलबिचलता हीं उपयोगी नाहींत. आळस, मनाचें चांचल्य हे मायेचे विकार आहेत, ज्याला आत्मज्ञान हवें असेल, त्यानें त्यांचा त्याग केला पाहिजे. विकारी वृत्ति सोडून विचारी बनलें पाहिजे, असा त्याचा भावार्थ आहे. आणि हेमाडपंताच्या मिषानें आपणा सर्वांस विवेकानें (नानानें) जागें केलें आहे व आत्मोन्मुख बनविलें आहे.

**(६) श्री दासगणू महाराज** (श्री. गणपतराव सहस्रबुद्धे) हे नानाच्या वेळीं नगर येथें पोलीस खात्यांत कारकून होते. त्यांना कविता विशेषतः लावण्या करण्याचा फार नाद होता. नानासाहेबानीं त्यांचें मन वळवून कीर्तनें करून बाबाची प्रसिद्धि करण्याकडे प्रवृत्त केलें. त्यांचे घरी दामुआण्णा आठवले म्हणून एक गोड आवाजाचा मुलगा होता. त्याला त्यांनीं कीर्तनांत साथीदार म्हणून श्री दासगणूकडे दिलें. या जोडीमुळें कीर्तनास रंग चढून बाबांची प्रसिद्धी मुंबईच्या आजुबाजूस बरीच झाली. आणि तेथून बाबांच्या दर्शनास लोक भराभर जाऊं लागले आणि लवकरच शिरडी हें क्षेत्र बनलें. याचें श्रेय नानासाहेबांस आहे.

**आधुनिक नानासाहेब** (श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर). अलीकडे गेल्या १८।२० वर्षांत नानासाहेबांची ही कामगिरी मद्रासचे श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर यांनीं मोठ्या उत्साहानें चालविली. त्यांनीं अनेक साईभक्तांच्या भेटी घेतल्या आणि त्यांचे अनुभव लिहून

घेऊन प्रसिद्ध केले. श्री बाबाविषयीं बरेच ग्रंथ प्रसिद्ध केले आणि 'साई सुधा' नांवाचें मासिक १७।१८ वर्षें चालविलें, आणि तें अद्याप चालू आहे. त्यांनीं हिंदुस्थानदेशभर दौरे काढून बाबांविषयीं व्याख्यानें दिलीं आणि ठिकठिकाणीं संम्मेलनें (परिषदा) भरविलीं; अशा रितीनें बाबांची निरपेक्षपणें सेवा करून ते बाबांच्या चरणकमलीं कांहीं महिन्यापूर्वी विलीन झाले. श्री बाबांचा यशोदुंदुभि हिंदुस्थानभर पसरलेला आहेच आणि तो आतां हिंदुस्तानबाहेरहि अखिल जगतांत पसरण्याकरितां आणखी कोणी नूतन नानासाहेब बाबा उत्पन्न करतील अशी आशा आहे.

आतां नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र देऊन त्यांत आलेले कांहीं अनुभव देतों

**चरित्र**—नानासाहेबांचा जन्म ठाणें येथें १८६० सालीं झाला. त्यांचे वडिलाचें नांव गोविंदपंत नाना उर्फ नानासाहेब. ते डेप्युटी कलेक्टर व कलेक्टरचे पर्सनल असिस्टंट होते. त्यांना दप्तरदार ही पदवी मिळाली होती. कल्याणास त्यांचे वाड्यास दप्तरदारांचा वाडा असें म्हणतात. ते सुशील व सदाचारी होते आणि त्यांचा दानधर्म बराच असे. त्यांना ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी तालुक्यांतील कवाड क्षेत्रनिवासी श्री सखाराममहाराज यांचा अनुग्रह मिळाला होता. हे सखाराममहाराज आणि श्री बाबा गुरुबंधु होते. असें सांगतात. नानांचें मराठी शिक्षण कल्याण येथें आणि पुढील इंग्रजी शिक्षण मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कुलांत व एलफिन्स्टन कॉलेजांत झालें. ते १८८३ सालीं बी. ए. झाले. संस्कृत हा त्यांचा ऐच्छिक व आवडीचा विषय होता आणि तो त्यांनीं आमरणांत कायम ठेविला. त्यांचा विवाह १८७८ सालीं कल्याण येथें पनवेल तालुक्यांतील पळस्पे गांवच्या विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे या श्रीमान गृहस्थाच्या कन्येशीं झाला. त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई यांचेपासून त्यांना दोन पुत्र व दोन कन्या झाल्या. थोरले चिरंजीव वासुदेव उर्फ बाबुराव हे ग्रॅजुएट असोन विलेंपारलें येथील खासगी हायस्कुलांत गणित शिक्षक होते. धाकटे चिरंजीव महादेव उर्फ बापुराव हे शेतकी शिक्षण घेऊन घरींच शेतीभाती करीत असत. वासुदेवरावांचा विवाह ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध जहागिरदार श्री. रामराव कृष्ण जठार यांची कन्या इंदिराबाई यांचेशीं झालेला आहे; आहे आणि बापुरावांचा विवाह धारवाडचे वकील श्री. त्रिविक्रम काशिनाथ पित्रे यांच्या गिरिजाबाई नामक कन्येशीं झालेला आहे. वडील कन्या मैनाताई यांना पुण्यास कुवळेकर यांचे घरीं, आणि कनिष्ठ कन्या द्वारकाबाई यांना सातारचे पेंढरकर यांचे घरीं दिली होती.

नानासाहेब बी. ए. झाल्यावर त्यांची प्रथम नेमणूक संगमनेर येथें मामलेदार कचेरींत कारकुनाचे जागीं झाली. नंतर त्यांना नगर जिल्ह्यांत कोपरगांव येथें अव्वल कारकुनाची जागा मिळाली. १८९२ सालीं ते नगर येथें कलेक्टर साहेबांचे चिटणीस झाले (ह्याच वेळीं त्यांना बाबांचें दर्शन झालें.) १८९३ सालीं पुणें जिल्ह्यांत घोडनदी तालुक्याचे मामलेदाराची जागा त्यांना मिळाली. पुढें १८९४ ते १९०१ पर्यंत ते पुनः

नगर जिल्ह्याच्या कलेक्टरचे चिटणीस होते. सन १९०२ सालापासून ते खानदेशांत जामनेर तालुक्याचे मामलतदार होते. (त्यावेळीं त्यांना बाबानीं आपली अलौकिक शक्ति दाखवून त्यांच्या मुलीची सौ. मैनाताईची प्रसूति-सुटका केली.) नंतर त्यांची बदली नंदुरबार, पंढरपूर वगैरे ठिकाणीं मामलतदार म्हणून झाली. सन १९०८ सालीं तें पुणें येथें डि. डे. कलेक्टर झाले. १९०९ सालीं याच जागेवर त्यांची बदली ठाण्यास झाली. इ. स. १९१५ सालीं ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे १९२१ सालीं त्यांनीं आपला नश्वर देह श्री बाबांचे चरणीं ठेविला.

**बाबांचें प्रथम दर्शन** (श्री साईलीला वर्ष ३ अंक ३) नानासाहेब नगर जिल्ह्यांत कलेक्टरचे चिटणीस असतांना शिरडीचे आप्पा कुलकर्णी नगरास जमाबंदीच्या कामाकरितां बाबांची आज्ञा घेऊन निघाले. कलेक्टरचे चिटणीस कोण आहेत याची चौकशी करून, बाबांनीं तुला बोलाविलें आहे असा निरोप आप्पा कुलकर्ण्यामार्फत त्यांनीं नानास पाठविला. आपण येत नाहीं असा नानानीं जबाब दिला. पुनः बाबानीं तोच निरोप अप्पा कुलकर्ण्यामार्फत पाठविला. पुनः नानाचा नकार आला. असें दोनतीन वेळां झाल्यावर अखेर नानांनीं भेटीस येण्याचें कबूल केले. पण त्यांचे मनांत शंका-कुशकांचें काहूर ऊठलें. आपण एखाद्या फकिराच्या भेटीस जाणार कीं खऱ्या संताच्या भेटीस जाणार याचा त्यांचे मनांत निश्चय होईना. शेवटीं आपल्या पत्नीकडून गाठोड्यांत बांधून ठेविलेला एक जुना अल्पाकचा कोट मागून घेऊन तो घालून ते बाबांच्या दर्शनास गेले. रिक्तहस्तें साधुसंताच्या दर्शनास जाऊं नये, तशांत शिरडी हे खेडेगांव असल्यामुळें तेथें कांहींच मिळणार नाहीं अशा विवंचनेंत ते असतां त्यांचा हात सहज त्या कोटाच्या खिशांत गेला. त्यांत त्याना एक लहानशी पुडी मिळाली. ती उघडून पहातां त्यांत २।४ बदाम व २।४ खडीसाखरेचे तुकडे मिळाले. याचें नानासाहेबांस सकौतुक आश्चर्य वाटलें. आपण रिक्तहस्तें बाबाकडे जात नाहीं, बाबा हे साधु असावेत असें त्यांना वाटून ते बाबांकडे गेले आणि त्यांना साष्टांग प्रणिपात करून समोर बसले आणि आपणास कां बोलाविलें असें विचारलें. अरे, जगांत काय थोडीं माणसें आहेत, त्यांना न बोलावितां तुलाच कां बोलावतों याचें कांहीं तरी कारण असेलच कीं नाहीं असें बाबांनीं उत्तर दिलें. त्यावर नाना म्हणाले-तें कारण सांगा. बाबा म्हणाले—तुझा व माझा चार जन्मांचा संबंध आहे, तुला तो माहीत नाहीं, मला माहीत आहे म्हणूनच तुला मी बोलावितों. सवडीप्रमाणें पुनः येथें येत जा. त्यावर नाना म्हणाले-बरें आहे, येत जाईन.

**प्लेगची लस टोंचून घेणें**— (श्रीसाईलीला वर्ष ३, अंक ३) इतकें झालें तरी नानासाहेबांचा बाबांवर विश्वास बसेना. पुढें कांहीं दिवसांनीं नगरच्या आजूबाजूस प्लेगची सांथ सुरू झाली. त्यावेळीं कलेक्टरसाहेबांनीं नानासाहेबाला सांगितलें कीं, तुम्हीं प्रथम प्लेगची लस टोंचून घेऊन उदाहरण घालून द्या, म्हणजे इतर सर्व लोक तुमचें अनुकरण

करतील. नानासाहेब फार पेचांत पडले. त्यावेळीं लसीचा तोडगा प्रयोगावस्थेंत आणि धोक्याचा होता अशी सर्वांची समजूत. तेव्हां आतां काय करावें हें त्यांना सुचेना. विचार करितां करितां त्यांना एक युक्ति सुचली. याविषयीं बाबांना विचारून त्यांचें मत घ्यावें आणि ते सांगतील तसें करावें. विचार करणेसाठीं म्हणून त्यांनीं कलेक्टरसाहेबाकडून एक आठवड्याची मुदत मागून घेतली आणि त्या मुदतींत एक दिवस शिरडीस येऊन सर्व हकीकत बाबांना निवेदन केली आणि विचारलें कीं, प्लेगची लस टोंचून घ्यावी कीं घेऊं नये. बाबा म्हणाले—अंः, त्यांत काय आहे, टोंचून घे, भिऊं नको, त्यापासून कांहीं वाईट होणार नाहीं. त्यानंतर नानासाहेब परत नगरास आले आणि टोंचून घेण्याचें आपण ठरविले आहे असें कलेक्टरसाहेबांना सांगून त्यांनीं टोंचून घेतलें. पुढें त्यांचें आफिसांतील सर्व मंडळींनीहि टोंचून घेतलें. टोंचून घेतलें त्यापैकीं कोणावरहि वाईट परिणाम झाला नाहीं. त्यामुळें नानासाहेबांची बाबांवरील श्रद्धा जडत चालली आणि बाबांत कांहीं विशेष तेज आहे, आणि त्यांचेकडे आपण वरचेवर जावें असें त्यांना वाटूं लागलें.

**हरिश्चंद्र डोंगर ट्रीप** (श्री साईलीला वर्ष २, अंक ३) नानासाहेब नगर जिल्ह्यांत चिटणीस असतांना एकदां हरिश्चंद्र डोंगरावर जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला. त्यांचे आफिसांतील मंडळीस हा बेत कळवितांच, बाबा खरवंडीकर नामक आफिसांतील माहितगार विनयशील, स्पष्टवक्ते कारकुनानें स्पष्ट सांगितलें कीं, उन्हाचे दिवस, वाट उंच व अवघड, वाटेंत पाण्याचा थेंबहि मिळणार नाहीं, करितां तूर्त हा बेत रहित करावा. नानासाहेबांना हें म्हणणें पटलें नाहीं. तेव्हां सर्वांनीं डोंगरावर जाण्याची तयारी केली आणि पर्वत चढण्यासः आरंभ केला. अर्धा रस्ता चढल्यावर नानासाहेब थकले आणि तहानेनें व्याकुळ झाले आणि बाबा खरवंडीकराना म्हणाले की, कसेंहि करा, मला पाणी पिण्यास द्या, त्याशिवाय मला पुढें पाऊल टाकवत नाहीं. खरवंडीकर म्हणाले कीं मी आपणास पूर्वीच बजाविलें होतें, आतां आपण अर्धी वाट आलों, येथें पाण्याचा माग मूस नाहीं आणि कोणी वाटाड्याहि दिसत नाहीं तेव्हां पाणी मिळावें कसें ? यानें नानासाहेबांचें कांहीं समाधान झालें नाहीं. पुढें मार्ग आक्रमण करण्यास किंवा मागें परतण्यासहि ते तयार होईनात. या स्थितींत त्यांनीं बाबांचें स्मरण केलें आणि त्यांचा धांवा केला. इतक्यांत त्या वाटेनें एक भिल्ल डोक्यावर लांकडाची मोळी घेऊन जातांना त्यांचे दृष्टीस पडला. नानासाहेबानीं सहज त्याला, येथें जवळपास पिण्यास पाणी मिळेल काय असें विचारलें. तुम्हीं बसलां त्या दगडाखालींच पाणी आहे असें सांगून तो भिल्ल आपल्या वाटेनें निघून गेला. नंतर मंडळीनीं दगड वर उचलून पाहिलें तों काय चमत्कार सांगावा ! त्यांची तहान भागण्यापुरतें स्वच्छ मधुर पाणी त्यांना मिळालें. नानासाहेब तें पाणी प्याले आणि शांत झाले. सर्व मंडळीना हा मोठा चमत्कार वाटला. भिल्लाचा तपास करतां तो कोठें दिसेना; तेव्हां नाना म्हणाले पहा, माझे बाबा कसे आहेत. त्यांनीं मला येथेंच बसल्या जागीं

पाणी दिलें कीं नाहीं? बाबांवरील नानासाहेबांची निष्ठा पाहून, बाबा जरी शिरडींत असले तरी, ते सर्वव्यापी, भक्त-वत्सल असून भक्तांचीं संकटें दूर करितात अशी सर्व मंडळीची खात्री झाली. नंतर सर्व मंडळी हरिश्चंद्र पर्वताचे माथ्यावर जाऊन सायंकाळीं परत नगरास आली.

इकडे शिरडीस त्याच वेळीं बाबा मशीदींत बोलूं लागले कीं काय करावें, नानाचा जीव कासावीस झाला, ऊन फार झालें, पाण्याबगर नाना थकला, त्याला पाणी थोडं तरी दिलेंच पाहिजे. तेथें जमलेल्या मंडळीना या भाषणाचा कांहीं उलगडा होईना. पण कांहीं अनुभविक भक्तांनां मात्र वाटलें की, नानावर कांहीं संकट आलें असावें, पुढें कांहीं दिवसांनीं नाना शिरडीस दर्शनास आल्यावेळीं बाबांनीं विचारलें कीं, कां नाना, पाणी मिळालें का? हें ऐकून नाना सद्‌गदित झाले आणि त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. ते म्हणाले आपल्या सारखी गुरुमाय सुदैवानें लाभली असतां पाणी कां मिळणार नाहीं? हा प्रकार पाहून त्या दिवशीं बाबा नानाविषयीं तसें कां बोलत होते याचें कोडें उलगडलें आणि बाबाच्या लीलेचें सर्वांना आनंद व कौतुक वाटलें.

## पद्मालय ट्रीप व गडवाभर चहा

(श्रीसाईलीला व. ७ ३।४) दुसरी अशीच एक ट्रीप नानासाहेबानीं केली. पूर्व खानदेशांत पाचोऱ्यापासून ८–१० मैलांवर पद्मालय म्हणून एक रम्य स्थान आहे. तेथें एका गोविंदबुवानीं एक सुंदर गणपतीचें मंदिर बांधलें असून त्यावर शंभर तोळे सोन्याचा कळस चढविलेला आहे. नानासाहेब खानदेशांत दुसऱ्या एका तालुक्याचे मामलेदार होते. पद्मालयाला जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला आणि पाचोऱ्याहून पद्मालयापर्यंत वाहनाची व्यवस्था करणेबद्दल पाचोऱ्याच्या मामलेदाराला कळविलें. त्यांनीं त्याप्रमाणें टांग्याची व्यवस्था केली. ठरलेल्या दिवशीं व वेळीं नानासाहेब आपल्या गांवाहून निघाले. त्यावेळीं त्यांची गाडी चुकली. यामुळें पाचोऱ्यास नानासाहेब आणि मंडळी दुपारी पोंचावयाची ती सायंकाळीं पोंचली. तेव्हां समजलें कीं, टांगेवाला मंडळीची वाट पाहून ती न आल्यामुळें परत गेला. तेव्हां पायीं जाण्याखेरीज दुसरें साधनच नसल्यामुळें सर्व मंडळी चालूं लागली. पद्मालयास जाणेचा रस्ता चांगला नसून जंगलांतील आडरस्ता होता. तसेंच इतके ८–१० मैल चालण्याची नानांना संवय नव्हती. तेव्हां ती वाट चालतांना त्यांना फार त्रास झाला. दुसरी एक अडचण अशी उत्पन्न झाली कीं, गोविंदबुवा दिवसभर देवळांत राहून पूजाअर्चा करून येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांची जेवणाखाण्याची सोय करीत असत आणि रात्रौ दहा वाजल्यावर देवालयापासून कांहीं अंतरावर असलेल्या आपल्या मठींत विश्रांतीसाठीं जात असत. दहानंतर थकून भागून ही मंडळी पद्मालयीं पोंचणार आणि तेव्हां त्यांची जेवणाखाण्याची सोय कशी होणार ह्याची त्या मंडळीना मोठी काळजी वाटली. चालतां चालतां नानासाहेब बरेच थकले. थोडा वेळ चालावें आणि मध्येंच विश्रांतीसाठीं उभें राहावें, बसावें असा क्रम चालला. मध्येंच एके ठिकाणीं त्यांनीं बाबांचा धांवा केला कीं, बाबा मला आतां जेवणखाण न मिळालें तरी

चालेल पण एक गडवाभर चहा मिळेल तर काम भागेल. पण चहाची वर्दी गोविंदबुवाला कोण पोंचविणार हें त्यांना मोठे कोडें पडलें. शेवटीं बाबांवर सर्व भार घालून सर्व मंडळी दहा वाजल्यानंतर पद्मालयीं पोंचली. मंदिराशीं येतात न येतात तोंच गोविंदबुवा हातांत चहाची चरवी घेऊन ऊभे. 'नाना आलास काय' असें म्हणून त्यांनीं नानाचें स्वागत केलें. नाना म्हणाले, महाराज, आपण यावेळीं येथें कसे? तेव्हां गोविंदबुवा म्हणाले— "अरे नाना फार लांबून पायीं चालत येत असल्यामुळें तो अतिशय थकला आहे, त्याला फार भूक लागली आहे, त्याचेकरतां एक मोठा तांब्याभर चहा तयार करून ठेव' असा आतांच बाबांकडून बिनतारी संदेश आला आहे. म्हणून मी तुझे करितां चहा घेऊन आलों आहें.' अहाहा, काय हे बाबांचें अंतरसाक्षित्व आणि भक्तांविषयीं कळकळ!

सर्व मंडळींनीं हा चहाचा प्रसाद प्रेमादरपूर्वक घेतला. नंतर रात्रीं तेथें विश्रांति घेऊन दुसरे दिवशीं भोजनप्रसाद घेऊन मंडळीं आपल्या गांवीं परतली.

**बोधेगांव ट्रीप-श्री बन्नुमाईचें दर्शन**— (श्रीसाईलीला वर्ष ७, अंक ७-१०) नगर जिल्ह्यांत बोधेगांव म्हणून एक खेडेगांव आहे. तेथें **बन्नुमाई** नांवाची एक यवन जातीची महासाध्वी महाविरक्त, ज्ञानी, मोठ्या अधिकाराची कुमारिका रहात होता. ती बहुतेक गांवाबाहेर, जंगलांत झाडाझुडपांत रहात असे. तिला कोणी शोधावयास अगर भेटावयास गेल्यास ती निवडुंगाच्या झुडपांतून वाऱ्यासारखी धांवत असे. त्यावेळीं तिच्या अंगांत पुष्कळ कांटे बोचत असत तरी तिला त्याची दाद नसे. गांवांत घरीं तिची आई एकटीच असे, तिला भेटण्यासाठीं ती क्वचित् केव्हां तरी येई. ती वेडी आहे असे गांवचे लोक


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,

श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

समजत असत. अशा या साध्वीचें दर्शन घ्यावें अशी नानासाहेबांना प्रबल लालसा झाली, पण हें दर्शन बहुतेक अशक्य आहे असें त्यांना वाटलें, तरी त्यांची दर्शनेच्छा कमी होईना. बाबांच्या कानावर ही गोष्ट घालावी आणि ते सांगतील तसें करावें असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें सवडीनुसार बाबांची भेट झाल्यावर नानासाहेबांनीं आपली दर्शनेच्छा व त्या मार्गांत येणाऱ्या अडचणी बाबाना सांगितल्या. बाबा म्हणाले—'तुला आतां कोणाचें दर्शन कशास घ्यावयास पाहिजे ? येथें सर्व कांहीं नाहीं का ?' या उत्तरानें नानासाहेबाची समजूत होईना व ते आपला आग्रह धरूनच बसले. तेव्हां 'दर्शन होईल जा' असे बाबांनीं सांगितलें. तेव्हां तेथून परत आल्यावर बोधे गांवास जाण्याची तयारी करण्यास आपले सल्लागार बाबा खरवंडीकर यास सांगितलें. पाट, रांगोळीचे सामान, लुगडें स्नानाचें सामान, कुंकुम, मंगलसूत्र इत्यादि सामान घेऊन बाबा खरवंडेकरासहित नानासाहेब बोधे गांवास आले आणि तेथील एका देवळांत उतरले तेथें तपास करतां बन्नुमाई गांवांत नसून बाहेर जंगलांत आहे असें समजलें. तिचा शोध घेतघेत नानासाहेब गांवाबाहेर येऊन काटेरी अरण्यांत धांवू लागले. बराच वेळ झाला तरी दर्शन नाहीं. नानासाहेब थकले, थोडेसे निराश झाले, आणि त्यांनीं बाबांचें स्मरण केलें, आणि मनांत म्हणाले कीं, दर्शन व्हावयाचें नव्हतें तर, 'दर्शन होईल जा' असें मला कां सांगितलें ? दर्शन झाल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं. असें म्हणून डोळे उघडतात तों, बन्नुमाई नग्नावस्थेंत नानासाहेबांच्या पुढें उभ्या. त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं तिला वंदन करून तिचे अंगांत शिरलेले कांटे काढण्यास सुरुवात केली; तोंच त्या वाऱ्याप्रमाणें गर्द निवडुंगांत पसार झाल्या. तेव्हां नानासाहेब खिन्न झाले, पण निराश झाले नाहींत. त्यांनीं खरवंडेकरास सांगितलें कीं, येथेंच राहुटी ठोका, कनाती लावा, पाणी तापवा, राहुटीचे आंत पाट मांडून भोंवतीं रांगोळ्या काढा, स्नानाची सर्व तयारी ठेवा. खरवंडेकरांनीं सर्व तयारी यथासांग करणेस सुरुवात केली तों त्यांत एक चोळी कमी आहे असें दिसून आलें. इतक्यांत त्या गांवचा बाजार आटपून एक शिंपी घोड्यावरून परत आपल्या गांवीं जात होता. त्यांचेपाशीं चोळीहि मिळून सर्व तयारी पुरी झाली. तेव्हां नानासाहेबांनीं क्षणभर डोळे मिटून बाबांचें स्मरण केलें आणि त्यांची करुणा भाकली. तेव्हां काय चमत्कार सांगावा ! डोळे उघडून पहातात तों, बन्नुमाई राहुटीं मांडलेल्या पाटावर स्नानाकरितां उभ्या. तेव्हां नानासाहेबांना अत्यानंद होऊन त्यांनीं प्रथम तिच्या अंगांतील कांटे काढले, सौगंधिक तेल व उटणें लाविलें आणि तिला अभ्यंग स्नान घातलें. नंतर तिचें अंग स्वच्छ पुसून तिची वेणी घातली. कंठांत सोन्याचें मंगलसूत्र बांधिलें, कुंकुम लावून लुगडें नेसविलें आणि चोळीहि अंगांत घातली. नंतर तिची पूजा करून हातावर नैवेद्य ठेवून तिला वंदन केलें व दक्षिणा दिली. इतकें होतें न होतें तोंच बन्नुमाईनीं सर्व पदार्थांचा त्याग करून "दिशोऽपि वसनं" धारण करून जंगलांत वायुवेगानें प्रयाण केलें. लगेच

ही बातमी गांवांत पसरली. आणि बन्नुमाईची वृद्ध आई तेथें धांवत आली आणि तिनें नानासाहेबांवर बालिश आरोप करून त्यांना शिव्या देण्यास सुरुवात केली. नानासाहेबांनीं शांत मनानें तिची विनवणी केली आणि खरी वस्तुस्थिती सांगितली; तरी तिचें समाधान होईना. शेवटीं तेथें पडलेलें सर्व सामान ( लेकीच्या पूजेचें ) घेऊन जाण्यास जेव्हां तिला सांगण्यांत आलें तेव्हां तिचा कोप थंड झाला आणि तें सर्व सामान घेऊन ती घरीं परतली. नंतर नानासाहेब देवळांत आपल्या मुक्कामीं परत आले आणि सायंकाळचा फराळ होऊन सर्व मंडळीसहित तेथें निजले व पहांटेस परत जाण्याचे वेळीं फिरून बन्नुमाईचें दर्शन कसें होईल या विचारांत ते अंथरुणावर पहुडले. त्या रात्रीं बन्नुमाई आपल्या मातोश्रीकडे निजावयास आल्या. पहांटे ४।५ वाजतां नानासाहेब जागे होऊन पाहातात तों, बन्नुमाई आपल्या उशापाशीं बसलेल्या त्यांना आढळल्या. हें पाहून त्यांना बाबांच्या लीलेचें परम कौतुक वाटून त्यांना परमाश्चर्य व परमानंद झाला. त्यांनीं त्यावेळीं पुन्हां बन्नूमाईच्या पायांवर डोकें ठेवून वंदन केलें; इतकें होतांच बन्नूमाई लगेच तेथून पसार झाल्या. बन्नूमाईची आईहि तिच्या शोधार्थ आली, तेव्हां झालेला प्रकार तिला समजला. बन्नूमाईची आई म्हणून नानासाहेबांनीं तिचीहि द्रव्यदानानें संभावना केली आणि तीहि शांत व प्रसन्न अंतःकरणानें घरीं गेली, आणि नानासाहेबहि सर्व मंडळीसहित परत नगरास आले.

**'जामनेरचा अद्भुत चमत्कार**

(श्रीसाईसच्चरित्र अ ३३)

## 'तूं घालिसी उडी भक्तांचे संकटीं'

—श्रीकृष्ण भटजी बोदकर महाराज

जामनेरास नानासाहेब मामलेदार असतांना त्यांनीं आपली आसन्नप्रसव मुलगी सौ. मैनाताई प्रसूतीसाठीं आपले घरीं आणली. पूर्ण दिवस भरल्यावर भयंकर प्रसूतिवेदना सुरू झाल्या. सुईणी व वैद्य हे सर्व थकले. कोणाचें कांहीं चालेना. तेव्हां या संकटाचें निरसनार्थ नवचंडी हवन, सप्तशतीपठण इत्यादि धार्मिक विधि करण्यांत आले, तरी पण लवकर सुखानें सुटका होईना. यावेळीं जर बाबांची उदी मिळेल तर माझें कार्य होईल असें नानासाहेबांना वाटून त्यांनीं बाबांचा धांवा केला. इकडे शिरडीस खानदेशचे रामगीरबुवा (त्यांना बाबा प्रेमानें बापूगीर म्हणून हांक मारीत असत) यांना आपल्या घरीं जावें असा त्यांच्या मनाचा उठाव झाला आणि ते बाबांची अनुज्ञा व उदी मागण्यास मशिदींत आले. सर्वसाक्षी सर्वशक्ति बाबा त्याला म्हणाले, 'तूं खुशाल आपल्या घरीं जा, पण वाटेंत थोडा विसावा घे, प्रथम जामनेरास जाऊन नानाच्या घरीं उतर आणि त्याचा क्षेमसमाचार घेऊन तूं आपला मार्ग धर.' पुनः शामा ( माधवराव देशपांडे ) याचेकडे वळून बाबा म्हणाले---शामा, ती माधव अडकराची आरती ( 'आरती साईबाबा, सौख्य दातार जीवा' इत्यादि ) कागदावर उतरून काढ आणि ती बापुगीर गोसाव्याच्या हातीं दे. नंतर बाबांनीं अनुज्ञा व उदी दिली. आणखी थोडी उदी दुसऱ्या पुडींत बांधून सांगितलें कीं, ही उदीची पुडी आणि आरती जामनेरास नानाच्या हातीं दे आणि त्याचा क्षेमसमाचार घेऊन पुढें तूं आपल्या घरीं जा.

बापुगीरानें उत्तर दिलें कीं—बाबा, माझे-कडे अवघे दोन रुपये आहेत, तेव्हां मी जामनेरास कसा जाऊं शकेन? बाबा म्हणाले, 'तूं स्वस्थ मनानें जा, तुझी सर्व कांहीं सोय होईल.' याप्रमाणें बाबांची अनुज्ञा व उदी घेऊन, बाबांवर पूर्ण विश्वास ठेवून बापुगीर प्रवासाला निघाला. हल्लीं जसा जामनेरास आगगाडीचा मार्ग आहे तसा त्यावेळीं नव्हता. जळगांवास उतरून दुसऱ्या वाहनानें जामनेरास जावें लागे. बापुगीरानें एक रुपया चौदा आणे देऊन जळगांवचें तिकिट काढलें. खिशांत अवघे दोन आणे शिल्लक राहिले. गाडी रात्रीं जळगांवला आली. बापुगीर प्लाट-फार्मवर उतरले. आणि आतां पुढें कसें करावें या चिंतेंत पडले. इतक्यांत 'शिर-डीचा बापुगीर कोण आहे का' असा आवाज त्याच्या कानीं पडला. मीच तो म्हणून बापुगीर पुढें झाला. त्याला "शिपाई दिसला मोठा चतुर। दाढी मिशा कल्लेदार। नीट नेटस ल्यालेला इजार। तांगा सुंदर देखिला॥" (श्रीसाईसच्चरित अ. ३३–९४) बापुगीर तांग्यांत जाऊन बसले. तांगा व घोडे इतराप्रमाणें भाड्याचे नसल्यानें इतर तांग्यांच्या पुढें जोरानें धावूं लागले. जळगांव ते जामनेर–अठरा कोसांचें अंतर भराभर तोडीत हा तांगा पहांटेच्या सुमारास एका मोठ्या ओढ्या समीप आला. तेथें घोड्यांना पाणी पाज-ण्यासाठीं तांगा सोडला, आणि त्या शिपायानें स्वतः थोडें पाणी आणून फराळ (आंबे, पेढे, गुळपापडी वगैरे) बापुगी-राच्या पुढें ठेवून तो सेवन करण्यास विनंति केली. त्याचा पेहेराव पाहून हा मुसलमान असावा, त्याच्या हातचा फराळ कसा खावा, अशी शंका बापुगीराच्या मनांत आली आणि तो थोडें काकूं करूं लागला. त्याच्या मनांतील शंका जाणून शिपाई त्याला म्हणाला—आपण मनांत शंका धरूं नका. मी हिंदु, गरवाल क्षत्रिय रजपूत आहे. नानानीं हा फराळ पाठविला आहे, स्वस्थ चित्तानं तो सेवन करा. या उत्तरानें बापुगीराच्या मनांतील शंका दूर झाली आणि नंतर दोघांनीं मिळून फराळ केला आणि पुनः तांग्यांत बसून ते निघाले, तों अरुणोदयीं जामनेरासमीप आले. नानाची मामलेदाराची कचेरीहि दिसूं लागली. घोडे थोडेसे थांबले. बापुगीरहि लघुशंकेसाठीं तांग्यांतून खालीं उतरून एका बाजूस बसले. लघुशंका आटपून परत येऊन पाहतात तों,

नाहीं तांगा, नाहीं घोडीं।
दिसेना तांगेवाला गडी।
कोणीही न दिसे ते घडी।
जागा उघडी देखिली।

—श्री साईसच्चरित. ३३–१०५

हा काय चमत्कार, मला येथपर्यंत आणून हा गडी कुठें गेला असा विचार करीत बापुगीर कचेरींत आला आणि नानासाहेब घरीं आहेत असें कळून त्यांचे घरचा पत्ता काढीत त्यांचें घरीं आला आपण आल्याची वर्दी देतांच नानासाहेबानीं त्यांना आंत बोलाविलें. परस्परांची भेट होतांच बापुगीरानें उदी व आरति त्यांचे समोर ठेवून संपूर्ण हकीकत सांगितली. नानासाहेबाची मुलगी याच वेळीं प्रसूति वेदनांनीं विव्हळ होऊन अडलेली होती. क्षुधार्ताला पंच पक्वानांचे ताट मिळाल्या-प्रमाणें नानासाहेबांची स्थिति झाली. त्यांनीं आपल्या कुटुंबाला हाक मारून उदी पाण्यात घालून मुलीला पिण्यास

सुमालीबरोबर आलेल्या राक्षसांचा प्रमुख प्रहस्त राक्षस यावर म्हणाला,

"रावणा ! तूं राजधर्म आणि नीतिशास्त्र यांचें अध्ययन केलें नाहींस म्हणून असें बोलत आहेस. जे कोणी खरे शूर असतात, ते नात्यागोत्याच्या भानगडींत मुळींच पडत नाहींत. सावत्र भावांची भाऊबंदकी ही पूर्वापार चालत आलेली आहे. देव आणि राक्षस हे एका कश्यपाचें मुलगे—सावत्र भाऊ. त्यांचें वैर कांहीं आजचें नाहीं. कुबेर स्वतःला देव म्हणवितो. अर्थात् तो आपला शत्रु आहे."

प्रहस्ताचा उपदेश रावणाला पटला. त्यानें लगेच कुबेरावर स्वारी केली. कुबेर आपल्या पित्याकडे गेला आणि त्यानें सगळें वर्तमान त्याला सांगितलें. विश्रवा कुबेराला म्हणाला, 'रावण हा ब्रह्मदेवाच्या वरानें उन्मत्त झालेला असल्याकारणानें तुझें त्याच्यापुढें कांहीं चालणार नाहीं. यासाठीं तूं मुकाट्यानें लंका सोडून दुसरीकडे जावें हें बरें.'

पित्याच्या सांगण्याप्रमाणें कुबेरानें लंका रावणाच्या स्वाधीन केली आणि तो कैलास पर्वतावर तपश्चर्या करण्यास निघून गेला. तेथें त्यानें शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरानें त्याच्यासाठीं एक उत्तम नगरी तयार करविली. त्या नगरीचें नांव अलका असें ठेवून ती कुबेराला राह्यला दिली व त्याला लोकपाल करून उत्तर दिशेचें स्वामित्व त्याच्याकडे दिलें.

## पुष्पक विमान पळविलें

राक्षसांनीं लंकेंत रावणाला राज्याभिषेक केला. तेव्हांपासून तो आपल्या भावांसह लंकेंत राहूं लागला. कश्यपाच्या दिती नांवाच्या पत्नीचा मय नांवाचा एक मुलगा होता. तो शिल्पकर्मामध्यें अतिशय कुशल होता. त्या मयाला मंदोदरी नांवाची लावण्यवती कन्या होती. ती त्यानें रावणाला दिली आणि आपल्या जावयाला एक अमोघ शक्तीहि आंदण म्हणून दिली.

कांहीं काळानें मंदोदरीला एक मुलगा झाला. तो जन्माला आल्याबरोबर रडूं लागण्याऐवजी त्यानें मेघाप्रमाणें भयंकर गडगडाट केला म्हणून त्याचें नांव मेघनाद असें ठेवलें.

आपल्या वरानुसार कुंभकर्ण सहासहा महिने झोंपलेला असे. पण रावण तिन्ही लोकांत फिरत राहून सर्व प्राणिमात्रांना पीडा देत असे. ज्या कोणापाशीं जी कांहीं चांगली वस्तू असेल ती तो खुशाल बलात्काराने काढून नेत असे. अशा रीतीने जगाला रावण पीडा देत आहे ही गोष्ट कुबेराच्या कानावर गेली. त्यानें आपला एक दूत रावणाकडे पाठवून "असा अधर्मानें वागूं नको" असें त्याला सांगितलें. तें रावणाला आवडले नाहीं, इतकेंच नाहीं, तर आपणाला उपदेश करणाऱ्या कुबेराचा त्याला फार राग आला. त्यानें लागलीच अलकेवर स्वारी करून आपल्या सावत्र भावाला पराभूत केलें व त्याचें पुष्पक विमान हिरावून नेलें !

## रावणाचे पराक्रम

नंतर रावणानें यम आणि वरुण या दोघां लोकपालांसह युद्ध करून त्यांना जिंकलें आणि इंद्राला जिंकण्याच्या इच्छेनें तो स्वर्गांत गेला. सर्व देव इंद्राच्या साहाय्यास आले. स्वर्गामध्यें रावण

आणि इंद्र यांचें तुंबळ युद्ध सुरू झालें. बराच वेळ युद्ध झाल्यावर इंद्रानें त्याला नामोहरम केलें आणि त्याच्या मुसक्या बांधल्या. हें वृत्त रावणाचा मुलगा मेघनाद याच्या कानावर गेलें तेव्हां तो चवताळून इंद्रावर चालून गेला. पुनः भयंकर युद्ध झालें. या युद्धांत मेघनादानें इंद्राचा पराभव करून त्याच्या मुसक्या बांधल्या आणि आपल्या पित्याला सोडविलें. नंतर इंद्राला व रावणाला बरोबरोबर घेऊन मेघनाद लंकेला परत आला. तेथें इंद्राला कैदेंत ठेवलें. ही हकीकत ऐकून स्वतः ब्रह्मदेव लंकेस आला आणि त्यानें इंद्रासाठीं रदबदली केली. तेव्हां अनेक वर मागून घेऊन मेघनादानें इंद्राला सोडून दिलें.

नंतर रावणानें कैलास पर्वतावर स्वारी केली. त्यानें आपल्या बाहुबलानें सबंध पर्वतच गदगदां हालविला. हें त्याचें कृत्य पाहून नंदीला संताप आला व 'वानर आणि माणसें यांच्या हातून तुझा नाश होईल' असा त्यानें रावणाला शाप दिला. रावणाला त्या शापाचें कांहींच वाटलें नाहीं. पण अधिक पराक्रम दाखविण्याच्या भरीस न पडतां तो लंकेंत परत आला. पुढें त्यानें सहस्रार्जुनाच्या माहिष्मती नांवाच्या नगरावर स्वारी केली. रावणाला वीस हात होते तर सहस्रार्जुनाला हजार होते. त्या दोघांचें युद्ध झालें असतां सहस्रार्जुनानें रावणाचा पराभव करून त्याला बंदींत ठेवलें. त्यावेळीं पुलस्त्यानें मध्यस्थी केल्यामुळें सहस्रार्जुनाच्या बंदींतून रावणाची मुक्तता झाली.

एवढ्यानें रावणाचा गर्व कमी झाला नाहीं. त्यानें पुनः बल प्राप्त करून घेऊन तो वाली वानराला जिंकण्यासाठीं त्याच्या किष्किंधा नगरीवर चाल करून गेला. पण तेथें उलटाच प्रकार झाला. वालीनें त्याला सहज काखेंत दाबून चारी समुद्रांवर गरगर फिरवून आणलें. हा वानर आपल्याहून खूप पराक्रमी आहे अशी खात्री पटल्यावर रावणानें त्याच्याशीं सख्य जोडलें.

## सनत्कुमारांना प्रश्न

ब्रह्मदेवाचा पुत्र सनत्कुमार याला एकदां रावण भेटायला गेला. त्यावेळीं त्यानें सनत्कुमाराला विचारलेल्या प्रश्नांत एक असा होता—

'विष्णूच्या हातून मरण पावलेल्या प्राण्याची मरणानंतर काय गति होते ?'

त्यावर सनत्कुमार म्हणाला होता,

'विष्णूखेरीज इतर देवांच्या हातानें मृत्यु आल्यास मेलेले प्राणी स्वर्गाला जातात. कांहीं काळपर्यंत स्वर्गातील सुखें भोगून ते पुन्हां पृथ्वीवर जन्म घेतात आणि आपल्या पूर्वजन्मीच्या पापपुण्याप्रमाणें सुखदुःख भोगतात. असा जन्ममरणाचा त्यांचा फेरा सतत चालू राहातो. पण ज्या कोणा भाग्यवंताला प्रत्यक्ष भगवान विष्णूच्या हातानें मरण येतें तो विष्णुरूपच होतो."

हें रहस्य ऐकून रावणाला आनंद झाला. आपण प्रत्यक्ष विष्णूशीं युद्ध करावयाचें असा त्यानें मनाशीं निश्चय केला.

## श्वेतद्वीपांत रावणाची फजिती

एकदां रावण नेहमींप्रमाणें त्रिभुवनांतून हिंडत असतां नारदमुनींची व त्याची

गांठ पडली. नारद नुकताच ब्रह्मलोकांतून आला होता. नारदाला नमस्कार करून रावणानें विचारलें, ‘ भगवन्! माझ्याशीं युद्ध करूं शकेल असा कोणी योद्धा आपल्या पाहण्यांत आहे काय ? ’

नारद म्हणाला, ‘ श्वेतद्वीपामध्यें जे लोक राहातात ते मोठे बलाढ्य आणि पराक्रमी आहेत. तुला आपल्या बाहूंची खुमखुमी जिरवायची असेल तर श्वेत-द्वीपांत जा. तेथील लोकांचे देह मोठे असतात आणि त्यांचें बळहि प्रचंड असतें. ’

हें नारदाचें उत्तर कानीं पडतांच गर्विष्ठ रावण लगेच पुष्पक विमानांत बसला आणि श्वेतद्वीपांतील लोकांबरोबर युद्ध करण्याच्या ईर्ष्येनें तिकडे गेला. पण श्वेतद्वीपाच्या सीमेवर तें पुष्पक विमान जातांच असा चमत्कार झाला कीं, तेथील लोकांच्या तेजामुळेंच त्या विमानाची गति खुंटली आणि तें जागच्या जागीं उभें राहिलें. रावण खालीं उतरला आणि आपल्या मंत्र्यांसह श्वेतद्वीपांत शिरला. इतक्यांत तेथें असलेल्या अवाढव्य देहाच्या एका स्त्रीची नजर त्याच्याकडे गेली. दहा तोंडांचें तें बाहुलें पाहून तिला मोठी मौज वाटली तिनें त्याला सहज हातानें धरून उचललें व विचारलें,

“अरे तूं कोण ! इकडे कुठून आलास ! तुला इकडे कुणी पाठविलें ! हें सगळें मला सांग पाहूं. ”

इतक्यांत आणखी एक स्त्री तेथें आली पहिल्या स्त्रीच्या हाती असलेल्या रावणाला पाहून तिलाहि गंमत वाटली तिनें पहिलीच्या हातांतून त्याला ओढून आपल्या हातीं घेतलें. त्याचें तें विचित्र रूप पाहून त्या स्त्रीला हंसू आलें. आणखी कांहीं स्त्रिया तेथें जमल्या आणि त्यांनीं रावणाला हातांत फेंकायचा आणि ओढून घ्यायचा खेळ सुरू केला. रावण मोठ्या मुष्किलीनें त्या स्त्रियांच्या हातांतून निसटला आणि तेथून पळून गेला.

## रावणानें सीताहरण कां केलें ?

त्या स्त्रियांनीं आपली अशी दीन परिस्थिति करावी याचें रावणाला नवल वाटलें. पण त्याबरोबरच नारदाचे शब्द त्याला आठवले. विष्णूच्या हातून मरण आल्यामुळें हे लोक एवढे बलाढ्य झाले आहेत, असें नारद म्हणाला होता. त्याचा त्याला रोकडा अनुभव आला. आपणहि विष्णूच्या हातूनच मरण मिळवायचें हा त्याचा दृढ निश्चय झाला. विष्णूच्या हातून मरण यायचें म्हणजे प्रथम त्याला कोप येईल असें कांहीतरीं केलें पाहिजे. असें ठरवून त्यानें देवादिकांचा छळ केला. शेवटीं दंडकारण्यांत सीतेचें हरण केलें. राम हा विष्णूचा अवतार आहे, हें त्याला ठाऊक होतें. म्हणूनच त्यानें सीतेचें हरण केलें होतें. रामचंद्रापासून आपला वध व्हावा यासाठींच त्यानें हा खटाटोप केला होता.

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास

× × ×

गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता-प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

**अर्जुन—**

१ संन्यासा स्तविता, देवा, पुन्हां कर्मास वानिता ।
सांगा, दोहोंत जें श्रेष्ठ, निश्चयें तेंचि तत्त्वतां ॥

**श्रीभगवान्—**

२ कर्मयोगें नि संन्यासें, दोन्हीनें मोक्ष बा मिळे ।
संन्यासाहूनि तें कर्म करणें तरि आगळें ॥

३ जाण तो नित्य संन्यासी द्वेष, इच्छा, न वा जया ।
द्वंद्वातीत अनायासें बंध-मुक्त धनंजया ॥

४ म्हणती मूर्ख, न ज्ञानी भिन्न संन्यास-योग हे ।
धरि जो दृढ एकातें तो दोहींच्या फळास घे ॥

५ संन्यासें मोक्ष जो लाभे कर्मयोगेंहि तो मिळे ।
ऐक्य दोहोंत या पाही तत्त्व त्यास खरें कळे ॥

६ संन्यास हा तरी कर्म-योगावीण सुदुर्लभ ।
कर्म-योगी मुनि ब्रह्म मिळे शीघ्र, नरर्षभ ॥

७ इंद्रिया नि मना जिंकी योगी तो शुद्ध अंतरीं ।
भूतमात्रीं स्वयें, ना तो बद्ध, कर्में जरी करी ॥

८-९ बघतां, खातां, भाषण करितां, जातां, निजतां विसर्जितां ।
श्वासोच्छ्वासा करितां, घेतां, उघडझांप नेत्रीं करितां ॥

तसें स्पर्शता, कांहीं हुंगता, विषयिं इंद्रियें प्रवर्तती ।
कांहिंहि न करीं मी, जाणावें, ऐसें तत्त्वज्ञें चित्तीं ॥

१० कर्में ब्रह्मी समर्पुनी जो आसक्तीविण नित्य करीं ।
लिप्त न पापें, तो तो यानें पद्म–पत्र तें जेंवि सरी ॥

११ मनें, बुद्धिनें, देहें केवळ इंद्रियांनिही, वा कारिती ।
कर्मे योगी शुद्ध कराया चित्त, न आशा लव धरिती ॥

१२ योग–युक्त तो त्यजुनि कर्म–फल शान्ती मिळवी शेवटली ।
इतर बद्ध ते होति वासना–योगें आशा धरुनि फलीं ॥

१३ मनें सोडुनी सगळीं कर्में नउ दारांच्या या नगरीं ।
सुखें जितेंद्रिय देही राहे कांहीं करवी वा न करी ॥

१४ कर्तृत्व न वा कर्में अथवा कर्म–फलाची ती जोड ।
लोकांची ना निर्मी ईश्वर सकल प्रकृतीचे कोड ॥

१५ परमात्मा तो न घे कुणाचें पाप, पुण्य वा तूं जाण ।
मोह पावती प्राणी, कारण झांकी अज्ञाना ज्ञान ॥

१६ विनष्ट झालें ज्यांचें, ज्ञानें परंतु सारें अज्ञान ।
परमतत्त्व तें स्पष्ट करूनीं दावी रविसें, त्यां ज्ञान ॥

१७ बुद्धि रंगली, रमलें अंतर त्यांतचि, त्याचाच ध्यास ।
ज्ञान अशांचें पाप धुतें, ते न पुन्हां येती जन्मास ॥

१८ विद्या–विनय–विभूषित–विप्र, द्विज, चांडाल, श्वा, दन्ती ।
ज्ञानी–जन या समस्तांकडे समदृष्टीनेंची बघती ॥

१९ साम्यीं स्थिर मन ऐसें, त्यांनीं जन्म जिंकिला येथेंच ।
ब्रह्म सम नि निर्दोष म्हणूनी ब्रह्मीं वसती ते साच ॥

२० प्रिय लाभें ना हरिखे अथवा अप्रिय लाभें न उदास ।
ब्रह्मज्ञ स्थिर–बुद्धि असा तो सुज्ञ ब्रह्मीं करि वास ॥

२१ विषय–भोगिं जे उदास त्यांना सुख लाभे कीं आत्म्यांत ।
ब्रह्मीं वसती ते चित्तानें, अक्षय सुखिं त्या रमतात ॥

२२ संयोगें जे भोग, देति ते पार्था दुःखचि नी शोक ।
आरंभ नि त्या अंत, न रमती त्यांत शहाणे जे लोक ॥

२३ देहांत असे तोंवर हल्ले हे कामाचे नि क्रोधाचे ।
सोसूं शकतो तो योगी कीं त्यातें लाभे सुख साचें ॥

२४ तेजोमयचि स्वयें अंतरीं भोगी सुख नी आराम ।
ब्रह्मभूत तो योगी पावे ब्रह्म—मुक्तिचें कीं धाम ॥

२५ द्वैत गळूनी सकल—भूत हित करितां मुनिवर ते रमती ।
आत्मसंयमी ते निष्पापी ब्रह्म—मोक्ष—गिरिवर चढती ॥

२६ आत्मज्ञानी नियत—चित्त जे काम—क्रोधातीत यती ।
ब्रह्म—मोक्ष त्यां सहजचि लाभे बसल्याठायीं सभोंवतीं ॥

२७—२८ स्पर्श बाह्य बाहेराचि ठेवी भ्रू—मध्यें स्थिर दृष्टि करी ।
नासिकांतुनी संचरणारे प्राणापान समान करी ॥
बुद्धि, इंद्रियें मन या जिंकी सुटले इच्छा क्रोध भय ।
मोक्षाचा ज्या ध्यास सदा तो मुक्तचि पार्था मुनि होय ॥

२९ भोक्ता यज्ञ—तपाचा, सकलहि लोकांचा मी थोर धनी ।
सखा तसा सर्वहि जीवांचा शांति मिळे हें ओळखुनी ॥

---



## संत सेना न्हावी यांचें मागणें

सांडोनी कीर्तन । न करीं आणिक साधन ॥
पुरवा आवडीचें आर्त । तुम्हां आलों शरणागत ॥
मुखीं नाम वाहिन टाळी । नाचेन निर्लज्ज राउळी ॥
सेना म्हणे नुपेक्षावें । हेंचि मागे जीवेंभावें ॥

# संतांच्या गंमतीच्या गोष्टी

## साईबाबांनीं दान दिलें पण नशीब आडवें आलें

केव्हां केव्हां कांहीं विचित्र गोष्टींनीं साईबाबा भक्तांच्या श्रद्धेची कसोटी पाहात असत. १९१२ सालची गोष्ट. बरीच भक्तमंडळी जमलेली होती. द्वारकामाईत प्रसादाची हंडी तयार होत होती. हंडीत टाकण्यासाठीं आणलेलें मांस बारीक करण्याचें काम चाललें होतें. कधीं-कधीं अशी मांसाची हंडी होत असे. त्या दिवशीं शिरडीशेजारच्या एका खेड्यांतला एक ब्राह्मण बाबांच्या दर्शनासाठीं आला. दर्शन घेऊन तो परत जाऊं लागला. त्यावेळीं बाबा द्वारकामाईतून सभामंडपांत आले व मटन बारीक करणाऱ्यास म्हणाले, 'अरे यांतलें थोडें या ब्राह्मणाला द्या! त्याचीं मुलेंबाळें खातील!'

१९१२ सालीं भक्ष्याभक्ष्याचा विधि-निषेध केवढा! सोवळ्या ओंवळ्याचें बंड किती! त्यांतून तो खेडेगांवचा कर्मठ भिक्षुक. उभ्या आयुष्यांत त्यानें कधीं मांस डोळ्यानें पाहिलेलें नाहीं. स्वाभाविकच बाबांचे ते शब्द ऐकून त्याची भयानें बोबडी वळली. श्री. बाळाजी जगताप वगैरे कांहीं मंडळी मटन नीट बारीक करण्यासाठीं बसलेली होती. त्यांनाहि मोठा पेंच पडला. त्यावेळीं अशीहि भावना असे कीं ज्या दिवशीं मांसाहार केलेला असेल त्या दिवशीं ब्राह्मणास स्पर्शहि करूं नये. अशा परिस्थितींत त्या ब्राह्मणाला कचें मांस द्यायचें! आपण मांस द्यायचें कसें आणि हा ब्राह्मण तें नेणार कसें? उलटपक्षीं न द्यावे अथवा कांहीं उलट सांगावें तर बाबांच्या क्रोधाचें भय. ती मंडळी गोंधळून मोठ्या संकटांत पडली. इतक्यांत बाबा रागावून म्हणाले, 'अरे काय सांगतों मीं? त्याच्या पदरांत द्या थोडें मांस बांधून.'

मग घाबरून घाईघाईनें एकानें मुकाट्यानें मांसाचे चारपांच तुकडे त्या ब्राह्मणाच्या उपरण्याच्या पदरांत बांधून दिले आणि मनांतून मोठा कष्टी होऊन ब्राह्मण तेथून निघाला.

शिरडीपासून सुमारें दीड मैल आल्यावर एक पाण्याचा पाट लागला. पाणी पाहिल्यावर त्या ब्राह्मणाच्या मनांत आलें कीं मटन इथें टाकून द्यावें व उपरणें स्वच्छ करावें. तो रस्त्यालगतच्या शेतांत गेला नि तेथें उपरणें सोडून गांठींत बांधलेल्या मांसाकडे न पाहातांच त्यानें तें झटकून टाकलें आणि उपरणें धुण्यासाठीं तो पाटाकडे परत आला.

उपरणें धूत असतांना हाताला कांहींतरी कठीण लागलें. त्याला वाटलें मांसातलें हाड चिकटून राहिलें असावें. म्हणून पाहतो तों चांगली तोळा पाऊण तोळा वजनाची सोन्याची कांडी चकाकतांना त्याला आढळली! ती बघून तो ब्राह्मण अगदीं स्तिमित होऊन गेला! बाबांची अगम्य लीला आणि स्वतःचा करंटेपणा या दोहोंची त्याला एकाचवेळीं प्रचीति आली.

लगेच पळत पळत जिथें त्यानें मांस टाकून दिलें होतें त्या जागेकडे आला पण त्याला मांसाचा मागमूसहि लागला नाहीं. तो आशेनें परत द्वारकामाईत आला. त्यानें घडलेली हकीगत सर्वांना सांगितली. त्यांना ती सोन्याची कांडी दाखविली. हा प्रकार चालला होता, इतक्यांत बाबा तेथें आले आणि खूप क्रोधाचा अवतार धारण करून हातांत सटका घेऊन त्या ब्राह्मणावर धांवले. ब्राह्मण बिचारा घाबरून पळाला. बाबा नंतर म्हणाले, 'ब्राह्मण दुर्भागी! त्याच्या मुलांच्या नशिबांत तें होतें. पण याचें नशीब आडवें आलें.'

× × ×

## जग हालवून सोडणारें भाषण!

१८९७ सालची गोष्ट.

रामकृष्ण मिशनचा मठ स्थापन केल्यानंतर स्वामी विवेकानंदांनीं जन–हिताचीं अनेक कार्यें चालू केलीं होतीं. त्यासाठीं आपल्या गुरुभाईंना विविध प्रकारचें शिक्षण ते देत असत. त्यावेळीं मठ आलमबझार येथें होता. आपल्या गुरुबंधूंना सार्वजनिक सभांतून भाषणें करतां येणें आवश्यक आहे असें ठरवून, स्वामी विवेकानंदांनी आपल्या मठापुरती 'वक्तृत्वोत्तेजक सभा' चालू केली होती. प्रत्येक आठवड्याला एका ठराविक दिवशीं मठांतील संन्याशापैकीं कोणा तरी एकाला एखाद्या विषयावर तयारी करून भाषण करावें लागत असे.

स्वामी सुबोधानंदांची एका आठवड्याला बोलण्याची पाळी होती. सुबोधानंदांना जाहीर भाषणाचा कंटाळा. त्यांनीं आपल्यावरचा हा प्रसंग टाळण्याचा खूप प्रयत्न केला, पण विवेकानंदांनीं त्यांची ही लटपट चालूं दिली नाहीं. ठरल्या दिवशीं सभा भरली. सगळे मठवासी सभेला गोळा झाले आणि सुबोधानंदांची कशी काय गंमत होते हें पाहण्यासाठीं त्यांच्या भाषणाची उत्कंठेनें प्रतीक्षा करीत बसले.

व्याख्यान सुरू होण्याची वेळ झाली स्वामी सुबोधानंद व्यासपीठावर येऊन उभे राहिले. व्याख्यानाला त्यांनीं प्रारंभ केला आणि जेमतेम दोन चार शब्द ते बोलले न बोलले इतक्यांत—

इतक्यांत जमीन थरारली, इमारती हादरल्या, झाडें उन्मळून पडलीं आणि जिकडे तिकडे मोठा हाहाकार उडाला! कारण सुबोधानंदांचें भाषण सुरू होण्याच्या क्षणालाच १८९७ सालचा तो प्रचंड भूकंप झाला होता. अर्थात् मग कुठलें भाषण नि कुठलें काय!

भूकंपाच्या प्रचंड आपत्तीमुळें स्वाभाविकच सुबोधानंदांवरची भाषणाची आपत्ति टळली. पण तेव्हांपासून त्यांच्या वक्तृत्वाची प्रशंसा मात्र सतत होऊं लागली! स्वामी विवेकानंद म्हणत, 'जगांत अक्षरशः जग हालवून सोडणारें भाषण जर कोणी केलें असेल तर तें आमच्या खोका महाराजांनीं!'

सुबोधानंदांना 'खोका महाराज' असेंहि म्हणत असत. 'खोका' या बंगाली शब्दाचा अर्थ 'लहान' असा आहे. सुबोधानंद हे वयानें आपल्या गुरुबंधूमध्यें सर्वांहून लहान होते. म्हणून त्यांना हें नांव पडलें होतें.

## चहाचें माहात्म्य

स्वामी सुबोधानंदांना चहा अतिशय प्रिय असे. ते श्रीरामकृष्ण परमहंसांकडे येऊं लागले तेव्हां अगदींच पोरवयाचे होते. त्यावेळींहि चहावर त्यांची भक्ति खूप! रामकृष्णांच्या घशाला विकार झाला तेव्हां त्यांना त्यापासून अतिशय त्रास होई. औषधपाणी चालू होतें. एकदां लहानगा सुबोध त्यांच्या बरोबर बोलत असतांना त्यांना म्हणाला, 'आपण चहा घेऊन बघा ना! चहानें तुमच्या घशाला आराम पडेल अशी माझी पक्की खात्री आहे!'

रामकृष्णांची वृत्ति एखाद्या बालकासारखी! आपला निर्व्याज अंतकरणाचा सुबोध एवढ्या निश्चितीनें चहाची शिफारस करतो आहे, तेव्हां असेलहि चहामध्यें एवढा गुण! अशा विचारानें रामकृष्ण चहा प्यायला लगेच तयार झाले. पण डॉक्टरनीं हा दोघांचा विचार मोडून काढला आणि चहाचा उपाय तसाच राहिला.

पुढें मठामध्यें एकदां कोणत्या तरी विशेष कार्यामुळें स्वामी विवेकानंद स्वामी सुबोधानंदावर प्रसन्न झाले. ते सुबोधानंदांना एखाद्या देवतेचा आव आणून म्हणाले "वत्सा! मी तुझ्यावर आज प्रसन्न झालों आहे. तुला कोणता वर मागायचा असेल तर आत्तां मागून घे. तूं मागशील तो वर मी तुला देईन."

स्वामी सुबोधानंदांनीं गंभीरपणें स्वतःशीं खूप विचार केला. काय वर मागावा? पण त्यांना कांहीं सुचेना. कामिनीकांचनाची सारी आसक्ति ज्याच्या अंतःकरणांतून पार गेलेली आहे, संसाराचा ज्यानें निःशेष त्याग केला आहे आणि केवळ ईश्वर–सेवेला ज्यांनें आपलें सबंध जीवन वाहिलें आहे, त्याचें मन सदैव सुखरूप असल्यामुळें त्यानें मागावें तरी काय? सुबोधानंद बराच विचार करून म्हणाले,

"नाहीं बुवा! आपल्याला कांहीं मागायचं सुचत नाहीं."

विवेकानंद आग्रहानें म्हणाले, 'छे छे! तसं चालायचं नाहीं. मी एवढा प्रसन्न झालों आहें तर तूं एखादा वर मागून घेतलाच पाहिजे!'

त्यावर सुबोधानंदांना एकदम एक विचार सुचून ते म्हणाले,

'ठीक आहे! तर मग मला असा वर द्या कीं माझा सकाळचा चहाचा कप कधींहि चुकणार नाहीं!'

विवेकानंद हंसून म्हणाले, 'तथास्तु!'

सुबोधानंदांनीं कोणता प्रचंड वर मागून घेतला हें मठांतल्या लोकांना समजल्यावर खूप हंशा पिकला.

इथें एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. सुबोधानंदांचा सकाळचा चहाचा कप खरोखरीच त्यानंतर कधींहि चुकला नाहीं. अखेरच्या महासमाधीच्या दिवशींहि त्यांचा सकाळचा चहा झाला होता!

* * *

## एका पेयाची नवलकथा

स्वामी विज्ञानानंद हे पूर्वाश्रमीं इंजिनियर होते. बेलूर मठाच्या इमारती बांधण्याचें काम स्वाभाविकच त्यांच्या हातीं सोपविण्यांत आलें होतें. बेलूर मठासमोर गंगेला घाट बांधण्याचें काम त्यांच्याच

देखरेखीखालीं झालें. एकदां भर दुपारीं उन्हाचे ते गंगाकांठावर काम करीत होते. स्वामी विवेकानंदांनीं त्यांना उघड्या डोक्यानें उन्हांत खपतांना पाहिलें. ते आपल्या एक शिष्याला हांक मारून म्हणाले, 'अरे, विज्ञानानंद भर उन्हांत काम करतो आहे. त्याला थोडें थंडगार पेय नेऊन दे बरं.'

शिष्य त्याप्रमाणें पेयाचा ग्लास घेऊन निघणार इतक्यांत विवेकानंदांनीं त्यांतलें चार थेंबभर पेय एका ग्लासांत ओतलें आणि तें विज्ञानानंदांना नेऊन द्यायला सांगितलें. या थट्टेनें विज्ञानानंदांची कशी गंमत होते हें पाहायला सारेजण जमले! विज्ञानानंदांनीं तें पाठविलेलें ग्लास घेतलें. आंत कांहीं थेंबभरच पेय आहे हें त्यांनीं पाहिलें. पण कांहीं न बोलतां मोठ्या गंभीरपणें त्यांनीं तें पिऊन टाकलें.

थोड्या वेळानें विज्ञानानंद मठांत आल्यावर विवेकानंदांनीं त्यांना विचारलें, 'पेय कसं काय होतं?'

विज्ञानानंद म्हणाले, 'छान होतं!'

दोघेहि यावर हंसले. पण लगेच गंभीर होऊन विज्ञानानंद पुढें म्हणाले,

'पण एक आश्चर्य सांगतों स्वामीजी! ते चार थेंबच खरे! पण ते मी प्याल्या-बरोबर खरोखरीच माझी सारी तहान क्षणार्धांत पार नाहींशी झाली!'

× × ×

## ध्यानाचें गोड फळ!

स्वामी ब्रह्मानंद हे रामकृष्ण मिशनचे अध्यक्ष. त्यांच्या वागण्या-बोलण्यांत एक तऱ्हेचा राजासारखा रुबाब होता. त्यांना त्यांचे गुरुबंधु प्रेमानें राजाच म्हणत असत. सौजन्य, सहृदयता आणि सहानुभूति यांचा मूर्तिमंत अवतार असें त्यांचें वर्णन यथार्थ-पणें केलें जातें. विमल ज्ञान आणि परमार्थ भक्ति यांचा मनोहर संगम त्यांच्या ठिकाणीं झालेला होता.

पण ब्रह्मानंदांच्या ठिकाणीं खेळकर-पणा आणि थट्टेखोरपणाहि भरपूर होता! लहान मुलांशीं ते खेळत असले म्हणजे त्या मुलांइतकेच ते जणूं लहान होऊन त्यांच्याशीं समरस होऊन जात.

आपल्या गुरुबंधूंची आणि शिष्यांचीहि ते कधीं कधीं प्रेमानें थट्टा करीत आणि आश्रमांत हास्याचा पूर लोटे.

एकदां एक शिष्य डोळे मिटून ध्यानाला बसला होता. ब्रह्मानंदांनीं एक फळ हळूच त्या शिष्याच्या पुढ्यांत आणून ठेवलें. कांहीं वेळानें तो शिष्य ध्यानांतून पूर्वावस्थे-वर येऊन त्यानें डोळे उघडले. त्याबरोबर ब्रह्मानंद त्याच्या पुढ्यांतल्या फळाकडे बोट दाखवून म्हणाले, "अरे वा! हें बघ तुझ्या ध्यानाचें फळ! ध्यानाचें फळ गोड असतें यांत आतां कांहीं शंका आहे काय?"

## मेण्यांतला प्रवास

एकदां ब्रह्मानंदांचा एक गुरुबंधु कांहीं अगत्याच्या कार्यासाठीं रात्रीं गांवाला जायला निघाला. आणखी एक दिवस रहा असा ब्रह्मानंदांचा आग्रह होता. पण काम मठाचें आणि तें निकडीचें असल्यामुळें त्यानें ऐकलें नाहीं. अखेर मोठ्या अनि-च्छेनें ब्रह्मानंदांनीं त्याला जाण्याची परवानगी दिली.

त्या गुरुबंधूला रात्रौ स्टेशनवर नेण्यासाठीं मेणा यायचा होता. तो आला. मेणा निघण्यापूर्वी ब्रह्मानंदांनीं मेण्याच्या भोयांना बोलावून हळूच कांहीं तरी त्यांच्या कानांत सांगितलें. नंतर तो गुरुबंधु मेण्यांत बसला. मेणा निघाला. 'हूं : हूं :' या तालावर भोई मेणा खांद्यावर घेऊन चालूं लागले. रात्रीची वेळ असल्यामुळें त्या मेण्यांतील संन्याशाचा डोळा लागला. रात्रभर मेणा चालत होता. उजाडायच्या वेळीं भोयांनीं मेणा जमिनीवर ठेवला. डोळे उघडून मेण्यांतला संन्याशी पाहातो तों आपण मठाच्या दाराशीं आहोंत असें त्याला आढळलें ! आंतून स्वामी ब्रह्मानंद मोठा गंभीर चेहेरा करून पुढें आले आणि त्यांनीं आपल्या गुरुभाईचें स्वागत केलें ! त्याला आपण हंसावें कीं रागवावें हें समजेना ! रात्रभर मेण्यांत बसून प्रवास करून तो परत मठांतच आला होता !

———


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | ,, | १–०–० |
| (७) | श्री साई–लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |
| (८) | श्री साई–सुमनांजली | | ,, | ,, | ०–१–० |
| (९) | कीर्तन–पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, | ,, | १–८–० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | | ,, | ,, | २–०–० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०–२–० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, | ,, | ४–८–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. १

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# आरती

आरती सद्गुरु साई की । कहूँ महिमा अपार जिनकी ॥
कृपा कर अब तो कृपानिधान, सुबुद्धि ऐसी करो प्रदान ।
लगे मम श्री चरणन में ध्यान, हो जिससे भक्तों का कल्याण ।
मिटे पीडा सब भक्तन की । कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥१॥

सुनी भक्तों की सदा पुकार, कर दिये भवसागर से पार ।
तुम्हारी माया अपरमपार, शरण में अब तो लो कर्तार ।
रहे छाया श्री चरणन की, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥२॥

भावना रही जिसकी जैसी, लखी प्रभु मूरति तिन तैसी ।
तुम्हारी माया की शैली, है चातक स्वाति बिंदु जैसी ।
मिटो दो तृष्णा दर्शन की कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥३॥

सदा भक्तों के रखवारे, मिटाते उनके दुख सारे ।
हजारों ही तुमने तारे, जीवन तुम पर ही वारे ।
हो मुक्ति जिससे जीवन की, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥४॥

तुम हो पूर्ण ब्रह्म भगवान, मैं हूँ खल मूरख अज्ञान ।
तुम्हारा ही करते गुणगान, निकले इस तनसे जब प्राण ।
भावना पूर्ण होय मनकी, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥५॥

नहीं कुछ संपत्ति मेरे पास, केवल श्री चरणन की आस ।
लगी है "देव" हृदय में ताप, मिटे जिससे मनका संताप ।
पूर्ण इच्छा हो जीवन की, कहूँ महिमा अपार जिनकी ॥आ०॥६॥

**श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय**

मकर संक्रान्ति महू १३-१-५७

रचियता—श्री. देवकरन

'ट्रीटमेंट' द्यायला आलेले डॉक्टर स्वतःच ट्रीटमेंट घेऊन परत गेले! कारण—

# विनोबांचा वैद्य परमेश्वर

आचार्य विनोबा भावे यांना सर्वजण बाबा म्हणतात. बाबांच्या भूदानकार्याची माहिती भारताच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोंचलेली आहे. बाबांचें भूदानकार्य हें राजकारण म्हणून चाललेलें नसून ईश्वरसेवा म्हणून चाललेलें आहे. विनोबांनीं आपल्या भक्तीच्या बळानें देहावर कसा विजय मिळविला आहे याची एक मनोवेधक आठवण श्री. दामोदरदास मुंदडा यांनीं 'भूदान-यज्ञ' साप्ताहिकाच्या एका अलिकडच्या अंकांत दिली आहे. ती अशी:—

त्या दिवशीं बाबांचा मुक्काम एका खिश्चन शाळेंत होता. मुक्कामावर परत येतांच "गीता-प्रवचना" वर स्वाक्षरी देण्यास त्यांनीं सुरुवात केली होती. पण तेवढ्यांतच त्यांना कांहींशी अस्वस्थता वाटूं लागली. वरचेवर ते पोटावरून हात फिरवूं लागले. लेखणीला डेस्कचा आधार देऊन स्वाक्षरी देण्याचें काम चालूच ठेवलें. जवळच मीराबहेन उभी होती, तिला कळेनाच कीं हजारों "गीता प्रवचनां"वर स्वाक्षरी देणारे हात आज असे संकोच कां करीत आहेत? त्यांना कांहींशी अस्वस्थता वाटूं लागली असल्याचा संशय तर आलाच होता. शेवटीं हात थांबला आणि कित्येक लोकांना निराश व्हावें लागलें. घरीं परतण्याऐवजीं ते रस्त्यावरच थांबून राहिले.

बाबांच्या पोटांत दुखूं लागलें होतें. सर्वांचे डोळे या महामानवावर खिळले होते. एका क्षणांत वातावरण गंभीर चिंतेनें भरून गेलें. वाऱ्यासारखी बातमी सर्वत्र पसरली आणि सारा गांव तेथें गोळा झाला.

बाबांना फारच अशक्तता वाटूं लागली. डॉक्टरांच्या सांगण्यावरून त्यांनीं एनिमा घेतला, परंतु फरक वाटला नाहीं. वेदना तीव्र होत राहिल्या. बाबांच्या तोंडून 'आई-आई' असा व कण्हण्याचा आवाज निघूं लागला. डॉक्टरांनीं कांहीं गोळ्या खाण्याबद्दल त्यांना पुनः पुनः प्रार्थना केली. अशा वेदनांवर अल्युमिनियमच्या गोळ्या त्यांनीं सुचविल्या. बाबांनीं ध्यान देऊन सर्व ऐकलें. नंतर नम्रतापूर्वक म्हणाले. "मी आतांपर्यंत यावर कसलेंहि औषध घेतलेलें नाहीं."—परंतु एवढें बोलतांनाहि त्यांना फार कष्ट होत होते. आतांपर्यंत केवळ वेदनाच होत होत्या, आतां जीव घाबरा व्हायला लागला, श्वास घ्यायला कष्ट पडूं लागले. सर्वांची मनःस्थिति चिंताव्याकुळ होणें स्वाभाविकच

होतें. मूक प्रार्थनेशिवाय कोणीच कांहीं करूं शकत नव्हता. वेदना आणखीच तीव्र होऊं लागल्या. गेल्या पांच-सात वर्षांत असा त्रास त्यांना झाल्याचें आम्ही पाहिलें नव्हतें.

खिडकीबाहेर दृष्टि जातांच, शेकडों लोकांच्या चिंतायुक्त मुद्रा पाहून ते म्हणाले,—"एका माणसाकरितां किती लोकांना चिंता!" या सर्वांची चिंता हरणाऱ्या सर्वशक्तिमान् प्रभूलाच जणूं कांहीं त्यांनीं हृदयपूर्वक आवाहन केलें. इकडे जवळ जे कोणी होते, त्या सर्वांच्या हृदयांत द्रौपदीच्या आणि गजेंद्राच्या आर्ततेचा प्रतिध्वनि उमटत असला तर आश्चर्य नाहीं.

बाबांच्या पचनक्रियेवर परिमाण झालेला होता हें त्यांना झालेल्या उलटीवरून लक्षांत आलें. आदल्या रात्रीं त्यांना नीट झोंप लागली नव्हती, कारण जेथें मुक्काम होता, त्याच्याच शेजारीं लग्नानिमित्त जोराची धामधूम सुरू होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुक्कामावर पोहोंचेपर्यंत ऊनहि खूप कडक पडलें होतें आणि दुपारींहि वानरसेनेमुळें त्यांना विश्रांति मिळाली नव्हती. या सर्वांचा परिणाम पचनक्रियेवर झाला होता.

थंडी तर बाबांना सुरुवातीपासूनच वाजत होती. त्यांनीं थोडासा शेकहि घेतला. उलटीनंतर थंडी जास्त वाजूं लागली. अंगांत तापहि भरला; परंतु संकट टळल्यासारखें सर्वांनाच वाटलें. खाटेवर निजवून बाबांना मग बाहेर हॉलमधें आणलें. त्यांना स्वतःलाहि थोडी शांति वाटत होती. खाट बाहेर आणतांना ते म्हणाले, 'चार लोक आहेत ना?'—असा कठोर विनोद तेच करूं शकत होते, परंतु त्यांना प्रसन्न वाटावें म्हणून उत्तर दिलें गेलें, 'नाहीं, त्रयाणां धूर्तानाम् आहेत.'

उद्यांपासून दुसरा जिल्हा सुरू होणार होता. जिल्ह्यांतील सेवक उपस्थित होते. पुढील कार्यक्रम स्थगित करण्याची सूचना तारेनें देण्यांत आली होती आणि कांहीं दिवस येथेंच विश्रांति घेण्याची व्यवस्था करण्यांत आली. कदाचित् अंतःप्रेरणेनें या सर्व गोष्टींचें भान बाबांना झालें असावें. ते ताईंना म्हणाले, 'महादेवी! बाबा आतां पांच मैल चालत जाऊं शकतो.' चतुर ताईनें तावडतोब त्यांना म्हटलें, 'तुम्हांला आतां विश्रांति घ्यावयाची आहे!' परंतु त्या थंडी-तापांतहि बाबांनीं बोलणें चालूच ठेवलें.

'किती मैल आहे आजचा मुक्काम?'

'नऊ मैल, दोन फर्लांग.'

'डॉक्टरांना यायचें असेल तर आत्तां ते येऊं शकतात. यात्रा साडेचार वाजतां सुरू होईल.' आतां ताईच्यानें राहावेना, दुःख आणि चीड दोन्ही उफाळून आलीं. "तुम्ही कोणाचें ऐकतच नाहीं, मग सर्वांनाच काळजी वाटते! आज यात्रा होणार नाहीं. डाक बंगला चांगला आहे आणि तुमचा जाण्याचाच हट्ट असेल, तर मोटारींतून जावें लागेल. मोटार तयार आहे.'

'हें पहा महादेवी, हा कांहीं चर्चेचा विषय नव्हे, मी आणि ईश्वर यांच्या मधली ही गोष्ट आहे. जोंपर्यंत शरीर यात्रा करूं शकतें तोंपर्यंत तें करणारच. ज्या दिवशीं पाय थकतील आणि ईश्वराची इच्छा असणार नाहीं त्या वेळीं तो मोटा-

रींत बसवील. यात्रा पायींच होणार, तुम्ही मोटार घेऊन मागें मागें येऊं शकतां.'

दर दोन मैलांवर ताई मोटारींतून उतरत असे आणि बाबांना मोटारींत बसण्याचा आग्रह करीत असे, पण बाबा कांहीं ना कांहीं तरी निमित्त करून टाळत असत. शेवटीं जेव्हां ताई ऐकेचनात तेव्हां ते म्हणाले, 'जा, सातव्या मैलावर व्यवस्था करा.' आणि जेव्हां सातवा मैल आला तेव्हां ते हंसून म्हणाले, 'अरे, आतां तर आलों. जा, पुढच्या मुक्कामावर जाऊन व्यवस्था करा. आम्ही आलोंच.' —ताईनीं पाहिलें कीं अखेर बाबांनीं आपल्याला फसविलें आहे. त्या गुपचूप निघून गेल्या. आर्यनायकमूजी म्हणाले, 'बाबा, आज तुम्ही डॉक्टरांचे सर्व कायदे झुगारून दिले. डॉक्टरांनीं आम्हांला स्पष्ट सांगितलें होतें कीं कोणत्याहि परिस्थितींत पेशंटनें चालतां कामा नये.'

'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्,।' बाबा उत्तर देऊं लागले, "परमानंद माधवाच्या कृपेनें काय होऊं शकणार नाहीं?" मग त्यांनीं रामदासांचा श्लोक म्हटला, 'ईश्वर नित्य माझ्या जवळच आहे. माझा लहानसा प्रयत्नहि तो कृपा दृष्टीनें पाहत असतो. कैवल्यदानी, सुखानंद आनंदराम आपल्या भक्तांचा अभिमानी आहे, तो त्यांची कधींच उपेक्षा करीत नाहीं. त्याला आपल्या दासांचा अभिमान आहे, पण आपण खरेखुरे दास बनतोंच कुठें?"

डॉक्टर दिवसभर बरोबर राहिले होते. दोन वेळां बाबांना त्यांनीं तपासलें. त्यांच्या जुन्या अल्सरबरोबरच त्यांना 'गॉल ब्लॅडर'ची भीति उत्पन्न झाल्याचें आढळलें. ब्लडप्रेशरहि फारच कमी होतें. ताप नव्हता, पण अशक्तपणा होता. पण तरी सुद्धां नऊ मैल चालून ते आले होते. सायंकाळच्या प्रार्थनेंत ते बोललेहि. दुपारीं कार्यकर्त्यांचें संमेलनहि झालें. डॉक्टर तर त्यांची दिनचर्या पाहून स्तंभितच झाले.

सातत्ययोगाचा महिमा आज पुनः एकदां त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानेंच सिद्ध केला होता.

डॉक्टर निरोप घ्यायला आले. 'गीता-प्रवचना'वर स्वाक्षरी घेतली. भक्तिभावानें साष्टांग प्रणिपात केला, सद्गदित होऊन परतले. रस्त्यामध्यें ते मला म्हणाले, "मी आलों होतों त्यांना ट्रीटमेंट द्यायला पण मी स्वतःच ट्रीटमेंट घेऊन जात आहें! या निमित्तानें त्यांचा सत्संग लाभला हें माझें भाग्य होय. त्यांचा वैद्य तर परमेश्वरच आहे, त्यांना माझ्यासारख्या वैद्याची काय गरज?"

# ज्ञानेश्वर

श्री ज्ञानेश्वर महाराज व त्यांची अमर वाङ्मयमूर्ति ज्ञानेश्वरी यांविषयीं जनतेच्या अंतःकरणांत नेहमींच आदर, प्रेम व जिव्हाळा आहे. व जसजशी वर्षें जातात, तसतशी त्यांत भरच पडत आहे. ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी याविषयीं कोणी बोलूं लागला कीं, श्रोते ऐकण्यास उत्सुक असतात. आज मी आपणापुढें ज्ञानेश्वरी ग्रंथांतून ज्ञानेश्वर महाराजाविषयीं काय माहिती मिळते याविषयीं कांहीं विचार मांडणार आहें. 'ज्ञानेश्वरींतील ज्ञानेश्वर,' हा विषय तसा कुतूहल निर्माण करणारा आहे. पण ज्ञानेश्वरीद्वारां ज्ञानेश्वर महाराजांविषयीं माहिती चटकन् मिळविणें कठीण काम आहे. कारण ज्ञानदेव हे 'माझें असतेपण लोपो, नामरूप हारपो,' अशा अदानित्व वृत्तीचे असल्यामुळें त्यांनीं आपल्या लौकिक चरित्रा विषयीं जवळजवळ मौनच पाळलें आहे. तुकाराम महाराज अथवा एकनाथ महाराज यांच्या ग्रंथाची गोष्ट या दृष्टीनें निराळी आहे. तुकाराम महाराजांनीं आपल्या ग्रंथांत आपलें लौकिक चरित्र, साधनमार्ग, त्यांना आलेले पारमार्थिक उच्च अनुभव लिहून ठेवले आहेत. नाथांच्या ग्रंथांत संसारांतील गृहस्थाश्रमाचें तपशीलवार वर्णन आलेलें आहे. तसें ज्ञानदेवाच्या ग्रंथांत आपणांस आढळत नाहीं. फार तर 'वधूवराचिये मिळणी। जैसी वऱ्हाडियांहि लुगडीं लेणीं।' असा दृष्टांत सांपडतो. 'जन्मनेनि प्रसंगे। स्त्री देह शिवणें अंगे। तेथेनी जन्म अवघे। सोवळी कीजे।' असे ज्ञानदेव होते. ते संसाराला शिवलेच नाहींत, ते संसाराचें यापेक्षां जास्त काय वर्णन करतील ?

ज्ञानेश्वरींत ज्ञानदेवांचे आई, वडील अथवा कूळ याविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. त्यांचे गुरु श्रीनिवृत्तिनाथ यांचें जें वर्णन आलें आहे, तेंहि लौकिक स्थितीचें नसून, त्यांच्या उच्च अध्यात्मिक स्थितीचें आहे. नाहीं म्हणावयास १८ व्या अध्यायांत निवृत्तिनाथांचा महिमा वर्णन करतांना ज्ञानदेवांनीं दोन ओव्या स्वतःबद्दल लिहिल्या आहेत. परंतु त्या ओव्या स्वतःचें वर्णन करण्याकरितां नसून, ज्या गुरुकृपेमुळें ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्माण झाला, ती गुरूकृपा आपणांस कशी प्राप्त झाली हें सांगण्याकरितां लिहिलेल्या आहेत. या ओव्या अशा आहेत.

माझिया सत्यवादाचें तप।
वाचा केलें बहुत कल्प।
म्हणोनि फळाशि हे महाद्विप।
पातली प्रभो।
पुण्यें पोशिलीं असाधारणें।
तियें तुझे गुण वानणे।
देउनि मज उत्तीर्णे। झाली अजी॥

ज्ञानदेव म्हणतात, माझ्या वाणीनें मागील असंख्य जन्मांत केवळ सत्य बोलण्याचेंच तप केलें, त्याचें फल म्हणून माझ्या वाणींतून ही गीतेवरील टीका बाहेर पडत आहे. ' माझा मऱ्हाठाचि बोलु कौतुकें । अमृतातेंही पैजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ।' किंवा ' मऱ्हाठेचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी । घेणें देणें सुखचि वरी । हो देईं ज्या जगा ।' अशा योग्यतेचा ज्ञानेश्वरी हा परिपूर्ण ग्रंथ आहे. याचें कारण तो ज्या वाणींतून निघाला, ती वाणी सत्यवादित्वाच्या तपश्चर्येनें पुनीत झालेली आहे.

ज्ञानेश्वरींत ज्ञानदेवांच्या विद्यावंशाची-नाथ परंपरेची माहिती मिळते. ' महेशान्वय संभूतें । श्री निवृत्तिनाथ सुतें । केलें ज्ञानदेवें गीतें । दोहीकार लोपे ।या ओवींत हा विद्यावंश स्पष्टपणें दिसून येतो. परंतु या ओवीवरून एका संशोधकानें निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवाच्या वडिलांचें नांव व महेस ( रेडे ) हे त्यांचें आडनांव होतें असा अजब शोध लावला आहे! या संशोधकानें ज्ञानेश्वरी ग्रंथ एकदां जरी समग्र वाचला असता तरी त्यास कळून आलें असतें कीं, महेश म्हणजे श्री शंकर असून त्या अर्थानें अनेक ठिकाणीं ज्ञानेश्वरींत महेश शब्द आला आहे.

' क्षीर सिंधु परिसरी । शक्तिच्या कर्ण कुहरीं । नेणो कै त्रिपुरारी । सांगितलें जें ।' यांत पुन्हां शंकराचा स्पष्ट उल्लेख आहे. शंकर, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ व निवृत्तिनाथ अशी नाथ-परंपरा ज्ञानदेवांनीं दिलेली आहे. शिष्य हा गुरुपुत्र असतो म्हणून 'निवृत्तिनाथसुतें' असें ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे. ज्ञानेश्वरीवरून आपणांस निश्चित दिसून येतें कीं, ज्ञानदेवांनीं आपली टीका पूर्णावस्थेंत लिहिली आहे. हें सांगावयाचें कारण म्हणजे कांहीं लेखकांनीं असें म्हटलें आहे कीं, ज्ञानेश्वरी हा स्वतंत्र प्रज्ञेचा ग्रंथ नसून तो अपूर्णावस्थेचा आहे. यानंतर लिहिलेला ' अमृतानुभव ' हा परिपक्व स्थितींतला ग्रंथ आहे. लेखकांचें अमृतानुभवावरील प्रेम यांत दिसून येत असलें तरी आपण ज्ञानदेवांचेवर काय अन्याय करीत आहों, याची त्यांस कल्पना दिसत नाहीं. कारण ज्ञानेश्वरीच्या सुरवातीसच ' कां चिंतामणि झालिया हातीं । सदा विजय वृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ति । ज्ञानदेवो म्हणे ।' अथवा, ' तुझिया प्रणति । मी पूर्ण झालों श्रीनिवृत्ति ।' असें ज्ञानदेव स्वतःच सांगतात. सहाव्या अध्यायांत ' दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बालपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥' ' तीथे सिद्ध प्रज्ञेचेनि लाभे । मनाचि सारस्वतें दुभे । मग सकळ शास्त्र स्वयंभे । निघतीं मुखें ॥' या योगी पुरुषांचे वर्णनांत त्यांचा स्वानुभवच दिसून येतो.

ज्ञानदेवाच्या ठिकाणीं उत्कृष्ट कर्म, उत्कृष्ट ज्ञान, उत्कृष्ट योग व उत्कृष्ट भक्ति यांचा सुंदर संगम आढळतो. सोन्याच्या कलशांत गंगेचें उदक असावें, त्याप्रमाणें बाह्य शुद्ध कर्माचरण व आंत विमल आत्मज्ञान असा त्यांचा आदर्श पुरुष आहे. ऐहिक धडा पक्का करून नंतरच परत्राच्या गोष्टी बोलाव्यात. घरच्या माणसांशीं ज्याला नीट वागतां येत नाहीं, त्यांनीं बाहेर लोकोद्धाराच्या गोष्टी सांगण्याचा मूर्खपणा करूं नये असें त्यांचें मत आहे.

सारांश, अज्ञ समाजासाठीं तळमळणारे, ज्ञानी व योगी, पूर्ण–काम, सगुण रूपाची आवड असणारे, श्रेष्ठ गुरुभक्त व अंगीं थोरपणा व व्युत्पत्ति असूनहि ती विसरणारे, दुसऱ्याचा उपहास न करतां त्याला सन्मार्गाला लावणारे, जगाचें कल्याण साधणारे, एक ना अनेक ज्ञानदेवांच्या गुणांचें ज्ञानेश्वरींत दर्शन घडतें. त्यांच्याबद्दल यथार्थ तें बोलणें अशक्य आहे. 'नेणों युक्तिचिया खोली' म्हणून जेथें तुकोबाराय स्वस्थ बसले, तेथें माझ्यासारख्या पामराचा काय पाड? माझ्यासारख्यानें त्यांचे चरणीं मस्तक ठेवून निवांत रहावें, हेंच उचित होय.

[ आकाशवाणीच्या सौजन्यानें ]

---

# करुणा हें भक्तीचें रूप

भक्ति जेव्हां करुणेच्या रूपांत प्रकट होईल तेव्हांच ती वास्तविक भक्ति होईल. मी असे कांहीं मूर्तिपूजक पाहिलेले आहेत कीं, जे कठोर हृदयाचे आहेत. रोज पूजा–अर्चा करतात; परंतु जीवनांत तेवढेच कंजूष आणि निर्दय असतात. शास्त्रांत असे लिहिलें आहे कीं, आपण जसें ध्यान करतों तसेंच रूप आपणांस मिळतें. कधीं कधीं तर मला असें वाटतें कीं, दगडाच्या मूर्तीचें ध्यान करणारे दगडाचें ध्यान करतां करतांच दगडाप्रमाणेंच कठोर बनत असतात. आणि याचा परिणाम म्हणून लोक नास्तिक बनतात. जे दगडाची पूजा करतात आणि स्वतःच दगड बनतात. त्यांनाच मी दोष देतों. मूर्तीची पूजा करणें चुकीचें आहे असें मी म्हणत नाहीं, तोहि ईश्वरभक्तीचाच एक प्रकार आहे; परंतु खऱ्या उपासनेचें स्वरूप हेंच आहे कीं, हृदयांत करुणा भरलेली असणें आणि सर्व ईश्वरस्वरूप आहे याची जाणीव होणें. परमेश्वर म्हणजे प्रेम. जो मंदिरांत जाईल तोच भक्त म्हणून ओळखला जाईल असें कांहीं नाहीं. उलट या मंदिरांत जी भक्ति होते तिला मी प्रयोगशाळेंतील प्रयोगाप्रमाणें एक प्रयोग म्हणून समजतों. हा प्रयोग जर तेथें सफल झाला तर तो सर्व समाजाला लागू केला पाहिजे. मला जर कोणी म्हटलें कीं, समाधि, भक्ति आणि अहिंसा या गोष्टी सर्वांसाठीं नाहींत, त्या एखाद्या मनुष्यासाठीं असूं शकतात, तर मी म्हणेन कीं या गोष्टी मग आमच्या कामाच्याच नाहींत! हवा, पाणी आणि सूर्याचा प्रकाश जर सर्वांच्यासाठीं आहे तर समाधि, अहिंसा आणि भक्ति या गोष्टी समाजासाठीं कां नाहींत? समाजाला त्यांची आवश्यकता आहेच आणि या गोष्टी प्रत्येकासाठीं आहेत, म्हणूनच त्यांची एवढी किंमत आहे.

—विनोबा

# भक्तावतंस नाना

ना. वा. गुणाजी

## नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर
## ( १८६०–१९२१ )

**" जयां परमार्थी खरी गोडी। तयाची साईस मोठी आवडी ॥**
**वारूनि सर्व तयांचीं सांकडीं। स्वानंद जोडी दे तयां ॥ "**

—श्रीसाईसच्चरित ४१–७४

**" नाना परम भाग्यशाली। साईची अनन्य सेवा फळली ॥**

—श्रीसाईसच्चरित. ७–११२

मागील प्रकरणांत श्रीसाईबाबांचे विरागी भगद्रत्न म्हाळसापति यांची कथा सांगितली. आतां 'भक्तावतंस नाना' यांची गोड आणि स्फूर्तिदायक कथा ऐका.

**नानांची कामगिरी**—नानासाहेब चांदोरकर हे इ. स १८९२ सालापासून श्रीसाईबाबांकडे जाऊं लागले आणि श्रीबाबांच्या समाधीपर्यंत ( १९१८ सालपर्यंत ) त्यांचें शिरडीस येणें जाणें होतें आणि श्रीबाबांशीं त्यांचा संबंध अति जिव्हाळ्याचा होता. ह्या सर्व अवधींत म्हणजे सुमारें २५।२६ वर्षें बाबांचें निरुपमेय प्रेम नानासाहेबांवर होतें आणि नानासाहेबांची अनन्य श्रद्धा बाबांवर होती आणि त्यांनीं बाबांची निष्काम सेवा अति उत्तम तऱ्हेनें केली. विशेषत: दोन गोष्टीमुळें नानासाहेब बाबांच्या भक्तांना चिरस्मरणीय राहतील यांत शंका नाहीं. पहिली गोष्ट ही कीं, बाबांचें वसतिस्थान म्हणजे एक पडकी मोडकी तुडकी मशीद होती. तिचा त्यांनीं जीर्णोद्धार केला, म्हणजे ती मोडून फिरून बांधली व मोठी केली. या जीर्णोद्धाराचें काम त्यांनीं नानासाहेब निमोणकरांच्या देखरेखी· खालीं, कोंडाजी गबाजी आणि तुकाराम या तिघां सुतार बंधूकडून करवून घेतलें. त्यांची दुसरी कामगिरी म्हणजे त्यांनीं बाबांच्या कीर्तीचा प्रसार स्वत: आणि श्रीदासगणू महाराज यांचेद्वारा करून मुंबईच्या आजुबाजूच्या लोकांना बाबांच्या सहवासाचा आणि आशीर्वादाचा लाभ करून दिला.

**मशीद उर्फ द्वारकामाई**—बाबा प्रथम शिरडीस आले तेव्हांपासून या मशीदींत राहूं लागले. ही मशीद म्हणजे

एक लहानसा ओटा अथवा व्हरांडा व त्यापलीकडे एक लहान खोली आहे. बाबा येथें बसत असत आणि त्यांचे समोर एक धुनी अहोरात्र पेटत ठेविलेली असे आणि हल्लींहि ती तशीच पेटत ठेविलेली असते. या खोलीचे मध्यभागीं कोपरा किंवा कमान (निंबर) असून तेथें बाबांच्या वेळीं फुलांच्या माळा लाविलेल्या असत आणि बाबा तेथें बसून दुपारच्या आरतीनंतर नैवेद्याचा काला करून सर्वांना वांटीत असत आणि धुनींतील रक्षा-उदी सर्व भक्तांना मशीदीच्या दारांत उभे राहून लावीत असत, आणि त्यांना निरोप देत असत. बाबा या मशिदीला नेहमीं द्वारकामाई म्हणत असत.

" हीच आपुली द्वारकामाता ।
मशीदीचे या अंकीं बैसतां ॥
लेंकुरा देई ती निर्भयता ।
चिंतेची वार्ता नुरेची ॥
एकदां हिचे अंकीं जो बैसला ।
बेडा तयाचा पार पडला ॥
सावलींत हिचे जो पहुडला ।
तो आरूढला सुखासनीं ॥

—श्रीसाईसच्चरित. २२-४८ व ५०

**श्रीबाबांचा यशोदुंदुभि**—नानासाहेबांनीं बाबांच्या कीर्तीचा जो प्रसार केला त्याविषयीं थोडेसें वर्णन करणें योग्य होईल. इष्टमित्रांच्या भेटी झाल्या म्हणजे प्रसंगानुसार योग्य संधि साधून नानासाहेब बाबांचे गुणानुवादन करीत असत आणि श्रोत्यांचे ठायीं बाबांचें दर्शन घ्यावें अशी उत्कट इच्छा उत्पन्न करीत असत; अशापैकीं कांहीं निवडक वेंचीव उदाहरणें येथें देत आहें.

**१ श्रीसाई लॉज**—नानासाहेबांच्या प्रेरणेनें गुरुवार ता. २८ एप्रिल १९१० रोजीं ज्या मुंबईच्या नवभक्तांना बाबांचें दर्शन झालें त्यांनीं मुंबईत जुन्या हनुमानगल्लींत रा. ब. मोरेश्वर वि. प्रधान यांच्या घरीं श्रीसाई लॅाज स्थापन केला त्याची हकीगत श्रीसाईलीलां वर्ष १३, अंक ४,५,६ पान १३–१४ येथें दिलेली आहे. त्यांत या नवभक्तांचीं नांवें असून नानासाहेबांनीं त्यांना साईदर्शनाबाबत दिलेली एक सूचना आहे, ती अशीः—पहिल्यानें साठे—नवलकर वाड्यांतील श्रीनिंबाचे वृक्षाखालील बाबांच्या गुरूच्या समाधीचें दर्शन घेऊन त्यास प्रदक्षिणा घालून नंतर श्री बाबांच्या दर्शनास जावें, हल्लींहि दर्शनास जाणाऱ्या मंडळींनीं, प्रथम निंब वृक्षाखालील समाधीचें दर्शन घेऊन नंतर मशीदींत बाबांच्या छबीचें (म्हणजे प्रत्यक्ष बाबांचें) दर्शन आणि त्यानंतर वाड्यांतील समाधीचें दर्शन घेण्याची प्रथा ठेविल्यास योग्य होईल.

**(२) श्री काकासाहेब दीक्षित**—कै. हरि सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित हे नानासाहेबांचे कॉलेजमधील सहाध्यायी व जुने स्नेही होते. नानांची व त्यांची भेट इ. स. १९०८।०९ चे सुमारास लोणावळ्यास झाली. तेव्हां आपण विलायतेंत असतांना आपला पाय दुखावला, पुष्कळ इलाज करून पाहिले तरी तो बरा होत नाहीं इ. हकीकत काकांनीं नानांना सांगितली तेव्हां —

" तो पायाचा लंगडेपणा ।
निःशेष जावा येतें का मना ? ॥
चला माझे गुरूचे दर्शना ।
ऐसें तंव नाना वदले तयां ॥ "

श्रीसाईसच्चरित. ५१–२६

त्यानंतर काकांनीं शिरडी कोठें आहे वगैरे माहिती घेऊन दर्शनास जाण्याचें कबूल केलें आणि पुढें दर्शनहि घेतलें. याविषयीं काकांची विस्तृत चरित्रासह हकीगत पुढें योग्य प्रसंगीं देण्यांत येईल.

(३) **बाबांचें बाळ** (श्री. बा. वि. देव सेवानिवृत्त मामलेदार–ठाणें) नानासाहेबांची व यांची १९१० सालीं गांठ पडली. यांना नानासाहेबांनीं प्रत्यक्ष अनुभवाच्या अति गोड, सुरस व बोधप्रद अशा बाबांच्या कथा व लीला सांगितल्या. त्यानंतर श्री. देव शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेऊन कृतार्थ झाले इत्यादि सविस्तर हकीगत त्यांनीं साईलीला वर्ष ३, अंक ६ यांत दिलेली आहे. आणि नानासाहेबांनीं त्यांना सांगितलेले अनुभव अनेक अंकांत प्रसिद्ध केलेले आहेत. वर्ष १६ अंक १,२,३ यांत त्यांनीं नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र दिलेलें आहे. या सर्व अंकांचा हा लेख लिहिण्याचें कामीं बराच उपयोग झाला आहे आणि त्याबद्दल मी श्री. देव मामलेदार यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

(४) श्री. तात्यासाहेब नूलकर—हे १९०९ सालीं पंढरपुरास मुनसफ होते. आणि नाना तेथेंच मामलेदार होते. दोघांच्या वरचेवर गांठी पडत असत आणि संभाषण होत असे. तात्यासाहेबांचा संतावर विश्वास नसे, तर नानासाहेब पक्के संतप्रेमी. नानासाहेब त्यांना नेहमीं बाबाच्या गोष्टी–लीला सांगत व शिरडीस केव्हां निघतां असें टुमणें त्यांच्यामागें लावीत असत. शेवटीं तात्यासाहेब शिरडीस जाण्यास कबूल झाले, पण तें दोन अटींवर. (१) त्यांना ब्राह्मण स्वयंपाकी हवा होता आणि (२) उत्तम नागपुरी संत्रीं बरोबर न्यावयास हवीं होती. या दोन्ही अटी अकल्पित रीतीनें पूर्ण झाल्या. एक ब्राह्मण नोकरीसाठीं नानासाहेबाकडे आला, तो त्यांनीं तात्यासाहेबांकडे पाठविला. तसेंच पंढरपुरांत उत्तम संत्रीं मिळत नव्हतीं. पण दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यांचें एक मोठें पार्सल आलेलें मिळालें. तें उघडून पहातात तों, त्यांत उत्तम शंभर संत्रीं! अशा रीतीनें अटी पुऱ्या झाल्यावर ते नानासाहेबांबरोबर शिरडीस गेले. आणि बाबाचें दर्शन घेते झाले. बाबा प्रथम त्यांचेवर रागावले, पण लगेच त्यांनीं त्यांचेवर कृपा करून त्यांना असे उत्तम


## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

अनुभव प्राप्त करून दिले कीं, बाबा हे देवाधिदेव आहेत अशी त्यांची खात्री झाली. शेवटीं ते तेथेंच रमले व त्यांनीं आपला देह शिरर्डीसच ठेविला. अंतकाळीं त्यांना बाबांचें चरणतीर्थ मध्यरात्रींस मिळून त्यांना उत्तम गति प्राप्त झाली. त्यांच्या निधनाची वार्ता कळतांच बाबा तेथें गेले आणि म्हणाले कीं—' अरे, तात्यांनीं आघाडी मारली. त्यानें आपल्या जन्माचें सार्थक केलें.'

**५ हेमाडपंत** (श्री. अण्णासाहेब दाभोळकर) नानासाहेबांनीं यांना शिरडीस बाबांच्या दर्शनांस जाण्यास कसें प्रवृत्त केलें या विषयीं श्रीसाईलीला मासिक आणि श्रीसाईसच्चरित्तांत वर्णन आलेलें आहे याविषयीं श्रीसाईलीला, वर्ष १३, अंक ४, ५, ६ यांत पान १६ वर 'नाना' या शब्दावर श्री सुमनसुंदर यांनीं मार्मिक व सुंदर विवेचन केलें आहे. तें असें:— नाना हा नाहीं नाहीं म्हणजे 'नेति नेति' याचा अपभ्रंशहि होऊं शकेल व **विवेक** हेंच कार्य करतो; सत् असत् यांतील भेद विशद करून विवेक 'सत' चें अद्वैत पटवितो. 'भासतें तसें नसतें' हें त्याचें संकलित कार्य होय. मायेचा फोलपणा दाखवून तो परमात्म्याची खरी जाणीव करून देतो. नानाची भूमिका अशीच आहे.

'केव्हां निघणार साई दर्शना ।
किमर्थ आळस शिरडी–गमना ॥
दीर्घसूत्रता कां प्रस्थाना ।
निश्चिंती मना कां नाहीं ?' ॥

—श्री साईसच्चरित २'११९

हें (नानाचें वचन) त्याचेंच द्योतक आहे. विवेक मनाला अशीच टोंचणी देऊन मोक्षाकडे खेंचतोः—साई परमात्म्याच्या दर्शनास केव्हां निघणार ? शिरडी परब्रह्म गमनास–आत्मज्ञानरूप मोक्ष मिळवण्यास आळस व मनाची चलबिचलता हीं उपयोगी नाहींत. आळस, मनाचें चांचल्य हे मायेचे विकार आहेत, ज्याला आत्मज्ञान हवें असेल, त्यानें त्यांचा त्याग केला पाहिजे. विकारी वृत्ति सोडून विचारी बनलें पाहिजे, असा त्याचा भावार्थ आहे. आणि हेमाडपंताच्या मिषानें आपणा सर्वांस विवेकानें (नानानें) जागें केलें आहे व आत्मोन्मुख बनविलें आहे.

**(६) श्री दासगणू महाराज** (श्री. गणपतराव सहस्रबुद्धे) हे नानाच्या वेळीं नगर येथें पोलीस खात्यांत कारकून होते. त्यांना कविता विशेषतः लावण्या करण्याचा फार नाद होता. नानासाहेबानीं त्यांचें मन वळवून कीर्तनें करून बाबाची प्रसिद्धि करण्याकडे प्रवृत्त केलें. त्यांचे घरी दामुआण्णा आठवले म्हणून एक गोड आवाजाचा मुलगा होता. त्याला त्यांनीं कीर्तनांत साथीदार म्हणून श्री दासगणूकडे दिलें. या जोडीमुळें कीर्तनास रंग चढून बाबांची प्रसिद्धी मुंबईच्या आजुबाजूस बरीच झाली. आणि तेथून बाबांच्या दर्शनास लोक भराभर जाऊं लागले आणि लवकरच शिरडी हें क्षेत्र बनलें. याचें श्रेय नानासाहेबांस आहे.

**आधुनिक नानासाहेब** (श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर). अलीकडे गेल्या १८।२० वर्षांत नानासाहेबांची ही कामगिरी मद्रासचे श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी अय्यर यांनीं मोठ्या उत्साहानें चालविली. त्यांनीं अनेक साईभक्तांच्या भेटी घेतल्या आणि त्यांचे अनुभव लिहून

घेऊन प्रसिद्ध केले. श्री बाबाविषयीं बरेच ग्रंथ प्रसिद्ध केले आणि 'साई सुधा' नांवाचें मासिक १७।१८ वर्षे चालविलें, आणि तें अद्याप चालू आहे. त्यांनीं हिंदुस्थानदेशभर दौरे काढून बाबांविषयीं व्याख्यानें दिलीं आणि ठिकठिकाणीं संम्मेलनें (परिषदा) भरविलीं; अशा रितीनें बाबांची निरपेक्षपणें सेवा करून ते बाबाच्या चरणकमलीं कांहीं महिन्यापूर्वी विलीन झाले. श्री बाबांचा यशोदुंदुभि हिंदुस्थानभर पसरलेला आहेच आणि तो आतां हिंदुस्तानबाहेरहि अखिल जगतांत पसरण्याकरितां आणखी कोणी नूतन नानासाहेब बाबा उत्पन्न करतील अशी आशा आहे.

आतां नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र देऊन त्यांत आलेले कांहीं अनुभव देतों

**चरित्र**—नानासाहेबांचा जन्म ठाणें येथें १८६० सालीं झाला. त्यांचे वडिलाचें नांव गोविंदपंत नाना उर्फ नानासाहेब. ते डेप्युटी कलेक्टर व कलेक्टरचे पर्सनल आसिस्टंट होते. त्यांना दप्तरदार ही पदवी मिळाली होती. कल्याणास त्यांचे वाड्यास दप्तरदारांचा वाडा असें म्हणतात. ते सुशील व सदाचारी होते आणि त्यांचा दानधर्म बराच असे. त्यांना ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी तालुक्यांतील कवाड क्षेत्रनिवासी श्री सखाराममहाराज यांचा अनुग्रह मिळाला होता. हे सखाराममहाराज आणि श्री बाबा गुरुबंधु होते. असें सांगतात. नानांचें मराठी शिक्षण कल्याण येथें आणि पुढील इंग्रजी शिक्षण मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कुलांत व एलफिन्स्टन कॉलेजांत झालें. ते १८८३ सालीं बी. ए. झाले. संस्कृत हा त्यांचा ऐच्छिक व आवडीचा विषय होता आणि तो त्यांनीं आमरणांत कायम ठेविला. त्यांचा विवाह १८७८ सालीं कल्याण येथें पनवेल तालुक्यांतील पळस्पे गांवच्या विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे या श्रीमान गृहस्थाच्या कन्येशीं झाला. त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई यांचेपासून त्यांना दोन पुत्र व दोन कन्या झाल्या. थोरले चिरंजीव वासुदेव उर्फ बाबुराव हे ग्रॅजुएट असोन विलेंपारलें येथील खासगी हायस्कुलांत गणित शिक्षक होते. धाकटे चिरंजीव महादेव उर्फ बापुराव हे शेतकी शिक्षण घेऊन घरींच शेतीभाती करीत असत. वासुदेवरावांचा विवाह ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध जहागिरदार श्री. रामराव कृष्ण जठार यांची कन्या इंदिराबाई यांचेशीं झालेला आहे; आहे आणि बापुरावांचा विवाह धारवाडचे वकील श्री. त्रिविक्रम काशिनाथ पित्रे यांच्या गिरिजाबाई नामक कन्येशीं झालेला आहे. वडील कन्या मैनाताई यांना पुण्यास कुवळेकर यांचे घरीं, आणि कनिष्ठ कन्या द्वारकाबाई यांना सातारचे पेंढरकर यांचे घरीं दिली होती.

नानासाहेब बी. ए. झाल्यावर त्यांची प्रथम नेमणूक संगमनेर येथें मामलेदार कचेरींत कारकुनाचे जागीं झाली. नंतर त्यांना नगर जिल्ह्यांत कोपरगांव येथें अव्वल कारकुनाची जागा मिळाली. १८९२ सालीं ते नगर येथें कलेक्टर साहेबांचे चिटणीस झाले (ह्याच वेळीं त्यांना बाबांचें दर्शन झालें.) १८९३ सालीं पुणें जिल्ह्यांत घोडनदी तालुक्याचे मामलेदाराची जागा त्यांना मिळाली. पुढें १८९४ ते १९०१ पर्यंत ते पुनः

नगर जिल्ह्याच्या कलेक्टरचे चिटणीस होते. सन १९०२ सालापासून ते खानदेशांत जामनेर तालुक्याचे मामलतदार होते. (त्यावेळीं त्यांना बाबानीं आपली अलौकिक शक्ति दाखवून त्यांच्या मुलीची सौ. मैनाताईची प्रसूति-सुटका केली.) नंतर त्यांची बदली नंदुरबार, पंढरपूर वगैरे ठिकाणीं मामलतदार म्हणून झाली. सन १९०८ सालीं तें पुणें येथें डि. डे. कलेक्टर झाले. १९०९ सालीं याच जागेवर त्यांची बदली ठाण्यास झाली. इ. स. १९१५ सालीं ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे १९२१ सालीं त्यांनीं आपला नश्वर देह श्री बाबांचे चरणीं ठेविला.

**बाबांचें प्रथम दर्शन** (श्री साईलीला वर्ष ३ अंक ३) नानासाहेब नगर जिल्ह्यांत कलेक्टरचे चिटणीस असतांना शिरडीचे आप्पा कुलकर्णी नगरास जमाबंदीच्या कामाकरितां बाबांची आज्ञा घेऊन निघाले. कलेक्टरचे चिटणीस कोण आहेत याची चौकशी करून, बाबांनीं तुला बोलाविलें आहे असा निरोप आप्पा कुलकर्ण्यामार्फत त्यांनीं नानास पाठविला. आपण येत नाहीं असा नानानीं जबाब दिला. पुनः बाबानीं तोच निरोप अप्पा कुलकर्ण्यामार्फत पाठविला. पुनः नानाचा नकार आला. असें दोनतीन वेळां झाल्यावर अखेर नानांनीं भेटीस येण्याचें कबूल केले. पण त्यांचे मनांत शंका-कुशकांचें काहूर ऊठलें. आपण एखाद्या फकिराच्या भेटीस जाणार कीं खऱ्या संताच्या भेटीस जाणार याचा त्यांचे मनांत निश्चय होईना. शेवटीं आपल्या पत्नीकडून गाठोड्यांत बांधून ठेविलेला एक जुना अल्पाकचा कोट मागून घेऊन तो घालून ते बाबांच्या दर्शनास गेले. रिक्तहस्तें साधुसंताच्या दर्शनास जाऊं नये, तशांत शिरडी हे खेडेगांव असल्यामुळें तेथें कांहींच मिळणार नाहीं अशा विवंचनेंत ते असतां त्यांचा हात सहज त्या कोटाच्या खिशांत गेला. त्यांत त्याना एक लहानशी पुडी मिळाली. ती उघडून पहातां त्यांत २।४ बदाम व २।४ खडीसाखरेचे तुकडे मिळाले. याचें नानासाहेबांस सकौतुक आश्चर्य वाटलें. आपण रिक्तहस्तें बाबाकडे जात नाहीं, बाबा हे साधु असावेत असें त्यांना वाटून ते बाबांकडे गेले आणि त्यांना साष्टांग प्रणिपात करून समोर बसले आणि आपणास कां बोलाविलें असें विचारलें. अरे, जगांत काय थोडीं माणसें आहेत, त्यांना न बोलावितां तुलाच कां बोलावतों याचें कांहीं तरी कारण असेलच कीं नाहीं असें बाबांनीं उत्तर दिलें. त्यावर नाना म्हणाले-तें कारण सांगा. बाबा म्हणाले—तुझा व माझा चार जन्मांचा संबंध आहे, तुला तो माहीत नाहीं, मला माहीत आहे म्हणूनच तुला मी बोलावितों. सवडीप्रमाणें पुनः येथें येत जा. त्यावर नाना म्हणाले-बरें आहे, येत जाईन.

**प्लेगची लस टोंचून घेणें**— (श्रीसाईलीला वर्ष ३, अंक ३) इतकें झालें तरी नानासाहेबांचा बाबांवर विश्वास बसेना. पुढें कांहीं दिवसांनीं नगरच्या आजूबाजूस प्लेगची सांथ सुरू झाली. त्यावेळीं कलेक्टरसाहेबांनीं नानासाहेबाला सांगितलें कीं, तुम्हीं प्रथम प्लेगची लस टोंचून घेऊन उदाहरण घालून द्या, म्हणजे इतर सर्व लोक तुमचें अनुकरण

करतील. नानासाहेब फार पेचांत पडले. त्यावेळीं लसीचा तोडगा प्रयोगावस्थेंत आणि धोक्याचा होता अशी सर्वांची समजूत. तेव्हां आतां काय करावें हें त्यांना सुचेना. विचार करितां करितां त्यांना एक युक्ति सुचली. याविषयीं बाबांना विचारून त्यांचें मत घ्यावें आणि ते सांगतील तसें करावें. विचार करणेसाठीं म्हणून त्यांनीं कलेक्टरसाहेबाकडून एक आठवड्याची मुदत मागून घेतली आणि त्या मुदतींत एक दिवस शिरडीस येऊन सर्व हकीकत बाबांना निवेदन केली आणि विचारलें कीं, प्लेगची लस टोंचून घ्यावी कीं घेऊं नये. बाबा म्हणाले—अः, त्यांत काय आहे, टोंचून घे, भिऊं नको, त्यापासून कांहीं वाईट होणार नाहीं. त्यानंतर नानासाहेब परत नगरास आले आणि टोंचून घेण्याचें आपण ठरविले आहे असें कलेक्टरसाहेबांना सांगून त्यांनीं टोंचून घेतलें. पुढें त्यांचें आफिसांतील सर्व मंडळींनीहि टोंचून घेतलें. टोंचून घेतलें त्यापैकीं कोणावरहि वाईट परिणाम झाला नाहीं. त्यामुळें नानासाहेबांची बाबांवरील श्रद्धा जडत चालली आणि बाबांत कांहीं विशेष तेज आहे, आणि त्यांचेकडे आपण वरचेवर जावें असें त्यांना वाटूं लागलें.

**हरिश्चंद्र डोंगर ट्रीप** (श्री साईलीला वर्ष ३, अंक ३) नानासाहेब नगर जिल्ह्यांत चिटणीस असतांना एकदां हरिश्चंद्र डोंगरावर जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला. त्यांचे आफिसांतील मंडळीस हा बेत कळवितांच, बाबा खरवंडीकर नामक आफिसांतील माहितगार विनयशील, स्पष्टवक्ते कारकुनानें स्पष्ट सांगितलें कीं, उन्हाचे दिवस, वाट उंच व अवघड, वाटेंत पाण्याचा थेंबहि मिळणार नाहीं, करितां तूर्त हा बेत रहित करावा. नानासाहेबांना हें म्हणणें पटलें नाहीं. तेव्हां सर्वांनीं डोंगरावर जाण्याची तयारी केली आणि पर्वत चढण्यास: आरंभ केला. अर्धा रस्ता चढल्यावर नानासाहेब थकले आणि तहानेनें व्याकुळ झाले आणि बाबा खरवंडीकराना म्हणाले की, कसेंहि करा, मला पाणी पिण्यास द्या, त्याशिवाय मला पुढें पाऊल टाकवत नाहीं. खरवंडीकर म्हणाले कीं मी आपणास पूर्वींच बजाविलें होतें, आतां आपण अर्धी वाट आलों, येथें पाण्याचा माग मूस नाहीं आणि कोणी वाटाड्याहि दिसत नाहीं तेव्हां पाणी मिळावें कसें ? यानें नानासाहेबांचें कांहीं समाधान झालें नाहीं. पुढें मार्ग आक्रमण करण्यास किंवा मागें परतण्यासहि ते तयार होईनात. या स्थितींत त्यांनीं बाबांचें स्मरण केलें आणि त्यांचा धांवा केला. इतक्यांत त्या वाटेनें एक भिल्ल डोक्यावर लांकडाची मोळी घेऊन जातांना त्यांचे दृष्टीस पडला. नानासाहेबानीं सहज त्याला, येथें जवळपास पिण्यास पाणी मिळेल काय असें विचारलें. तुम्हीं बसलां त्या दगडाखालींच पाणी आहे असें सांगून तो भिल्ल आपल्या वाटेनें निघून गेला. नंतर मंडळीनीं दगड वर उचलून पाहिलें तों काय चमत्कार सांगावा! त्यांची तहान भागण्यापुरतें स्वच्छ मधुर पाणी त्यांना मिळालें. नानासाहेब तें पाणी प्याले आणि शांत झाले. सर्व मंडळीना हा मोठा चमत्कार वाटला. भिल्लाचा तपास करतां तो कोठें दिसेना; तेव्हां नाना म्हणाले पहा, माझे बाबा कसे आहेत. त्यांनीं मला येथेंच बसल्या जागीं

पाणी दिलें कीं नाहीं? बाबांवरील नानासाहेबांची निष्ठा पाहून, बाबा जरी शिरडींत असले तरी, ते सर्वव्यापी, भक्तवत्सल असून भक्तांचीं संकटें दूर करितात अशी सर्व मंडळीची खात्री झाली. नंतर सर्व मंडळी हरिश्चंद्र पर्वताचे माथ्यावर जाऊन सायंकाळीं परत नगरास आली.

इकडे शिरडीस त्याच वेळीं बाबा मशीदींत बोलूं लागले कीं काय करावें, नानाचा जीव कासावीस झाला, ऊन फार झालें, पाण्याबगर नाना थकला, त्याला पाणी थोडं तरी दिलेंच पाहिजे. तेथें जमलेल्या मंडळीना या भाषणाचा कांहीं उलगडा होईना. पण कांहीं अनुभविक भक्तांनां मात्र वाटलें की, नानावर कांहीं संकट आलें असावें, पुढें कांहीं दिवसांनीं नाना शिरडीस दर्शनास आल्यावेळीं बाबांनीं विचारलें कीं, कां नाना, पाणी मिळालें का? हें ऐकून नाना सद्गदित झाले आणि त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. ते म्हणाले आपल्या सारखी गुरुमाय सुदैवानें लाभली असतां पाणी कां मिळणार नाहीं? हा प्रकार पाहून त्या दिवशीं बाबा नानाविषयीं तसें कां बोलत होते याचें कोडें उलगडलें आणि बाबाच्या लीलेचें सर्वांना आनंद व कौतुक वाटलें.

## पद्मालय ट्रीप व गडवाभर चहा

(श्रीसाईलीला व. ७ ३।४) दुसरी अशीच एक ट्रीप नानासाहेबानीं केली. पूर्व खानदेशांत पाचोऱ्यापासून ८–१० मैलांवर पद्मालय म्हणून एक रम्य स्थान आहे. तेथें एका गोविंदबुवानीं एक सुंदर गणपतीचें मंदिर बांधलें असून त्यावर शंभर तोळे सोन्याचा कळस चढविलेला आहे. नानासाहेब खानदेशांत दुसऱ्या एका तालुक्याचे मामलेदार होते. पद्मालयाला जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला आणि पाचोऱ्याहून पद्मालयापर्यंत वाहनाची व्यवस्था करणेबद्दल पाचोऱ्याच्या मामलेदाराला कळविलें. त्यांनीं त्याप्रमाणें टांग्याची व्यवस्था केली. ठरलेल्या दिवशीं व वेळीं नानासाहेब आपल्या गांवाहून निघाले. त्यावेळीं त्यांची गाडी चुकली. यामुळें पाचोऱ्यास नानासाहेब आणि मंडळी दुपारी पोंचावयाची ती सायंकाळीं पोंचली. तेव्हां समजलें कीं, टांगेवाला मंडळीची वाट पाहून ती न आल्यामुळें परत गेला. तेव्हां पायीं जाण्याखेरीज दुसरें साधनच नसल्यामुळें सर्व मंडळी चालूं लागली. पद्मालयास जाणेचा रस्ता चांगला नसून जंगलांतील आडरस्ता होता. तसेंच इतके ८–१० मैल चालण्याची नानांना संवय नव्हती. तेव्हां ती वाट चालतांना त्यांना फार त्रास झाला. दुसरी एक अडचण अशी उत्पन्न झाली कीं, गोविंदबुवा दिवसभर देवळांत राहून पूजाअर्चा करून येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांची जेवणाखाण्याची सोय करीत असत आणि रात्रौ दहा वाजल्यावर देवालयापासून कांहीं अंतरावर असलेल्या आपल्या मठींत विश्रांतीसाठीं जात असत. दहानंतर थकून भागून ही मंडळी पद्मालयीं पोंचणार आणि तेव्हां त्यांची जेवणाखाण्याची सोय कशी होणार ह्याची त्या मंडळीना मोठी काळजी वाटली. चालतां चालतां नानासाहेब बरेच थकले. थोडा वेळ चालावें आणि मध्येंच विश्रांतीसाठीं उभें राहावें, बसावें असा क्रम चालला. मध्येंच एके ठिकाणीं त्यांनीं बाबांचा धांवा केला कीं, बाबा मला आतां जेवणखाण न मिळालें तरी

चालेल पण एक गडवाभर चहा मिळेल तर काम भागेल. पण चहाची वर्दी गोविंदबुवाला कोण पोंचविणार हें त्यांना मोठे कोडें पडलें. शेवटीं बाबांवर सर्व भार घालून सर्व मंडळी दहा वाजल्यानंतर पद्मालयीं पोंचली. मंदिराशीं येतात न येतात तोंच गोविंदबुवा हातांत चहाची चरवी घेऊन ऊभे. 'नाना आलास काय' असें म्हणून त्यांनीं नानाचें स्वागत केलें. नाना म्हणाले, महाराज, आपण यावेळीं येथें कसे? तेव्हां गोविंदबुवा म्हणाले— "अरे नाना फार लांबून पायीं चालत येत असल्यामुळें तो अतिशय थकला आहे, त्याला फार भूक लागली आहे, त्याचेकरतां एक मोठा तांब्याभर चहा तयार करून ठेव' असा आतांच बाबांकडून बिनतारी संदेश आला आहे. म्हणून मी तुझे करितां चहा घेऊन आलों आहें.' अहाहा, काय हे बाबांचें अंतरसाक्षित्व आणि भक्तांविषयीं कळकळ! सर्व मंडळीनीं हा चहाचा प्रसाद प्रेमादरपूर्वक घेतला. नंतर रात्रीं तेथें विश्रांति घेऊन दुसरे दिवशीं भोजनप्रसाद घेऊन मंडळीं आपल्या गांवीं परतली.

**बोधेगांव ट्रीप—श्री बन्नुमाईचें दर्शन**— (श्रीसाईलीला वर्ष ७, अंक ७–१०) नगर जिल्ह्यांत बोधेगांव म्हणून एक खेडेगांव आहे. तेथें **बन्नुमाई** नांवाची एक यवन जातीची महासाध्वी महाविरक्त, ज्ञानी, मोठ्या अधिकाराची कुमारिका रहात होता. ती बहुतेक गांवाबाहेर, जंगलांत झाडाझुडपांत रहात असे. तिला कोणी शोधावयास अगर भेटावयास गेल्यास ती निवडुंगाच्या झुडपांतून वाऱ्यासारखी धांवत असे. त्यावेळीं तिच्या अंगांत पुष्कळ कांटे बोचत असत तरी तिला त्याची दाद नसे. गांवांत घरीं तिची आई एकटीच असे, तिला भेटण्यासाठीं ती क्वचित् केव्हां तरी येई. ती वेडी आहे असे गांवचे लोक


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,

श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या–चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

समजत असत. अशा या साध्वीचें दर्शन घ्यावें अशी नानासाहेबांना प्रबल लालसा झाली, पण हें दर्शन बहुतेक अशक्य आहे असें त्यांना वाटलें, तरी त्यांची दर्शनेच्छा कमी होईना. बाबांच्या कानावर ही गोष्ट घालावी आणि ते सांगतील तसें करावें असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें सवडीनुसार बाबांची भेट झाल्यावर नानासाहेबांनीं आपली दर्शनेच्छा व त्या मार्गांत येणाऱ्या अडचणी बाबाना सांगितल्या. बाबा म्हणाले—'तुला आतां कोणाचें दर्शन कशास घ्यावयास पाहिजे? येथें सर्व कांहीं नाहीं का?' या उत्तरानें नानासाहेबाची समजूत होईना व ते आपला आग्रह धरूनच बसले. तेव्हां 'दर्शन होईल जा' असे बाबांनीं सांगितलें. तेव्हां तेथून परत आल्यावर बोधे गांवास जाण्याची तयारी करण्यास आपले सल्लागार बाबा खरवंडीकर यास सांगितलें. पाट, रांगोळीचे सामान, लुगडें स्नानाचें सामान, कुंकुम, मंगलसूत्र इत्यादि सामान घेऊन बाबा खरवंडेकरासहित नानासाहेब बोधे गांवास आले आणि तेथील एका देवळांत उतरले तेथें तपास करतां बन्नुमाई गांवांत नसून बाहेर जंगलांत आहे असें समजलें. तिचा शोध घेतघेत नानासाहेब गांवाबाहेर येऊन काटेरी अरण्यांत धांवू लागले. बराच वेळ झाला तरी दर्शन नाहीं. नानासाहेब थकले, थोडेसे निराश झाले, आणि त्यांनीं बाबांचें स्मरण केलें, आणि मनांत म्हणाले कीं, दर्शन व्हावयाचें नव्हतें तर, 'दर्शन होईल जा' असें मला कां सांगितलें? दर्शन झाल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं. असें म्हणून डोळे उघडतात तों, बन्नुमाई नग्नावस्थेंत नानासाहेबांच्या पुढें उभ्या. त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं तिला वंदन करून तिचे अंगांत शिरलेले कांटे काढण्यास सुरुवात केली; तोंच त्या वाऱ्याप्रमाणें गर्द निवडुंगांत पसार झाल्या. तेव्हां नानासाहेब खिन्न झाले, पण निराश झाले नाहींत. त्यांनीं खरवंडेकरास सांगितलें कीं, येथेंच राहुटी ठोका, कनाती लावा, पाणी तापवा, राहुटीचे आंत पाट मांडून भोंवतीं रांगोळया काढा, स्नानाची सर्व तयारी ठेवा. खरवंडेकरांनीं सर्व तयारी यथासांग करणेस सुरुवात केली तों त्यांत एक चोळी कमी आहे असें दिसून आलें. इतक्यांत त्या गांवचा बाजार आटपून एक शिंपी घोड्यावरून परत आपल्या गांवीं जात होता. त्यांचेपाशीं चोळीहि मिळून सर्व तयारी पुरी झाली. तेव्हां नानासाहेबांनीं क्षणभर डोळे मिटून बाबांचें स्मरण केलें आणि त्यांची करुणा भाकली. तेव्हां काय चमत्कार सांगावा! डोळे उघडून पहातात तों, बन्नुभाई राहुटीं मांडलेल्या पाटावर स्नानाकरितां उभ्या. तेव्हां नानासाहेबांना अत्यानंद होऊन त्यांनीं प्रथम तिच्या अंगांतील कांटे काढले, सौगंधिक तेल व उटणें लाविलें आणि तिला अभ्यंग स्नान घातलें. नंतर तिचें अंग स्वच्छ पुसून तिची वेणी घातली. कंठांत सोन्याचें मंगलसूत्र बांधिलें, कुंकुम लावून लुगडें नेसविलें आणि चोळीहि अंगांत घातली. नंतर तिची पूजा करून हातावर नैवेद्य ठेवून तिला वंदन केलें व दक्षिणा दिली. इतकें होतें न होतें तोंच बन्नुमाईनीं सर्व पदार्थांचा त्याग करून "दिशोऽपि वसनं" धारण करून जंगलांत वायुवेगानें प्रयाण केलें. लोेच

ही बातमी गांवांत पसरली. आणि बन्नुमाईची वृद्ध आई तेथें धांवत आली आणि तिनें नानासाहेबांवर बालिश आरोप करून त्यांना शिव्या देण्यास सुरुवात केली. नानासाहेबांनीं शांत मनानें तिची विनवणी केली आणि खरी वस्तुस्थिती सांगितली; तरी तिचें समाधान होईना. शेवटीं तेथें पडलेलें सर्व सामान (लेकीच्या पूजेचें) घेऊन जाण्यास जेव्हां तिला सांगण्यांत आलें तेव्हां तिचा कोप थंड झाला आणि तें सर्व सामान घेऊन ती घरीं परतली. नंतर नानासाहेब देवळांत आपल्या मुक्कामीं परत आले आणि सायंकाळचा फराळ होऊन सर्व मंडळीसहित तेथें निजले व पहांटेस परत जाण्याचे वेळीं फिरून बन्नुमाईचें दर्शन कसें होईल या विचारांत ते अंथरुणावर पहुडले. त्या रात्रीं बन्नुमाई आपल्या मातोश्रीकडे निजावयास आल्या. पहांटे ४।५ वाजतां नानासाहेब जागे होऊन पाहातात तों, बन्नुमाई आपल्या उशापाशीं बसलेल्या त्यांना आढळल्या. हें पाहून त्यांना बाबांच्या लीलेचें परम कौतुक वाटून त्यांना परमाश्चर्य व परमानंद झाला. त्यांनीं त्यावेळीं पुन्हां बन्नूमाईच्या पायांवर डोकें ठेवून वंदन केलें; इतकें होतांच बन्नूमाई लगेच तेथून पसार झाल्या. बन्नूमाईची आईहि तिच्या शोधार्थ आली, तेव्हां झालेला प्रकार तिला समजला. बन्नूमाईची आई म्हणून नानासाहेबांनीं तिचीहि द्रव्यदानानें संभावना केली आणि तीहि शांत व प्रसन्न अंतःकरणानें घरीं गेली, आणि नानासाहेबहि सर्व मंडळीसहित परत नगरास आले.

## 'जामनेरचा अद्भुत चमत्कार

(श्रीसाईसच्चरित्र अ ३३)

## 'तूं घालिसी उडी भक्तांचे संकटीं'

—श्रीकृष्ण भटजी बोदकर महाराज

जामनेरास नानासाहेब मामलेदार असतांना त्यांनीं आपली आसन्नप्रसव मुलगी सौ. मैनाताई प्रसूतीसाठीं आपले घरीं आणली. पूर्ण दिवस भरल्यावर भयंकर प्रसूतिवेदना सुरू झाल्या. सुईणी व वैद्य हे सर्व थकले. कोणाचें कांहीं चालेना. तेव्हां या संकटाचें निरसनार्थ नवचंडी हवन, सप्तशतीपठण इत्यादि धार्मिक विधि करण्यांत आले, तरी पण लवकर सुखानें सुटका होईना. यावेळीं जर बाबांची उदी मिळेल तर माझें कार्य होईल असें नानासाहेबांना वाटून त्यांनीं बाबांचा धांवा केला. इकडे शिरडीस खानदेशचे रामगीरबुवा (त्यांना बाबा प्रेमानें बापूगीर म्हणून हांक मारीत असत) यांना आपल्या घरीं जावें असा त्यांच्या मनाचा उठाव झाला आणि ते बाबांची अनुज्ञा व उदी मागण्यास मशिदींत आले. सर्वसाक्षी सर्वशक्ति बाबा त्याला म्हणाले, 'तूं खुशाल आपल्या घरीं जा, पण वाटेंत थोडा विसावा घे, प्रथम जामनेरास जाऊन नानाच्या घरीं उतर आणि त्याचा क्षेमसमाचार घेऊन तूं आपला मार्ग धर.' पुनः शामा (माधवराव देशपांडे) याचेकडे वळून बाबा म्हणाले---शामा, ती माधव अडकराची आरती ('आरती साईबाबा, सौख्य दातार जीवा' इत्यादि) कागदावर उतरून काढ आणि ती बापुगीर गोसाव्याच्या हातीं दे. नंतर बाबांनीं अनुज्ञा व उदी दिली. आणखी थोडी उदी दुसऱ्या पुडींत बांधून सांगितलें कीं, ही उदीची पुडी आणि आरती जामनेरास नानाच्या हातीं दे आणि त्याचा क्षेमसमाचार घेऊन पुढें तूं आपल्या घरीं जा.

बापुगीरानें उत्तर दिलें कीं—बाबा, माझे-कडे अवघे दोन रुपये आहेत, तेव्हां मी जामनेरास कसा जाऊं शकेन? बाबा म्हणाले, 'तूं स्वस्थ मनानें जा, तुझी सर्व कांहीं सोय होईल.' याप्रमाणें बाबांची अनुज्ञा व उदी घेऊन, बाबांवर पूर्ण विश्वास ठेवून बापुगीर प्रवासाला निघाला. हल्लीं जसा जामनेरास आगगाडीचा मार्ग आहे तसा त्यावेळीं नव्हता. जळगांवास उतरून दुसऱ्या वाहनानें जामनेरास जावें लागे. बापुगीरानें एक रुपया चौदा आणे देऊन जळगांवचें तिकिट काढलें. खिशांत अवघे दोन आणे शिल्लक राहिले. गाडी रात्रीं जळगांवला आली. बापुगीर प्लाट-फार्मवर उतरले. आणि आतां पुढें कसें करावें या चिंतेंत पडले. इतक्यांत 'शिरडीचा बापुगीर कोण आहे का' असा आवाज त्याच्या कानीं पडला. मीच तो म्हणून बापुगीर पुढें झाला. त्याला "शिपाई दिसला मोठा चतुर। दाढी मिशा कल्लेदार। नीट नेटस ल्यालेला इजार। तांगा सुंदर देखिला॥" (श्रीसाईसच्चरित अ. ३३–९४) बापुगीर तांग्यांत जाऊन बसले. तांगा व घोडे इतराप्रमाणें भाड्याचे नसल्यानें इतर तांग्यांच्या पुढें जोरानें धावूं लागले. जळगांव ते जामनेर—अठरा कोसांचें अंतर भराभर तोडीत हा तांगा पहांटेच्या सुमारास एका मोठ्या ओढ्या समीप आला. तेथें घोड्यांना पाणी पाज-ण्यासाठीं तांगा सोडला, आणि त्या शिपायानें स्वतः थोडें पाणी आणून फराळ (आंबे, पेढे, गुळपापडी वगैरे) बापुगी-राच्या पुढें ठेवून तो सेवन करण्यास विनंति केली. त्याचा पेहेराव पाहून हा मुसलमान असावा, त्याच्या हातचा फराळ कसा खावा, अशी शंका बापुगीराच्या मनांत आली आणि तो थोडें काकूं करूं लागला. त्याच्या मनांतील शंका जाणून शिपाई त्याला म्हणाला—आपण मनांत शंका धरूं नका. मी हिंदु, गरवाल क्षत्रिय रजपूत आहे. नानांनीं हा फराळ पाठविला आहे, स्वस्थ चित्तानं तो सेवन करा. या उत्तरानें बापुगीराच्या मनांतील शंका दूर झाली आणि नंतर दोघांनीं मिळून फराळ केला आणि पुनः तांग्यांत बसून ते निघाले, तों अरुणोदयीं जामनेरासमीप आले. नानाची मामलेदाराची कचेरीहि दिसूं लागली. घोडे थोडेसे थांबले. बापुगीरहि लघुशंकेसाठीं तांग्यांतून खालीं उतरून एका बाजूस बसले. लघुशंका आटपून परत येऊन पाहतात तों,

> नाहीं तांगा, नाहीं घोडीं।
> दिसेना तांगेवाला गडी।
> कोणीही न दिसे ते घडी।
> जागा उघडी देखिली।
>
> —श्री साईसच्चरित. ३३–१०५

हा काय चमत्कार, मला येथपर्यंत आणून हा गडी कुठें गेला असा विचार करीत बापुगीर कचेरींत आला आणि नानासाहेब घरीं आहेत असें कळून त्यांचे घरचा पत्ता काढीत त्यांचें घरीं आला आपण आल्याची वर्दी देतांच नानासाहेबानीं त्यांना आंत बोलाविलें. परस्परांची भेट होतांच बापुगीरानें उदी व आरति त्यांचे समोर ठेवून संपूर्ण हकीकत सांगितली. नानासाहेबाची मुलगी याच वेळीं प्रसूति वेदनांनीं विव्हळ होऊन अडलेली होती. क्षुधार्ताला पंच पक्वानांचे ताट मिळाल्या-प्रमाणें नानासाहेबांची स्थिति झाली. त्यांनीं आपल्या कुटुंबाला हाक मारून उदी पाण्यात घालून मुलीला पिण्यास

देण्यास सांगितलें; आणि स्वतः आरति म्हणण्यास लागले.

गुरुरायाची आरती केली ।
उदी पाजितां प्रसूती झाली ।
बाला हातीं पायीं सुटली ।
झाला आनंदी आनंद ॥

—श्री देवकृत नानासाहेब आख्यान.
ओंवी ५६
श्रीसाईलीला वर्ष १३. अंक ११–१३,
पान ३३

बापुगीरानें नंतर नानासाहेबांना विचारलें—तांगेवाला कुठें गेला, येथेंहि तो मला दिसत नाहीं, आपण धाडलेला तांगा कुठें आहे? तेव्हां ते म्हणाले—मी तांगा पाठविला नाहीं, कुठला तांगा हें सुद्धां मला माहीत नाहीं, तुम्ही येथें येणार हें कोणाला ठाऊक? आणि मी तांगा कशाला धाडीन?

"मग बुवांनीं तांग्याची कथा ।
आमूलाग्र कथिली समस्तां ॥
विस्मय दाटला नानाचे चित्ता ।
पाहूनि वत्सलता बाबांची ॥११८॥
कुठला तांगा, कुठला शिपाई ।
नट नाटकी ही माऊली साई ॥
संकटसमयीं धांवत येई ।
भावापायीं भक्तांच्या ॥ ११९ ॥"

—श्रीसाईसच्चरित, अ. ३३.

ही कथा श्रीसाईसच्चरितात अध्याय ३३ मध्यें आलेली आहे. तिचा आधार घेऊन बाबांच्या बाळांनीं (श्री. बाळकृष्ण विश्वनाथ देव यांनीं) श्रीसाईलीला, वर्ष १३ अंक ११–१३, शके १८५८ (सन १९३६) यांत नानासाहेबाख्यान प्रसिद्ध केलें आहे. यांत हा अद्‌भुत चमत्कार सुंदर गद्यपद्य रीतीनें वर्णिलेला आहे. हे प्रसिद्ध करणें पूर्वी शिरडींत वस्ती करून राहिलेले रामगीरबुवा यांना प्रत्यक्ष भेटून व विचारून वर्णन केलेली हकीकत खरी असल्याबद्दल खात्री करून घेऊन, तसेंच नानासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव वासुदेव नारायण उर्फ बाबुराव यांचेकडूनहि खात्री करून घेऊन नंतर हें प्रकरण कीर्तनाख्यानरूपानें प्रसिद्ध केलें आहे असें श्री. देव, सदरहु अंक पान १८ येथें लिहतात.

वर नमूद केलेले श्री. बी. व्ही. नरसिंह-स्वामी, यांनीहि या प्रकरणांत चौकशी केली आहे. त्यांनीं श्री. मैनाताई यांची त्यांच्या पुणें येथील निवासस्थानीं भेट घेतली आणि त्यांचा जबाबहि १ जून १९३६ रोजीं लिहून घेतला. याविषयीं त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, इ. स. १९०५ सालीं जामनेरास माझा प्रसूति समय अगदीं समीप आला होता आणि बऱ्याच जोराच्या वेणा (वेदना) होत होत्या. त्यावेळीं गोसावी उदी घेऊन आले होते हें मला ठाऊक आहे; पण त्यावेळीं माझ्या वेदना (दुःख) असह्य असल्यामुळें मला त्यांची प्रत्यक्ष माहिती नाहीं. (भक्तानुभव, भाग ३ पान १४)

तसेंच त्यांनीं रामगीरबुवा (बापुगीर-बाबा) यांचा ता. १ डिसेंबर १९३६ रोजीं सविस्तर जबाब लिहून घेतला आहे, त्यांनीं या प्रकरणाविषयीं असें सांगितलें आहे कीं, एके दिवशीं बाबांनीं मला बोलाविलें आणि उदीची पुडी आणि आरति दिली. त्यावेळीं मला खानदेशाला जावयाचें होतें. बाबांनीं मला जामनेरला (जामनेर हें भुसावळ

स्टेशनहून गाडीमार्गे ३६ मैल आहे) जा आणि उदी व आरति नानासाहेब चांदोरकर, जामनेरचे डेपुटी कलेक्टर यांना दे म्हणून सांगितलें. मी बाबांना म्हटलें कीं, मजपाशीं अवघे दोन रुपये आहेत आणि तेवढ्या पैशानें आगगाडीनें कोपरगांव ते जळगांवपर्यंत मी कसा जाऊं शकेन! बाबा म्हणाले–देव सर्व कांहीं देईल (करील). तो दिवस शुक्रवार होता आणि मी ताबडतोब निघालों. मनमाडला मी रात्रीं ७–३० वाजतां आणि जळगांवला पहांटे २–४५ ला पोंचलों. तेथें प्लेगचे नियम (कायदे) चालू असल्यामुळें मला बराच त्रास झाला. जामनेरला कसें जावें या विवंचनेंत मी होतों. इतक्यांत अजमासें ३ वाजतां, बुट, पगडी व इतर चांगला पोषाक यांनीं सजलेला एक प्यून (शिपाई) आला आणि त्यानें मला एका तांग्यापाशीं नेलें आणि ताग्यांत बसवून तो हाकलण्यांत आला. मी मनांत घाबरलों. वाटेंत बघूर येथें मला फराळ देण्यांत आला. पहाटेस आम्हीं जामनेरला पोंचलों. आणि मी लघुशंका वगैरे प्रातर्विधि करण्यास गेलों होतों. तेव्हां तांगा आणि तांगेवाला अदृश्य झाले असें दिसलें. (भक्तानुभव भाग ३ पान ८६)

शेवटीं या प्रकरणाच्या उपसंहारार्थ एवढेंच सांगवयाचें कीं–या चमत्काराविषयीं कोणास शंका घेण्यास कांहीं कारण नाहीं. बाबांच्या उदीमुळें हल्लींहि सुखानें प्रसूति झाल्याचा अनुभव आमचे घरीं आलेला आणि इतरांनाहि आलेला आम्हांस माहीत आहे. तेव्हां बाबांनीं स्वतः होऊन पाठविलेल्या उदीचा परिणाम 'अचुक व रामबाण' झाला असलाच पाहिजे यांत संशय नाहीं. पण तांगा, घोडे, शिपाई, फराळ इत्यादि वर वर्णिलेला प्रकार हा बाबांच्या 'कर्तुमन्यथाकर्तुम्, सर्वसाक्षित्वाचा व सर्व शक्तिमत्वाचा' द्योतक आहे आणि यावरून बाबा हे देव–परमात्मा आहेत हें सिद्ध होतें.

आतां नानासाहेबांना आलेले आणखी कांहीं अनुभव आणि मिळालेली शिकवण सांगून हें प्रकरण पुरें करूं. हा भाग पुढील अंकांत देण्यांत येईल.

(अपूर्ण)

# भक्ताचे पुरवी मनोरथ हरी—

माझी स्फूर्ति सरस्वती मज म्हणे, बाळा कवी विठ्ठला।
मद्भक्ता श्रमलासि ऐक सखया सांगेन जें मी तुला॥
झाला ताप शमेल या हरिकथापीयूषपानें तुझा।
भक्ताचे पुरवी मनोरथ हरी संदेह नाहीं दुजा॥

—विठ्ठल चित्रकवि

# ऐसा कृपावंत कोण ।
# माझ्या विठाई वांचून ॥

कै. ह. भ. प. पांगारकर यांनी लिहिलेली एक आठवणः—

१९१० सालची गोष्ट. मुमुक्षु सुरू करून चार वर्षें झालीं. अगदींच बस बसेना. चार वर्षांत तीन हजार रुपये कर्ज झालें. पैशाची भयंकर टंचाई झाली. एकदां तीन आठवडे माझ्या जवळ एकच पावली होती. छापखान्याचें बिल ता. ८ ला द्यावेंच लागे! महिन्यांतून तीन वेळां मुमुक्षु काढावा लागे. त्याचें बिल रु. ५३ होत असे. एकदां ता. ८ उगवली. छपाईवाले रा. सापकर (ज्ञानचक्षूचे मालक) आज दुपारीं दोन वाजतांच येणार, त्यांना पैसे तर देतां येत नाहींतच, पण उत्तर काय द्यायचें? हा प्रश्न मला खाऊं कां गिळूं करूं लागला. खिशांत अवघी पावली! दोन वाजले. सापकर आले. या बसा केलें. तीन फेऱ्या घातल्या. उत्तर काय देऊं? शेजारच्या खोलींत गेलों. दार लावून खुर्चीवर बसलों. टेबलावर डोकें टेकलें. 'तुला सोडून माणसाची नोकरी करायची नाहीं ही माझी मनीषा, देवा! तूं पूर्ण करणार नाहींस काय? तुझ्यावांचून मला दुनियेंत कोणताहि आधार नाहीं. धांव पांव सांवळे विठाबाई। कां मनीं धरली अढी?' अशी पांच मिनिटें अंतरापासून प्रार्थना केली. डोळे पुसले व बाहेरच्या खोलींत आलों. 'सापकरांना काय उत्तर देऊं?' बाहेर दारावर थाप. एकजण आंत आला. 'आपण पांगारकर काय?'

'होय!'

'भक्तिमार्ग प्रदीपाच्या २०० प्रति पाहिजेत.'

कमिशन कापून ३७॥ रुपये होतात. बराच धीर आला. पुन्हां तो म्हणाला,

'आणखी काय पुस्तक आहे?'

'मोरोपंती वेंचे.'

त्याच्या १५।२० प्रती मागितल्या. बिल बरोबर ५३ रुपये झालें! सापकरांस ५३ रुपये दिले. मला बोलवेना!!

हांकेसरिसा उडी।
घालोनियां स्तंभ फोडी॥
ऐसा कृपावंत कोण।
माझ्या विठाईवांचून॥

हा अनुभव काय एकट्या तुकोबांचा आहे?




## डिसेंबर १९५६

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं दर रोज भक्तांची फार गर्दी होत असे. अनेक कलाकारांनीं श्री पुढें हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढील प्रमाणें:—

**कीर्तनः**—श्री. श्री. बा. उर्फ बाबुराव देव ठाणें. श्री. मराठे गवई यानीं या महिन्यात दोन कीर्तनें केलीं.

**पोवाडे** श्री. गणपतराव सुर्वे पुणें; श्री. दत्तोबा नाईक, पुणें; श्री. वसंतराव कल्याणपुरकर, पुणें; पोवाड्याचे कार्यक्रम चांगले झाले.

**नकलाः**—श्री. मधुकर काशिनाथ शिगवण, मुंबई.

**फिडलवादनः**—जनार्दन माणिक भोईर, मुलुंड.

**गायनः**—कु. रंजना पेंडसे, अकोल (वऱ्हाड); कु. रत्नमाला दशपुत्रे, भुसावळ; श्री. पंडितराव नगरकर, पुणें; श्री. सुलोचना पालकर, पुणें; श्री. अनंतबुवा ओंकार, पुणें; श्री. रामचंद्र शामराव बोरकर, मुंबई; श्री. माधव विष्णू भांडारकर. इन्दूर; श्री. लक्ष्मणराव गणपतराव देवासकर, मुंबई. श्री. लोकनाथकी अम्मा, मद्रास. श्री. गणेश परशराम ओक, मुंबई कु. हंसा जोशी, ठाणे. कु. मालती वैद्य, मुंबई. श्री. मुळचंद हे बागडी, खामगांव.

**कवाली भजनी मंडळ**

**बडोदा:**—सय्यदभाई कमरुद्दीनभाई बरोडावाला आणि इतर सर्व भजनी मंडळी यानी बडोद्याहून पायी चालत शिर्डीस पांचपंचवीस मंडळीनी येऊन भजन सेवा केली. राजणदेवी प्रासादीक भजनी मंडळी ठाणे. भजन हजेरी दिली. श्रीदत्तजयंती निमित्त श्रीमंदिरात सायंकाळी श्रीदत्त जन्माचे कीर्तन व रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतुन मिरवणूक नाताळ सुट्टी निमित्त श्रींचे जुनेकापडांची प्रसाद म्हणून विक्री करणेत आली.

## जानेवारी १९५७

बाहेरगांवच्या भक्तांचीं श्रीसाईचे दर्शनाकरितां नित्याप्रमाणें गर्दी होती:— कांहीं कार्यक्रमः—

**कीर्तनः**—श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, संस्थान गवई मराठे यांचें कीर्तन झालें.

**प्रवचनः**—श्री. वे. शा. सं. पद्मनाथशास्त्री दादर श्री. ह. भ. प. नाथबुवा पंढरपूरकर, पुणें.

**गायनवादनः**—श्री. रामचंद्र निलकंठ राईलकर, मुंबई. श्री. नारायण निळकंठ राईलकर, मुंबई. श्री. देवनाथ, वैद्य, मुंबई श्री. प्रमिला करमरकर, मुंबई. श्री. श्रीकांत मोहिले, सौ. शैला मोहिले, मुंबई. सौ.

कमलाबाई शिंदे, श्री. वसंतराव शिंदे, सांगली. श्री. ठाणेदार, राहता, श्री. कृष्णराव सिद्ध, श्रीगोंदे, श्री. श्रावणकुमार, धुळें, श्री. रामदास नायडू, सोलापूर, श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, कु. दत्तात्रय दिगंबर, सोलापूर, श्री. दिगंबरबुवा कुलकर्णी सोलापूर, श्री. मधुकर हटकर, मुंबई, श्री. यशवंत हटकर, मुंबई.

ता. २६ जानेवारी स्वातंत्रदिनानिमित्त दिव्यांची रोषणाई. गायन भजन वगैरे कार्यक्रम श्री मंदिरांत झाला.

## फेब्रुवारी १९५७

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेरगावचे भक्तांची गर्दी नित्याप्रमाणें होती. कांहीं कलावतानी श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें:—

**कीर्तनः**—ह. भ. प. पोपटबुवा लोहणेरकर, मु. साकोरी, श्री. ह. भ. प. रामचंद्र गणेश ढेपे, जेऊरकर, जि. नगर श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने श्री. मराठे, सं. गबई यांची श्रीदास नवमी व दोन एकादशीस कीर्तनें

**प्रवचनः**—श्री. मो. ग. भावे, कल्याण.

**वेदमंत्र हजेरीः**—श्री. वे. मू. सदाशिवभट्ट शुक्ल, त्रिंबकेश्वर, वे. मू. अंबादासभट्ट देवकुळे, त्रिंबकेश्वर.

**तबलावादनः**—श्री. विनायकराव पेंढारकर, मुंबई.

**गायनः**—श्री. गणपतराव देवास्कर मुंबई. श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, साकोरी श्री. वत्सलाबाई पवार, बार्शी. श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई. श्री. दत्तात्रय नारायण नाडकर्णी, मुंबई. श्री. बाबुराव गणेश मुळे, मुंबई. श्री. माधवराव पोतदार व सौ. कमलाबाई पोतदार, हैद्राबाद. श्री. ज. धों. भानत, चेंबूर.

महाशिवरात्रीनिमित्त श्रींचें पालखीची गांवांतून मिरवणूक निघून रात्रौ कीर्तन गायन वगैरे झालें.

संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्याचा रुग्णाना फायदा मिळत आहे.

शिरडी संस्थान भक्त मंडळाची स्थगित झालेली भक्त मंडळाची सभा दि. १०–३–१९५७ रविवार रोजीं सिद्धार्थ कॉमर्स कॉलेज, फोर्ट, मुंबई येथें भरली होती व त्या सभेंत १९५५ सालचा व्यवस्थापक समितीचा अहवाल व १९५५ सालची अकौन्ट समिति, यांनीं सुधारलेले ताळेबंदी हिशेब व त्याचा अहवाल, सर्वानुमते संमत झालें. अध्यक्ष पी. के. सावंत हे गैरहजर असल्यामुळें श्री. बाळाराम जयकर हे अध्यक्ष स्थानीं होते.

त्या सभेंत हिशोब समिति व आर्किटेक्ट समिती यांचे आभार मानण्यांत आले. त्या समितीच्या सदस्यांना श्रीसाई महावस्त्र प्रसाद द्यावा असें ठरलें. भक्त मंडळाची पुढील सभा जून महिन्यांत होणार आहे.

**द. ब. राणे**
**सी. बी. वेलकर**
संयुक्त चिटणीस

## भक्तमंडळाचे सभासद

ता. १० फेब्रुवारी १९५७ पर्यंत श्री साईबाबा संस्थानच्या भक्तमंडळाचे जे नवे सभासद झाले त्यांचीं नांवें पुढील प्रमाणें:—

### पेट्रन

(१) श्री. व्ही. जी. केळसकर, आंजर्ले
(२) श्री. डी. बी. मालपेकर, मुंबई.

### आजीव सभासद

(१) श्री. एम्. एल्. अमीन, मुंबई
(२) श्री. एस्. के. बक्षी, हैदराबाद (द.)
(३) श्री. टी. आर. देसाई, मुंबई
(४) श्री. आर. एन्. गिरप, मुंबई
(५) श्री. पी. एम्. गवाणकर, पुणें
(६) श्री. आर. जी. कसात, सेलू
(७) श्रीमती मालतीबाई मणेरीकर, मुंबई
(८) श्री. जे. आर. धूत, शेवली
(९) श्री. एम्. जे. जानी
(१०) श्री. एस्. ए. कारकेरा, मुंबई
(११) श्रीमती जसुमती मोदी, मुंबई
(१२) श्रीमती मेना चाचरिया, पाटण
(१३) श्री. एस्. के. पटेल, सुरत
(१४) श्री. व्ही. एम्. पटेल, सारधान
(१५) श्री. पी. टी. राजकोंडावार, वणी
(१६) श्री. आर्. व्ही. श्रॉफ, मुंबई
(१७) श्री. जी. आर्. विदुर, चांदेकासारे
(१८) श्री. एस्. चतर्जी, कलकत्ता
(१९) श्री. एम्. जी. सारडाणा, डेहराडून
(२०) डॉ. श्रीनिवास राव, जग्गयपेठ

### सामान्य सभासद


नवीन सामान्य सभासद मुंबई प्रांतांत ११७ आणि इतर प्रांतांत २८ मिळून १४५ इतकी नवी सभासद—संख्या झाली.

डी. बी. राणे
सी. बी. वेलकर
संयुक्त चिटणीस

---

दिव्य दृष्टीसाठीं !

शिसा ऑप्टिशिअन्स



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.